


महात्मा गांधींच्या
अमर स्मृतीस
अर्पण !

-शिवराज

## कार्यकारी संपादक मंडळ :

प्र. प्राचार्य नरेन्द्र कुमार कुकडे

अध्यक्ष

**मराठी विभाग :**

प्रा. सौ. नीला पांढरे

प्रा. कृष्णा गुरव

विद्यार्थी प्रतिनिधी :

- राम जोशी
- कु. सुलोचना मडळगी

□

**हिन्दी विभाग :**

प्रा. के. एच. मणियार

विद्यार्थी प्रतिनिधी :

- भैरव कुंभार
- सुकान्त हिरेमठ

□

**इंग्लिश विभाग :**

प्रा. जी. आर. ठाणे

विद्यार्थी प्रतिनिधी :

- कु. शैलजा कुलकर्णी
- शंकर जाधव

मुखपृष्ठ :

मारुती भोसले

शिवराज कला आणि वाणिज्य महाविद्यालय

# शिवराज

पहिले पुष्प

१९६८-६९

महात्मा गांधींच्या अमर स्मृतीस अर्पण

गांधी शताब्दि वर्ष

## FROM No. IV ( RULE No. 8 )

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of publication | | Shivraj College, Gadhinglaj. |
| 2. | Periodicity of its Publication | ... | Annual |
| 3. | Printer's Name | ... | V. A. Jathar |
| | Nationality | ... | Indian |
| | Address | ... | Alankar Printers Gadhinglaj |
| 4. | Publisher's Name | ... | Prin. N.K Kukade |
| | Nationality | ... | Indian |
| | Address | ... | Gadhinglaj |
| 5. | Editor's Name | ... | Prin. N. K. Kukade |
| | Nationality | ... | Indian |
| | Address | ... | Shivraj College Gadhinglaj |
| 6. | Name and Address of individual who own the newspaper | ... | Shivraj College Gadhinglaj |

I, Ag. Principal Narendra Kumar Kukade, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Signature of Publisher
**N. K. Kukade**
Ag Principal
Shivraj College Gadhinglaj.

Gadhinglaj.
Maharashtra Day.
1st May 1969

आमच्या महाविद्यालयाचे शिल्पकार-



**मा० रावसाहेब व्ही. टी. पाटील**

संस्थापक – अध्यक्ष : ताराराणी विद्यापीठ, कोल्हापूर

# सं दे श . . .



सत्य – अहिंसा – मानवतावाद

आमची प्रेरक शक्ती -



**नगराध्यक्ष डॉ. एस. एस. घाळी**

उपाध्यक्ष, ताराराणी विद्यापीठ.

RASHTRAPATI BHAVAN

New DELHI – 4

Mahatma Gandhi was the embodiment of truth and non-violence and worked unceasingly all his life to bring about unity among all our people of whatever sect or creed. Not only was he the greatest leader of our time but one whose genius and strength of purpose welded the nation as one in its march towards freedom. His birth centenary celebrations in 1969 will afford us a unique opportunity to rededicate ourselves to his teach ings and lofty ideals so that India may continue to prosper and grow great.

I wish success to all efforts that are undertaken to add to our knowledge of Gandhiji's life and his mission.

**Zakir Husain**

स. न. वि. वि.

आपण आपल्या महाविद्यालयाचे 'शिवराज' वार्षिक प्रकाशित करीत आहात, हा स्तुत्य उपक्रम आहे गांधी शताब्दिच्या या वर्षी त्याचा पहिला अंक, गांधी तत्वज्ञानावर आधारित अहे हे योग्यच आहे या आपल्या वार्षिकाचे वाचकाकडून सहर्ष स्वागत व्हावे ही सदिच्छा व्यक्त करण्यास मला आनंद वाटतो.

आपला,
— ना रा तावडे
कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ

❋

स. न. वि. वि.

चालू गांधी शताब्दि वर्षापासून आपल्या महाविद्यालयाद्वारे 'शिवराज' नावाचे वार्षिक प्रकाशित केले जाणार आहे हे वाचून समाधान वाटले.

आपल्या उपक्रमास व आपले संस्थेचे शैक्षणिक कार्यास माझे आशीर्वाद व शुभेच्छा. कळावे.

आपला,
— ह वि. पाटसकर
कुलगुरु, पुणें विद्यापीठ

❋

मान्यवर मित्र,

शिवराज साहित्य आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांतर्फे या वर्षापासून 'शिवराज' हे पाक्षिक सुरू होत आहे हे वाचून आनंद झाला या वर्षी सर्व देशभर महात्मा गांधी जन्मशताब्दी साजरी करण्यात येत आहे व या वर्षानिमित्त सर्व क्षेत्रातून समाजोपयोगी उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थी हे शिक्षणाने परिपक्व झालें असतात. जगाच्या व्यवहारात पाऊल टाकण्यास उत्सुक असतात. अशावेळी गांधी तत्वज्ञानाचा प्र[illegible]र हा उपयुक्त ठरेल असे मला वाटते. गांधी तत्वज्ञानाच्या प्रसाराच्या हेतुने सुरू होत असलेला 'शिवराज' वार्षिकाला सुयश चिंतितो.

आपला नम्र,
— गोपाळराव खेडकर
मंत्री, ग्रामीण विकास महाराष्ट्र राज्य

❋

Dear friend,

I am glad to know that you are issuing a "Gandhiji Cenetenary Number of Shivaraj" laying stress on the different aspects of Mahatmaji's teachings.

I wish your endeavour every success.

Your sincerely,
K. KAMARAJ

❋

## MESSAGE

Any effort, however humble, devoted to popularising Gandhiji's thinking, should be welcome. It was under Gandhiji's leadership that we won freedom through non-violence. His message of non-violence has now been accepted universally as a practical and peaceful solution to the various conflicts facing the world today. Besides non-violence, Gandhi was keenly interested in the upliftment of the downtrodden, specially the HARIJANS. We just cannot afford to ignore the Gandhian path if we want

to grow and prosper. I am glad that Shivraj College of Arts and Commerce is bringing out a special number on the various facets of Gandhiji's life synchornising with his birth Centenary Celebrations. I hope it will make an inspring reading and send my best wishes for its success.

S. NIJALINGAPPA

❋

स. न. वि. वि.

म.गांधी एक ईश्वरीपुरुष समजावे लागतील. आपल्या " शिवराज " ला माझे अनन्त आशीर्वाद.

म. म. पद्मभूषण दत्तो वामन पोतदार

❋

सप्रेम नमस्कार,

तुमचे २७-१ चे पत्र मिळाले. तुमच्या विद्यालयातर्फे गांधी शताब्दि वर्षापासून 'शिवराज' नांवाचें वार्षिक प्रकाशित केले जाणार आहे हे समजले. उपक्रम स्तुत्य आहे. एक सत्य लक्षात ठेवणे जरुर आहे. नदीच्या काठावर उभे असलेल्या जुनीच नदी वाहत आहे असे वाटते पण नदीच्या पाण्याचा प्रत्येक थेंब नवा असतो. इतिहासाचे तसेंच आहे हे लक्षात न राहिल्याने योग्य तो बोध मिळत नाही. कळावे.

– शंकरराव देव

❋

उपमंत्री पाटबंधारे वीज (प्रकल्प) व कृषि म. राज्य

" शिवराज " महाविद्यालय, गडहिंग्लजच्या विद्यार्थ्यांनी या वर्षापासून "शिवराज" हे वार्षिक प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे हे वाचून आनंद झाला.

गांधी जन्मशताब्दी वर्ष म्हणून या वर्षी गांधीजींच्या तत्वज्ञानाचा प्रभावी प्रसार करण्याचे विविध कार्यक्रम सर्वत्र सुरू आहेत व त्या दृष्टीने या वर्षीच्या पहिल्याच "शिवराज" मध्ये गांधी तत्वज्ञानाची चर्चा करणारे साहित्य प्रकाशित होत आहे हेहि औचित्यपूर्णच आहे गांधीजींच्या जीवनातील विविध प्रसंग हे सर्वसामान्यांना दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन विधायक कार्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यास मदत होईल असा माझा विश्वास आहे.

या वर्षीच्या अनेक उपक्रमात शिवराज महाविद्यालयातर्फे होणारा हा उपक्रम स्तुत्य आहे. विद्यार्थ्यांच्या प्रयत्नाबद्दल अभिनंदन. शिवराजला सुयश चिंतीतो.

– भि जि. खताळ

❋

प्रिय प्राचार्य कुकडे,

आपल्या दिनांक २७–१–६९ च्या पत्रावरून आपण यावर्षी निघणाऱ्या 'शिवराज' अंकात प्रामुख्यानें महात्मा गांधीच्या तत्वज्ञानावर चर्चा करणारे साहित्य प्रकाशित करणार आहात हे वाचून अतिशय आनंद झाला.

२. महात्मा गांधी जन्मशताब्दीच्या काळांत गांधीजीच्य विचाराचे महाविद्यालयीन स्तरावर चिंतन व्हावे हे औचित्यपूर्ण आहे. नव्या पिढीस गांधीजींच्या विचाराचा अभ्यास करण्याची व त्यासंबंधी विपुल अशा साहित्याशी परिचित होण्याची सुसंधी या उपक्रमाद्वारे मिळेल. गांधीजींच्या विचाराचा प्रसार आणि अभ्यास आपल्या उपक्रमाद्वारे साध्य होईल. त्याचप्रमाणें ज्या विचाराना अनुसरून गांधी जन्मशताब्दीच्या काळांत आपण जे निरनिराळे कार्यक्रम घेणार आहोत त्यामध्ये सुद्धा गांधीजींच्या विचारांचा समावेश व्हावा.

आपला स्नेहांकित

– ए. रा. धोंगडे

शिक्षण संचालक शिक्षण संचाचय महाराष्ट्र राज्य

भाई श्री कुकडेजी,

आपका पत्र संख्या ३१३२–६९ तारीख १७-२-६९ का मिला। आपका शुभ संकल्प सफल हो। और आपकी भावना सिद्ध हो।

आपका,
उ. न ढेबर

※

प्रा. नरेंद्र कुकडे,
माननीय प्र. प्राचार्य,
शिवराज कॉलेज, गडहिंग्लज,
जिल्हा कोल्हापूर यांस–

स न. वि. वि.

आपले पत्र जा क्र. ३०६२-६९ ता २७ जानेवारी १९६९ चें मिळाले, आभारी आहे. चालू महात्मा गांधी शताब्दी वर्षापासून आपल्या महाविद्यालयाद्वारे 'शिवराज' नावाचे वार्षिक प्रकाशित करणार आहात याबद्दल आनंद वाटतो महाविद्यालयामार्फत निघणारे मासिक अगर वार्षिक हे विचारविनिमयाचें एक उत्तम माध्यम असते. मासिक ही थोडी खर्चाची बाब होऊन बसते पण वार्षिक कठीण जात नाही. महात्मा गांधी हे आधुनिक जगातले एक थोर युगपुरुष होऊन गेले व त्यांना जन्म देण्याचे भाग्य या देशाला लाभले महात्मा गौतम बुद्ध, महात्मा जीजस ख्राईस्ट, महात्मा महमद पैगंबर इत्यादि जागतिक महात्म्यांच्या मालिकेत महात्मा गांधी बसण्यासारखे आहेत व त्यांची जन्म शताब्दी साजरी करण्याची संधी आपणाला मिळत आहे. आपल्या देशाचे ते राष्ट्र पुरुष आहेत व त्यांच्या प्रयत्नामुळेच आपण आजचे स्वातंत्र्य मिळवू शकलो. गेल्या पिढीतील पुष्कळांनी त्यांना पाहिले आहे आणि आमच्या पिढीतील काहींनी त्यांच्या सभेत भाग घेतला आहे. १९३७ साली पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्थेचा मी प्राचार्य असताना "बेसिक एज्युकेशन अर्थात जीवन शिक्षण" या विषयावर त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली होती हे मला आठवते इतके थोर महात्मे आमच्यात राहिले व आमच्यात वागले हे आमचे केवढे भाग्य ! त्यांची पाऊले देशाच्या सर्व भागात उमटलेली आहेत आणि त्यांचे मार्गदर्शन आपल्या देशाला सतत होत राहील. त्यांचे विचार व तत्वज्ञान हे कालातीत आहेत, चिरंतन आहेत. केवळ या देशासाठी नाहींत तर सर्व मानवजातीसाठी आहेत या शताब्दी निमित्ताने महात्मा गांधींचे सर्व वाङमय आपल्या वाचनालयात आणून ठेवा. या वर्षी सर्व जगभर महात्मा गांधींच्या विचारांचा व तत्वज्ञानाचा अभ्यास होणार आहे. आपल्या प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना त्यांचा अभ्यास करावयास लावा. आपल्या वार्षिकासाठी लेख मागवून घ्या. आपल्या महाविद्यालयात महात्मा गांधी तत्वज्ञानावर निबंध व वक्तृत्व चढाओढी भरवा. आपल्या देशाच्या तरुण पिढीनें हे विचार आत्मसात केले पाहिजेत व त्याप्रमाणें आचरण ठेविले पाहिजेत. अहिंसा व सत्याचरण ही त्यांच्या विचारांची मुख्य अंगे आहेत मानवधर्म व भूतदया हा त्यांच्या तत्वज्ञानाचा पाया आहे. समानता व विश्वबंधुत्व हे त्यांच्या शिकवणुकीचे ध्येय आहे आपल्या देशालाच नव्हे तर सर्व जगाला त्यांच्या शिकवणुकीची गरज आहे आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात आपण महात्मा गांधींच्या तत्वज्ञानाचा फैलाव करूं शकतो आपले प्राध्यापक व वरच्या वर्गातील विद्यार्थी निरनिराळ्या खेड्यात जाऊन म. गांधींच्या मानवधर्माचे व समानतेचे विचार सांगू शकतील. समाजामध्ये चालू असलेले भेदाभेद भाषिक, धार्मिक, प्रांतिक व जातीय हे नाहीसे झाले पाहिजेत आपण प्रथम भारतीय आहोत अशी भावना सर्वांची पाहिजे. म गांधी जन्म शताब्दी साजरी करण्यात हाच हेतू आहे व तो साध्य होतो किंवा नाही हें आपण पाहिले पाहिजे. मी आपल्या 'शिवराज' वार्षिकाला सुयश चिंतितो. कळावे.

आपला
– प्राचार्य सी. रा. तावडे

※

महाविद्यालयाचा शुभारंभ....

२६ जून १९६४




मा. बाळासाहेब देसाई, शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य

## संपादकीय—

महाराष्ट्र वीरांगना महाराणी ताराराणी या युगस्त्रीचे जिवंत स्मारक माननीय बा. व्ही. टी. पाटील साहेब यांनी ताराराणी विद्यापीठाच्या रूपाने रूपास आणले. या विद्यापीठाचेच अविभाज्य असे अंग म्हणून गडहिंग्लजचे लोकप्रिय नगराध्यक्ष डॉ. घाळी साहेब यांच्या सहकार्याने शिवराज महाविद्यालयाची स्थापना जून १९६४ मध्ये झाली. या महाविद्यालयाच्या जन्मकाळा-पासून पाचव्या वर्षीच अखिल भूतलावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जन्मशताब्दी साजरी होत आहे १९६९ साल हे या महाविद्यायाच्या जीवन-इतिहासात सुवर्णाक्षरांनीच लिहून ठेवावे लागेल. कारण याचवर्षी महाविद्यालयात बी ए.–बी.काम्. पर्यंतचे पदवीपूर्ण शिक्षण देण्यात येऊ लागले. याच वर्षी महाविद्यालयाची मानाची पहिली पदवीधर तुकडी बाहेर पडत आहे. याच वर्षी भारताचा प्राणमंत्र असलेल्या ' गांधी तत्त्वज्ञाना ' च्या जनकाची जन्मशताब्दी साजरी होत आहे. आणि याच वर्षी या महाविद्यालयाचा ' शिवराज ' हा प्रथम वार्षिकांक अक्षर स्वरूपात बाहेर पडत आहे.

शिवराज महाविद्यालयातील ज्ञानतृषित व कलास्वादक अशा विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या कोवळच्या प्रतिभेला जे अक्षर–पालव फुटले, त्यातून चोखंदळ सौंदर्य समीक्षक दृष्टी ठेऊन जी निवड केली ती 'शिवराज' च्या रूपाने रूपदक्ष केली आहे. मुलामुलींची ही नवनिर्मिती 'शिवराज' च्या रूपाने प्रथमत:च अक्षर करीत असताना अखिल भूखंडावर साजरी होत असलेली गांधी जन्म शताद्बीचा पर्वणी साधून आमचा हा प्रथम अंक 'गांधी जन्म–शताब्दी विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करुन

त्या राष्ट्रपित्याचे पुण्यस्मरण करून
त्याच्याच चरणी
ही भाव-अक्षर-अंजुली
आम्ही अर्पण करीत आहोत.

### प्रगतिपथावर :

माननीय रावसाहेब श्री. व्ही. टी. पाटील साहेब व डॉ. घाळी साहेब यांच्या प्रबळ तम प्रेरणेतून मूर्त स्वरूपास आलेले हे महाविद्यालय या वर्षी तृतीय वर्ष साहित्य व वाणिज्य शिक्षणाची सोय करून शिक्षण प्रदान कार्यात परिपूर्ण झाले आहे. केवळ ८४ विद्यार्थ्यांच्या संख्येवर सुरू झालेल्या ह्या महाविद्यालयात आज ३६० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यामध्ये ४० विद्यार्थिनी कर्तृत्वाचा आपला वाटा मोठ्या हिरीरीने उचलीत आहेत. महाविद्यालयाचे

आजपर्यंतचे ८० टक्यापर्यंत लागलेले परीक्षांचे निकाल हे या महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता विकासित असल्याने दर्शवून जातात.

या वर्षी तृतीय वर्ष बी. ए साठी मराठी, हिंदी व अर्थशास्त्र या विषयांची सोय केली असून तृतीय वर्ष बी. काम्. च्या केवळ दोन विद्यार्थ्यांकरिता बँकिंग हा विषय ठेऊन त्यासाठी तीन प्राध्यापकांची सोय करणारे हे एकमेव महाविद्यालय आहे.

## प्राध्यापकवर्ग :

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वर्ग हा निष्णात, सतत कार्यरत, अनुभवी, तरुण, उत्साही व खिलाडू वृत्तीचा आहे. विद्यार्थ्यांशी कौटुंबिक संबंध ठेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात प्राचार्य व सर्व प्राध्यापक नेहमीच तत्पर असतात. प्राचार्य व प्राध्यापक यांच्या वरील गुणामुळे महाविद्यालयाचा गुणात्मक विकास व संख्यात्मक विस्तार हा उत्तरोत्तर अधिकच होऊ लागला आहे.

## जुन्यांचे कुशलत्व व नवागतांचे स्वागतः

महाविद्यालयाच्या शैक्षणिक यश:सिद्धीसाठी प्रा. के. एच् मणियार (हिंदी) प्रा. कृष्णा गुरव (मराठी) प्रा. एन्. एस्. कुलकर्णी (अर्थशास्त्र व राज्यशास्त्र) प्रा. आर्. बी. आणेकर (अर्थशास्त्र) प्रा. अजुनवाडकर (तर्कशास्त्र व मानसशास्त्र) प्रा. जोशी (भूगोल) आदींनी सतत परिश्रम केले व करीत आहेत. महाविद्यालयाचा गुणात्मक तथा संख्यात्मक विस्तार होऊ लागल्याने वेगवेगळ्या विषयांसाठी काही नवीन प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली.

कॉमर्स विभाग–प्रा. एन्. के कुकडे व प्रा एम् एल्. पाटील,इंग्रजी–प्रा. आर् जी.पातकर व प्रा. जी. आर. ठाणे, हिंदी–प्रा व्हो. एम. पाटील, अर्थशास्त्र–प्रा. सी. बी. पांढरे आणि मराठी–प्रा सौ. नीला पांढरे. या सर्व नवागतांचे सुस्वागत. महाविद्यालयाच्या प्रथम टर्मच्या अखेरीस जुने प्राचार्य डी. जी. कुलकर्णी निघून गेल्यामुळे प्रा एन् के. कुकडे यांनी प्रभारी प्राचार्य म्हणून महाविद्यालयाची सर्व कार्ये शिस्तबद्धतेने व कौशल्याने पार पाडली. महाविद्यालयाचा नॉन्–टिचिंग कर्मचारी वर्गही अती उत्साही व कार्यक्षम आहे. त्यामध्ये हेड्क्लार्क श्री. जयंत सबनीस, असिस्टंट क्लार्क श्री. मडलगी व श्री. गवळी हे असून लायब्ररिअन म्हणून सौ. स्मीता सबनीस यांची नवीनच नियुक्ती झाली आहे. असिस्टंट लायब्ररिअन म्हणून श्री. दड्डी हे काम पाहातात

## ग्रंथालय :

गडहिंग्लजसारख्या ग्रामीण परिसरात राहूनही आमच्या महविद्यालयाने स्वतःचे असे समृद्ध ग्रंथालय निर्मिण्यात यश संपादन केले आहे. ग्रंथालयात विविध भाषांतील विविध विषयांवर सुमारे ५६०० ग्रंथ आहेत. या ग्रंथाचा प्राध्यापक व विद्यार्थी पुरेपूर उपयोग करून घेतातच शिवाय महाविद्यालयाशी संबंधित नसणाऱ्या ग्रंथाभ्यासूनाही ग्रंथालयातून ग्रंथ दिले जातात.ग्रंथा–लयाला जोडूनच वाचनालय व अभ्यासिका यांची व्यवस्था केली आहे. वाचनालयात मराठी,

हिंदी, इंग्रजी भाषांतील प्रसिद्ध अशी दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके अशी ५० नियतकालिके ठेवली जातात. विद्यार्थ्यांच्या अभ्यासूवृत्तीत वाढ करणारी अभ्यासिका ही सकाळी ८ ते १२ व दुपारी ४ ते रात्री १० पर्यंत उघडी असते. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी अधिकात अधिक सोयी उपलब्ध करून देण्यात महाविद्यालय नेहमीच तत्पर असते.

## जिमखाना :

देशी-विदेशी खेळांसाठी लागणाऱ्या साहित्यावर महाविद्यालयाने शक्य तितका अधिकात अधिक पैसा खर्च करून विद्यार्थ्यांच्या क्रीडा प्रवृत्तीला वाव दिला आहे. क्रीडा क्षेत्रात निपुण असलेल्या विद्यार्थ्यांसाठी खास मार्गदर्शनाचीही व्यवस्था केली होती.

## अनामिका :

विद्यार्थ्यांच्या निर्मितिक्षमतेला अवसर मिळावा व त्यांना नवनिर्मितीसाठी अधिकात अधिक प्रोत्साहन मिळावे म्हणून ' अनामिका ' हे भित्तिपत्रक चालविले जाते. यातून मराठी, हिंदी, इंग्रजी साहित्य प्रसिद्ध केले जाते. यातील अनेक मुला-मुलींचे साहित्य श्रेष्ठ अशा मासिकांतून प्रसिद्ध झाले आहे.

## इतर अभिनव उपक्रम :

विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होण्यासाठी महाविद्यालयात मराठी-हिंदी-इंग्रजी वाङ्मय मंडळे, वादविवाद मंडळ, कॉमर्स असोसिएशन, प्लॅनिंग फोरम, सांस्कृतिक मंडळ, सहल मंडळ, आदींची स्थापना करण्यात आली. या मंडळातर्फे व्यासंगी, विद्वानांची व्याख्याने आयोजित केली जातात. विद्यार्थ्यांचे वाद-विवाद आयोजिले जातात. जयंत्या, पुण्यतिथ्या आदी साजऱ्या केल्या जातात. या वर्षी या विविध मंडळांतर्फे पुढील सुप्रसिद्ध विद्वानांची व्याख्याने झाली. पं. महादेवशास्त्री जोशी, डॉ. मगट्ट (जर्मनी) प्राचार्य भा. शं. भणगे, प्राचार्य जे.सी. सिन्हा, श्रीधर तेलवेकर, प्रा. रा. श्री. जोग, प्रा. पा. ना. कुलकर्णी, प्रा. भानुशाली, प्रा. डी. पी. मिश्रा, रावसाहेब व्ही. टी. पाटील, डॉ. घळी, डॉ. गुणे, श्री. शशीकांत शहा, श्री. अलूरकर इ.

आमचे विद्यार्थी सर्वच क्षेत्रात अति उत्साहाने भाग घेऊन महाविद्यालयाच्या कीर्तीत सतत भर घालीत आहेत. शिवाजी विद्यापीठात बांधल्या जात असलेल्या आप्पासाहेब पवार वसतिगृहाच्या श्रम-कार्यात येथील विद्यार्थ्यांनी भाग घेतला. गडहिंग्लजमध्ये डॉ. गुणे यांनी आयोजिलेल्या मोफत शस्त्रक्रिया शिबिरात मुला-मुलींनी उत्साहाने भाग घेतला. कॉमर्स असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी येथून जवळच असलेल्या दुडगे गावाचे आर्थिक सर्वेक्षण केले. ताराराणी विद्यापीठातर्फे कोल्हापूर येथे सरबच्या जागेत उभारण्यात येणाऱ्या ताराराणी पुतळ्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थी यांतर्फे ६०१ रु. ची देणगी दिली. शिवाजी विद्यापीठात स्थापिलेल्या माधव ज्यूलियन स्मारक निधीसाठी येथील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी ११६ रुपये दिले. अशा रीतीने महाविद्यालयीन व महाविद्यालयबाह्य अशा क्षेत्रात आमचे विद्यार्थी सतत पुढे आहेत.

## शिष्यवृत्त्या :

महाराष्ट्र सरकारकडून गुणवत्ताधारी मुलामुलींना शिष्यवृत्त्या मिळतातच. परंतु मागासलेल्या, दुर्लक्षित व उपेक्षित अशा मुलामुलींची महाविद्यालयीन शिक्षणाची तहान भागविण्यासाठी

त्यांना अधिकात अधिक सोयी उपलब्ध करून देण्यात येतात  गरीब व हुषार विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाकडून दरवर्षी शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

## इमारत :

महाविद्यालयाची अजूनही स्वतःची इमारत नसल्याने दुसऱ्याच्या इमारतीत प्रपंच थाटावा लागला आहे. त्यामुळे महाविद्यालयाची वेळ सकाळी ७ ते ११ ही ठेवली गेली आहे. यावर्षी गडहिंग्लज–कोल्हापूर रोडवर महाविद्यालयासाठी १४ एकर जमीन घेतली असून महाविद्यालयाची स्वत:ची अशी भव्य आणि देखणी वास्तू ३ लक्ष रुपये खर्चून लवकरच बांधण्यात येत आहे महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीला लागूनच ग्रंथालय, अभ्यासिका, वसतिगृह, खुले नाटयगृह इ वास्तूंची उभारणी करून आकर्षक व भव्य असे क्रीडांगणही तयार करण्यात येणार आहे.

## कृतज्ञता आणि विनंती :

'शिवराज'ला आंतरिक गुणवत्ता देणारा विद्यार्थी लेखक वर्ग व बाह्यत: रूपकळा प्राप्त करून देणारा श्रमिक वर्ग : एकंदरीत 'शिवराज'ची अंतर्बाह्य जडणघडण करणाऱ्या सर्वांबद्धलच कृतज्ञता व्यक्त करून जर काही या पहिल्याच वार्षिकांकात उणीवा दिसत असल्या तर सहृदयांना ज्ञानेशमाउलीच्या शब्दात शेवटी

न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असे ॥

सोने-रुपे ही संपत्ती नव्हे, माणसे हीच खरी संपत्ती आहे संपत्तीच्या खऱ्या नसा गडद लाल रंगाच्या आहेत; खरी संपत्ती धरतीच्या पोटात नसून जिवंत माणसात आहे. आणि जर हे सत्य असेल तर, सगळ्या संपत्तीची अंतिम पूर्ती विशाल छातीची, तेजस्वी डोळ्यांची, आनंदी हृदयाची माणसे जितकी जास्त निर्माण करता येतील तितकी करणे यात आहे. तोच अर्थशास्त्राचा खरा नियम आहे, हे लक्षात येईल.

# मराठी विभाग

'... सत्याची तमा बाळगणारे भेकाड नको. मानवी स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठे करिता गोळ्या झेलण्याची त्यांची तयारी हवी ... तुमची आहे काय ? ...'



# — महात्मा गांधींचे आध्यात्मिक जीवन —



म. गांधींची ओळख नव्या पिढीला भारताचे स्वातंत्र्यदाते म्हणूनच बहुदा आहे. पण त्यांच्या जीवनाचे ध्येय ईश्वरी साक्षात्कार हेच होते. तुकाराम–तुळसीदासाइतकेच ते त्यासाठी तळमळत. या आध्यात्मिक मार्गावर गांधीजी कोठे उभे होते व त्यात त्यांना किती यश आले होते, याचा ओझरता आढावा घेऊन, गांधीजीचा आंतला आवाज, त्यांचा चरखा, त्यांचे पारमार्थिक अनुभव या सर्वांचे ओझरते दर्शन 'शिवराज' च्या वाचकांना करून देणे हे गांधी जन्मशताब्दी वर्षानिमित्त माझे कर्तव्य वाटते.

महात्मा गांधींच्या आध्यात्मिक शिकवणुकीत चरख्याला अग्रस्थान आहे. चरखा चालविणे व चालविण्यास दुसऱ्यांना सांगणे हेच त्यांच्या जीवनाचे एकमेव ध्येय होते. या भक्कम पायावर त्यांनी आपले नीतिशास्त्र व आध्यात्मिक विचार यांची भव्य इमारत उभी केली. चक्राची कल्पना आपण भगवद्गीतेतून घेतली असे गांधीजी स्पष्टपणे सांगत. दहाव्या शतकात इजिप्तच्या एका पंडिताने व तत्त्वज्ञाने 'अिस्लामी चक्राची' कल्पना विशद केली. त्यावर २५० वर्षांपूर्वी शेक इब्राहिम संफी यांनी एक टीकात्मक भाष्य लिहिले, त्यातून काही महत्त्वाचे विचार आपण घेतले असे महात्माजी सांगत. हे इस्लामचे 'स्वर्गीय चक्र', उपनिषत्कालीन 'ब्रह्मांडचक्र' व भागवतकालीन 'राशीचक्र' या कल्पनानंतर आणखी दोन चक्रांचा विचार केला असता 'बुद्धधर्मातील धर्मचक्र' याचाही महात्माजींच्या विचारावर फार मोठा परिणाम झाला असला पाहिजे. कबिराचे 'योगचक्र' ही तर गांधीजींच्या चक्राची प्रतिमाच आहे. कारण कबीर स्वतः कोष्टी होता. तो सूत कातत असे व विणीत असे. वरील सहाही चक्रे ज्या आध्यात्मिक चक्राच्या नुसत्या प्रतिकृती, जे या सर्वांच्या मुळाशी आहे व ज्यामुळे या सहाही चक्रांना खरेपणा प्राप्त होतो त्या आध्यात्मिक चक्रांचा महात्माजींच्या विचारावर परिणाम होता हे उघड आहे.

गुजरातमध्ये प्रत्येक तत्वप्रणाली प्रचलीत होती. त्यांपैकी जैनधर्म, वल्लभी वैष्णवसंप्रदाय व गुजरातेतील भक्तिमार्ग या तीन विचार प्रवाहांचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला होता.

---


श्री जयन्त सबनीस

द्वितीय वर्ष साहित्य


---

महात्माजींनी या आध्यात्मिक जीवनात स्वतंत्र अशी एक भर घातली हे पहाण्यापूर्वी प्रथम त्यांची देवाविषयी काय कल्पना होती तसेच कोणत्या नैतिक व पारमार्थिक सद्गुणावर ते जोर देत हे पाहिले पाहिजे.

आपण अधिक अभ्यासू वृत्तीने गांधीजींच्या जीवनाकडे पाहू लागलो की आपल्या सहज लक्षात येईल की महात्माजींचा आध्यात्मिक प्रगती इतर संतांच्याच मार्गाने झाली. ईश्वराबद्दल जिज्ञासा, नैतिक व पारमार्थिक सद्गुण संपादन, परमार्थ मार्गाचा प्रवास, जीवात्म्याची अंधारी रात्र व परमेश्वर साक्षात्कार या सर्व संतांच्या पारमार्थिक प्रगतीच्या पायऱ्या आहेत. हीच गोष्ट त्यांच्या परमार्थ प्रगतीच्या बाबत खरी ठरते.

म. गांधीजी एकदा म्हणाले की "मी चरख्याची कल्पना भगवद्गीतेवरून घेतली. याचा अर्थ असा नव्हे की सूत कातणाऱ्या चरख्याची कल्पना भगवद् गीतेच्या कर्त्याच्या मनात होती. श्री कृष्णानी मानवी आचाराचे एक तत्त्व गीतेत मांडले त्याचा अर्थ समजून घेवून ते तत्त्व भारत राष्ट्रास लागू करण्याचा मी प्रयत्न केला, तेव्हा चरख्यावर सूत कातणे हे सर्वांत योग्य व सनार्वी स्वीकारणीय असे शारीरिक यज्ञ-कर्म आहे असे मला वाटते या पेक्षा जास्त अुदात्त किंवा राष्ट्रीय असे दुसरे कोणतेच तत्त्व मला दिसत नाही."

गांधीजींचा चरखा म्हणजे गीता, बुद्धधर्म व कबीराचे तत्त्वज्ञान या तीन तात्त्विक व व्यावहारिक विचार प्रवाहांचा त्रिवेणी संगम आहे, असे म्हणण्यास काहीच हरकत नाही गीतेचा अर्थ 'रूपक' यादृष्टीने लावला पाहिजे असे त्यांचे मत होते. महाभारत व रामायण या दोन ग्रंथांबाबत त्यांचे असेच मत होते. "हे दोन ग्रंथ म्हणजे नैतिक व पारमार्थिक तत्त्वाचे आलंकारिक भाषेत केलेले वर्णन होय. हे ग्रंथ म्हणजे रूपक आहेत हे सिद्ध करण्यास या ग्रंथातच आधार मिळतो. अज्ञान व ज्ञान या दोन सैन्यामध्ये मनुष्याच्या अंतःकरणात अनादिकालापासून सदैव जे द्वंद्वयुद्ध चाललेले असते त्या संबंधी या प्राचीन ग्रंथात चर्चा केली आहे.' या महाकाव्यांचे ध्येय 'युद्ध' नसून 'शांती' आहे असा त्यांचा दावा होता.

डॉ. रविंद्रनाथांनी चरख्यावर टीका करताना 'मॉडर्न रिव्ह्यू' मध्ये एकदा लिहिले की "स्वराज्य मिळवावयाचे झाले तर नुसते वस्त्र विणून चालणार नाही, तर सर्व शास्त्रांमध्ये सर्वांगीन विकास झाला पाहिजे माणसापेक्षा मन जास्त जबरदस्त आहे' त्या टीकेला अुत्तर देताना महात्माजींनी आपल्या यंग अिंडीयामधून लिहिले की 'स्वराज्य हे केवळ वस्त्रप्रावरणासाठी नाही. व ते हलक्या दराच्या वस्त्राने येणार नाही. स्वराज्याचा पाया मनात होतो. मनात विविध शक्ती व त्या बद्दल विश्वास निर्माण झाला की स्वराज्य आपोआप मिळेल.

चरखा म्हणजे नैतिक, आर्थिक व पारमार्थिक चिन्ह आहे. महात्माजींच्या जीवनावर जैनधर्माच्या आध्यात्मिक बाजूचा, वल्लभाचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा व गुजराथेतील भक्तिमार्गाचा फार मोठा परिणाम झाला होता. त्याच बरोबर येशू हा मानवाचा एक श्रेष्ठ गुरू आहे. येशू हा पूर्णतेचे प्रतीक होता. केवळ पूर्णता परमात्म्याच्या बाबतीतच शक्य आहे व येशू या पूर्णतेच्या शक्य तितक्या जवळ गेला असे म्हणता येईल. तरीपण त्यांच्या मनावर या धर्माचे संस्कार झाले होते. गांधीजींची कोणत्याच धर्मावर अंधश्रद्धा नव्हती व कोणत्याही धर्म संस्थापकाविषयी विशेष आदर दाखवून एखाद्या ज्ञातीस खूष करण्याची इच्छा नव्हती. प्रत्येक गोष्ट चिकित्सक बुद्धीने तावून सुलाखून घेतली पाहिजे असे त्यांचे मत होते. इस्लाम धर्माचा प्रसार तलवारीच्या जोरावर झाला नाही तर या धर्मात प्रार्थना व प्रेम करणारी एक दीर्घ संतांची किंवा फकिरांची परंपरा निर्माण झाली. या परंपरेमुळे त्या धर्माचा प्रसार झाला. या धर्मातील उपवास व प्रार्थना यांचा त्यांच्या मनावर परिणाम दिसून येतो.

धर्माचे तत्त्व अथवा धर्माचा संदेश काय याचे रहस्य समजावून सांगण्याचा मौलवी अथवा पाद्री यांना अधिकार नाही. त्यांना ते संदेश पूर्ण मौन पाळल्यावेळी व आत्मसमर्पण केल्यावेळी देण्यात आले. त्यांच्या जीवनात या धर्मप्रणेत्यांच्या संदेशाचा खरा अर्थ साठवला होता जोराचा प्रचार म्हणजे धर्म नव्हे. मेंदू मोठा असला म्हणजे त्यात आगाध ज्ञान असते हे खरे नव्हे

धर्माचा उगम अंतःकरणात होतो असे ते म्हणत.

हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन, बुद्ध इत्यादी धर्माचा अभ्यास केल्यावर या सर्व धर्माच्या मुळाशी असलेल्या ऐक्याचे ज्ञान करुन घेणे जरुर आहे. असा निर्णय महात्माजींनी दिला व म्हणूनच ' एक ईश्वर, एक विश्व व एक धर्म' या बद्दल त्यांचा आक्रोश होता.

गांधी हे तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी नसतील, परंतु त्यांनी देवाविषयी प्रगट केलेले विचार तत्त्ववेत्यांनासुद्धा विचारणीय वाटतील. त्यांचे देवाविषयी विचार म्हणजे त्यांच्या अनुभवातून सहज अस्फूर्त झालेले उद्‌गार होत ते काही चिकित्सक बुद्धीच्या आधारे तर्कशास्त्र दृष्टया मांडलेले विचार नव्हेत. म्हणून ज्यांना देवाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावयाचा आहे. त्यांना ते मौलिक वाटतील. देव म्हणजे पुरुष व्यक्ती होय असे त्यांना कधीच वाटले नाही. देव नामरहित व निराकार आहे. त्याचे कारण म्हणजे आपल्याकडे देवाची हजारो नावे आहेत. ते म्हणत माझ्या मते देव म्हणजे सत्य व प्रेम, देव म्हणजे नीती व आदर्श वर्तन, देव म्हणजे निर्भयता, देव म्हणजे प्रकाश व जीवनाचे आगर आहे. देवाच्या अिच्छेविरुद्ध काहीच घडत नाही त्याची इच्छा अव्यय व शाश्वत कायद्याच्या रूपाने प्रगट होते व हे कायदे म्हणजे देव होय त्याचे किंवा त्याच्या कायद्याचे ज्ञान आम्हांस फक्त काचेतून पाहिलेल्या वस्तू प्रमाणे अस्पष्ट होते. परंतु त्याच्या कायद्याच्या अंधूक दर्शनानेही माझे मत आनंद श्रद्धा व भवितव्याबद्दल आशा यानी भरून जाते. अवर्णनीय व गूढ अशी शक्ती प्रत्येक वस्तूत भरून राहिली आहे मला ती भासते अनुभूत होते. परंतु दिसत नाही. देवाची पूजा किंवा प्रार्थना ओठांनी न करता अंतःकरणाने केली पाहिजे असे ते मानत.

प्रार्थना सर्व धर्माचा गाभा आहे व प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचे सारसर्वस्व आहे. एखादी गोष्ट मिळावी म्हणून प्रार्थना करणे किंवा प्रार्थना म्हणजे आत्म्याशी संयोग यात अर्थ नाही. निरर्थक तांत्रिक पठण म्हणजे प्रार्थना नव्हे. नामस्मरणाने आत्मा जागृत झाला नाही तर कितीही रामनामाचा जप केला तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. मनाची देवासाठी तीव्र भूक शांत करण्यासाठी प्रार्थना करावी. भुकेल्या माणसाला मनसोक्त जेवण आवडते त्याप्रमाणे भुकेल्या आत्म्याला अंतःकरणपूर्वक केलेल्या प्रार्थनेने समाधान मिळते.

देवाच्या बाबतीत बुद्धी सामर्थ्यहीन ठरते. श्रद्धा अत्यावश्यक आहे. माझ्या तर्क शक्तीने मी अनेक सिद्धान्त गृहीते खरी व खोटी ठरविली. वादविवादात नास्तिक गृहस्थ मला सहज जिंकू शकेल. माझ्या बुद्धीच्या पुढे माझी श्रद्धा इतक्या वेगाने धावते की मी सर्व जगाचे आव्हान स्वीकारून देव आहे, होता व सदैव राहील असे अट्टाहासाने सांगेन. बाह्य आधाराने साक्षात्कार सत्य आहे हे सिद्ध करता येत नाही. ज्यांनी आपल्या अंतःकरणात साक्षात्काराचा अनुभव घेतला आहे व त्यामुळे त्यांच्या प्रकृतीत व वर्तनात पूर्ण परिवर्तन घडले आहे त्यावरून ते सिद्ध होते. देवाचे मन निश्चल असते. ते दैवी तत्त्व सर्व चराचरामध्ये,प्रत्येकात आहे व ते देवपण माझ्यात जागृत करण्याची अिच्छा म्हणजे प्रार्थना होय.

प्रत्येक साधकाच्या पारमार्थिक जीवनात प्रगति-पथावर वाटचाल करीत असता त्यास निराशमय अंधाऱ्या रात्री झगडावे लागते. हा सामान्य अनुभव आहे. महात्मा गांधीजींच्या बाबतीत या रात्रीची दोन अंगे आहेत एक व्यक्तिगत व दुसरे सामाजिक. अगदी लहानपणापासून त्यांच्या मनात देवाविषयी तळमळ दिसून येते. देव पाहण्यासाठी माझे अंतःकरण तळमळते असे ते सांगत पण ते त्यापुढे म्हणत, 'माझ्या प्रत्येक श्वासाचा मालीक जो परमात्मा आहे तो माझ्यापासून अद्याप अत्यंत दूर आहे हे पाहून मला अखंड यातना होतात. देव सर्वात मोठा हुकूमशहा आहे. कारण अनेकदा अगदी ओठाशी आलेला पेला तो सहज फोडून टाकतो व आम्हास इतके तुटपुंजे स्वातंत्र्य देतो की त्यामुळे त्यास आमची फजिती पाहून गंमत वाटते व म्हणूनच हिंदू धर्मात याला ईश्वरी लीला असे म्हणतात.

जीवात्म्याच्या घोर रात्रीच्या या वैयक्तिक अंगानंतर सामाजिक स्वरूपाचा विचार करू याचा अनुभव

महात्माजींना त्यांच्या जीवनात बऱ्याच वर्षानंतर आला. त्यांच्या काही अवस्थांचा अनुभव त्यांना १९३९ साली आला. यावेळी त्यांना अत्यंत असमाधान वाटत होते. ते म्हणत देवाने अशा गोष्टी का घडू द्याव्यात ?

गांधीजींच्या जीवनाच्या शेवटी, इ. स. १९४७ साली, त्यांनी काढलेल्या अनेक उद्गारावरून ही घोर रात्र घोरतर स्वरूप धारण करीत असल्याचे दिसते. 'माझे बोलणे अरण्यरुदन आहे आता माझ्या मनात काही सामर्थ्य राहिले नाही मी आता पदभ्रष्ट झालो आहे माझ्या शब्दास कोणी मान देत नाही. विमाने, लढाऊ जहाजे इत्यादिकांच्या यांत्रिक युगात मला काहीच किमत राहिली नाही. कोणीही माझी फिकीर करीत नाही, मी जुना पुराणा व नालायक झालो असे त्याना वाटू लागले. त्यांच्या आयुष्याचा शेवट जवळ येत चालला असे त्याना वाटू लागले. लोक मला म्हणतात की तुम्ही १२५ वर्षे जगा परंतु दीर्घायुष्याची माझी अिच्छा नष्ट झाली आहे. लोकांवर माझी सत्ता केवळ नैतिक स्वरूपाची आहे याची कोणालाच कदर नसेल तर मला समाजाशी काहीच कर्तव्य नाही. निर्दयपणा थैमान घालीत आहे. आता हिंसेचे साम्राज्य चालले आहे अशावेळी अहिंसेचा प्रसार करण्यास देवाच्या हातातील मी एक साधन होऊन रहावे अशी देवाची अिच्छा असेल तर मी मौन धरून प्रार्थना करावी हे एकच माझे हत्यार आहे. १९४७ सालच्या शेवटी ते म्हणाले, 'समाजाला माझी आता काहीच मदत होणार नसेल तर देवाने मला आपल्याकडे न्यावे हिंदु–मुसलमान बंधू एकमेकांचा खून करणे बंद करणार नसतील व हिंदुस्थानचा नाश अटळ असेल तर या पृथ्वीच्या नाट्य मंदिरातून मला बाहेर न्यावे हे बरे,'

अशा प्रकारच्या सामाजिक दीर्घ व घनदाट अंधकारमय रात्री गांधींना प्रवास करावा लागला व त्यांना शेवटी परमेश्वराचे अंधुक दर्शन घडले.

महात्मा गांधींना आध्यात्मिक अनुभव बऱ्याच लहान वयात येण्यास आरंभ झाला असावा व त्याची अुच्चतम प्रगती त्यांच्या जीवनाच्या शेवटी झाली असावी असे दिसते. प्रथम अवस्थेत अनाहत नादाशी समान अशा त्यांच्या ' आंतील आवाजा ' बद्दल त्यांचे उद्गार आहेत. दुसऱ्या अवस्थेत या आंतर आवाजातून त्यांना अनेक संदेश मिळाले. शेवटच्या अवस्थेबाबत त्यांचे उद्गार अगदी निःसंदिग्धपणे निर्दिष्ट केले आहेत.

पहिल्या अवस्थेबाबत त्यांनी १९३६ साली एक सामान्य विधान केले. हा दिव्य आवाज आपल्या अंतःकरणात सतत चालू असतो. फक्त अगदी थोड्या लोकांना मात्र तो ऐकू येतो. अिंद्रियांच्या गलबलांत हा नाजुक, बारीक आवाज बुडून जातो म्हणून लोक तो ऐकू शकत नाहीत. जे अिंद्रियांवर जय मिळवितात त्यांना हा दिव्य आवाज ऐकू येतो. अशा प्रकारचे नाद १९४० व १९४८ साली ऐकू आल्याचे नमूद केले आहे. या दोन्ही वेळी आपण कोणता मार्ग स्वीकारला याबाबत आपल्या आंतर आवाजाने अचूक मार्गदर्शन केले.

दुसऱ्या अवस्थेबाबत ते एके ठिकाणी म्हणतात की लोकांना त्यावेळी नुसता आंतर आवाज अैकू आला असे नाही तर त्यातून निघालेले शब्द आपण स्पष्ट ऐकले.

अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी आपणास दोन निरनिराळे संदेश मिळाले असे ते सांगतात. पहिला १९३३ व दुसरा १९३८ साली घडला. पहिल्या वेळी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ असावा काय ? यावेळी आपणास संदेश मिळाला व दुसऱ्यावेळी अस्पृश्यांना निवारण्यासाठी त्यानी २१ दिवस उपवास केला तेव्हा ते म्हणतात त्यावेळी मी झोपलो होतो. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास कोणीतरी मला एकदम जागे केले आणि एक आवाज कुजबुजला "तू उपवास केला पाहिजेस." मी विचारले किती दिवस. "एकवीस दिवस" व "उद्यापासून सुरू कर" असा आवाज म्हणाला, हे संदेशाचे स्पष्ट शब्द आहेत.

गांधीजींचे म्हणणे खरे मानण्यास आधार आहे. साधकास परमार्थात मार्गदर्शन करण्याचे देवाच्या मनात आले तर, देवाची इच्छा काय आहे हे अंधूकपणे साधकास दिसणे अशक्य नाही. वरील अनुभव म्हणजे विकृत मेंदूचा भ्रम किंवा आत्मवंचना आहें याबद्दल तत्ववेत्ते आपसात वादंग करू देत पण अनुभवाचे सामर्थ्य, मनाचा संयमीतपणा व संदेशाच्या बरहुकूम नंतर घडलेली वस्तूस्थिती या सर्वांवरून हा देवाकडून मिळालेला संदेश सत्य होता हे निःसंशयपणे सिध्द होते.

O O

# अप्रगत राष्ट्र आणि आर्थिक नियोजन

कुंभार बी. जी.
तृतीय वर्ष साहित्य

मानवी जीवन हे संघर्षमय आहे. ते वैषम्याने भरलेले असूनही उच्च आणि उन्नत आहे. असत्याकडून सत्याकडे, अंधारातून प्रकाशकाडे आणि मृताकडून अमृताकडे चाललेली त्याची वाटचाल कायम आहे. बुद्धीला भावनेची आणि कल्पनेला कतृत्वाची जोड देऊन आपले इप्सित साध्य करण्यासाठी मनुष्य नेहमीच धडपडत असतो त्यासाठी गरुडझेप घेत असतो. हीच अवस्था प्रत्येक राष्ट्राची असते. मानव जातीची, राष्ट्रीय वृत्तींची नि प्रवृत्तींची सौख्याकडे धाव घेण्याचा ही परंपरा,हा संघर्षाचा इतिहास पाहिला असता कळून येईल की, प्रत्येक राष्ट्र हे आपल्या सर्वांगीण उन्नतीसाठी नेहमीच झटत असते. काही राष्ट्रे सामर्थ्यवान आणि संपन्न असली तरी अनेक राष्ट्रे कमकुवत आणि दरिद्री असल्यामुळे जागतिक स्वरूपाचे आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत, होताहेत. काही राष्ट्रे विकसित झालेली आढळून येत असली तरी अनेक राष्ट्रे अविकसित-अर्धविकसित आहेत. तेव्हा— "अप्रगत राष्ट्र आणि आर्थिक नियोजन–' याचा विचार करताना प्रथमतः 'अप्रगत राष्ट्र' म्हणजे काय हे समजावून घेणे आवश्यक आहे.

## अप्रगत राष्ट्र

प्रगत आणि अप्रगत राष्ट्रे यात भेद कसा करावा व त्यांची वर्गवारी कशी करावी या बाबतीत विचारवंतात जरी एकमत आढळून येत नसले तरी अप्रगत राष्ट्राची काही प्रमुख लक्षणे पुढीलप्रमाणें सांगता येतात–

## दरडोई उत्पन्न

१) Low per capita-income

अप्रगत राष्ट्राचे पहिले लक्षण म्हणजे तेथील दरडोई उत्पन्न कमी असते. 'नॅशनल ॲडव्हायसरी कौन्सिल ऑन इंटरनॅशनल मोनेटरी ॲंड फिनान्सियल प्रॉब्लेम्स' या संस्थेने राष्ट्राची विभागणी तीन विभागात केली आहे.

१) २०० डॉलर अगर त्याहून जास्त दरडोई उत्पन्न असणारे ते पूर्णविकसित राष्ट्र ! उदा.– इंग्लंड, अमेरिका, जर्मन इत्यादी.

२) १०० ते २०० डॉलर दरडोई उत्पन्न असणारी ती अर्धविकसित राष्ट्रे ! उदा - फिनलंड, ऑस्ट्रिया, इटली, ग्रीस इ.

३) १०० डॉलरपेक्षा कमी म्हणजे सरासरी भारतीय ५०० रुपायांपेक्षा दरडोई उत्पन्न कमी असणारे ते अविकसित राष्ट्र. उदा.— चीन, भारत, इंडोनेशिया, ब्रम्हदेश इ.

भारताचे दरडोई उत्पन्न ३३० रुपये असून तिसऱ्या योजनेच्या शेवटी ते ३८५ रु. होईल असा अंदाज होता पण तो साफ चुकला !

## २) व्यवसाय

जेथे शेती हाच प्रमुख व्यवसाय असून, लोकांचे अधिक प्रमाण उद्योग धंद्याऐवजी शेतीत असते; ते अविकसित राष्ट्र होय. भारतात ७८ टक्के शेती व १८ टक्के उद्योगधंदे असे हे प्रमाण आढळते. लोकसंख्येची वाटणी शहर आणि ग्रामीण विभागात ज्या प्रमाणात झालेली असते त्यावरूनही देश विकसित की अविकसित

हे स्पष्ट होते. भारतात ८० टक्के लोक ग्रामीण विभागात असल्याचे आढळते.

## ३) जनन–मृत्यू प्रमाण व आयुर्मान

अविकसित राष्ट्रात जनन व मृत्यू प्रमाण ही दोन्ही ही अधिक असतात. त्यामुळे लोकसंख्येचा प्रश्न नेहमीच भेडसावीत असतो. तसेच तेथील आयुर्मान हे विकसित राष्ट्रापेक्षा अत्यंत कमी असते. भारतातील आयुर्मान ३५ ते ४० वर्षे आहे प्रगत राष्ट्रात ते ६० ते ६५ वर्षे इतके आहे. शिवाय अविकसित राष्ट्रात लोकसंख्या ज्या वेगाने वाढते त्या वेगाने उत्पादन वाढत नाही.

## ४) राहाणीमान

राहाणीमान हे अत्यंत निकृष्ठ दर्जाचे असते. जीवनावश्यक गरजा देखील पूर्णपणे भागविल्या जात नाहीत. बेकारी व अर्धपोटी उपासमार असे प्रकार आढळतात.

अशा अवस्थेत उत्पादनाचे प्रमाण अत्यंत कमी व लोकसंख्येचे प्रमाण अतिशय जास्त असतें. त्यामुळे राहाणीमान खालावते. राष्ट्रीय उत्पन्न व त्याचबरोबर व्यक्तींचे सरासरी उत्पन्न खालावते. बचत होऊ शकत नाही. भांडवल कमी असल्यामुळे उद्योगधंदे वाढत नाहीत. भांडवलाच्या अभावी आधुनिक पध्दतीने शेती करुन सुधारलेली बी-बियाणे व खते वापरून उत्पादन वाढविता येत नाही. त्यामुळे बेकारी भरमसाठ वढते. निर्यात खालावते, आयात वाढते. अशाप्रकारे राष्ट्राची गरिबी हीच त्या राष्ट्राला गरिबीत टेवण्यास कारणीभूत होते. (A country is poor because it is poor) अशावेळी त्या देशात आर्थिक नियोजनाची अत्यंत आवश्यकता असते.

## आर्थिक नियोजन

प्रथमत: अनियोजित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार 'अडमस्मीथ' या अर्थशास्त्राच्या जनकाने केलेला पहावयास मिळतो. पण पुढे त्यातील दोष अधिक प्रमाणात जाणवत गेल्यामुळे नियोजित अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करण्यात आला. आर्थिक नियोजनाच्या अनेक व्याख्या निरनिराळ्या दृष्टिकोनातून दिलेल्याही पहावयास मिळतात प्रो. रॉबिन्सन् म्हणतात " सर्वच आर्थिक व्यवहारात नियोजनाची आवश्यकता असते. नियोजन म्हणजे विशिष्ठ उद्देशानुसार कार्य करणे; निवड करणे होय. निवड करणे आणि नियोजन करणे हे सर्व आर्थिक व्यवहाराचे मूलतत्त्व आहे आर्थिक नियोजन ही शब्दरचना विशिष्ट अर्थाने आपण वापरित असतो. त्यामध्ये मध्यवर्ती नियंत्रण, सरकारी हस्तक्षेप, आर्थिक उद्दिष्टे आणि ती साधण्यासाठी विशिष्ठ मार्गांचा किंवा पद्धतींचा अवलंब या सर्वांचा समावेश त्यांत केलेला असतो आणि देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्वरूपाशी निगडीत असणारी अशी ती अर्थव्यवस्था असते "

१) प्रो. एच् डिकिन्सन–"आर्थिक नियोजन म्हणजे एकूण सर्व अर्थव्यवस्थेचा तपशीलवार आढावा घेऊन कोणते आणि किती प्रमाणात उत्पादन करावयाचे; कसे, केव्हा आणि कोठे करावयाचे आणि ते कशाप्रकारे वाटून द्यावयाचे अशा स्वरूपाचे महत्त्वाचे आर्थिक निर्णय निश्चित अशा सत्ताधारी समितीने जाणीवपूर्वक घेणे होय. "

२) भारताच्या नियोजन मंडळाने नियोजनाची व्याख्या करताना म्हटले आहे,–

"A way of organising and Utilizing resourse to maximum advantage in terms of defined social end "

( देशातील साधन सामुग्री संघटित करून तिचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेऊन ठरलेली सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्याकरिता आखण्यात आलेला मार्ग किंवा पद्धती होय. )

नियोजनबध्द अशी राष्ट्राची प्रगती घडवून आणण्याचा पहिला मान रशियाचा मान आहे त्यांच्या नियोजनातूनच 'नियोजनाचे अर्थशास्त्र' निर्माण झाले

आहे. आशिया आणि आफ्रिका खंडांत हे तत्त्व मार्गदर्शक ठरले आहे. नियोजनाची खरी सुरवात रशियाने १९२८ ते १९३३ या काळात केली. अमेरिका जे १५० वर्षांत करू शकली नाही ते रशियाने ५० वर्षांत करून दाखविले. सामाजिक सुखासाठी वैयक्तिक सुखाचा त्याग करण्याची जी कामगिरी रशियाने केली तिला साऱ्या विश्वात तोड नाही. "भारताच्या पंचवार्षिक योजनांचा तोंडवळा बराचसा रशियासारखा वाटत असला तरी भारताने काही बाबतीत भांडवलशाही विचारसरणी व काही बाबतीत समाजवादी विचारसरणी असा सुवर्णमध्य साधून 'मिश्र अर्थव्यवस्था' स्वीकारली आहे. दोन्ही पथांना आपापले संसार थाटण्यास परवानगी दिली आहे. परंतु याचा परिणाम दोन्ही पद्धतींचे दोष तेवढे एकत्र येण्यात झाला. त्यामुळे या दोन्ही तलवारी एकाच म्यानात ठेवण्याचा हा केविलवाणा प्रयत्न ठरून आपल्या नियोजनाचा फज्जा उडाला.

## नियोजनाचे स्थान

मुख्यत्वेकरून अविकसित राष्ट्रात नियोजनाचे स्थान हे अनन्य साधारण असेच आहे. उपभोग्य वस्तू योग्य प्रमाणात पुरवून भविष्यकाळातील वाढत्या लोकसंख्येच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन उपभोग्य वस्तूंचे प्रमाण सतत वाढविण्याचे कार्य नियोजन करीत असते. नियोजन हे मुख्यत्वेकरून तीन क्षेत्रात कार्य करीत असते.

## १) शेती

अन्न वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा भागविण्याचे प्रमुख साधन म्हणजे जमीन! त्यामुळे नियोजन पद्धतीने किफायतशीर शेती करून जास्तीत जास्त अन्नधान्य निर्माण करणे आवश्यक असते. शेतीपासून मिळणारा कच्चा माल कापूस, ताग, खनिज वगैरे यापासून पक्का माल देशातच तयार करून आर्थिक प्रगती घडवून आणता येते.

## २) बँका

उत्पादक घटक मिळविण्यासाठी व ते कार्यान्वित करण्यासाठी पैशाची अत्यंत आवश्यकता असते. पत-पैसा निर्माण करून भांडवल पुरविण्याचे महत्त्वाचे कार्य बँका करीत असतात. या भांडवलाचा नियोजित योजनासाठी योग्य वापर करून राष्ट्रीय उन्नती घडवून आणता येते. बचतीचे प्रमाणही वाढविता येते.

## ३) दळणवळण

राष्ट्राची प्रगती घडवून आणण्यासाठी दळणवळणाची सोय महत्त्वाची मानली जाते. यासाठी वाहतूक जलद स्वस्थ व आर्थिक नियोजन सर्व केंद्रांना पोहोचणारी असावी लागते. व्यापारवाढीसाठी व देशाच्या एकूण प्रगतीसाठी वाहतूक महत्वाची असल्याने त्यावर बरीच प्रगती अवलंबून असते.

## आवश्यक गोष्टी

१) उपभोगाचे प्रमाण ठरवून त्या प्रमाणात सर्व घटक न वापरता काही घटक गुंतवणुकीच्या क्षेत्रात गुंतवावे लागतात. अशा वस्तू निर्माण होण्याचा काल प्रदीर्घ असतो. या अधिक उत्पादक वस्तूंना त्यांच्या कार्याबद्दल उत्पन्न मिळत असते पण त्या प्रमाणात उपभोग्य वस्तू निर्माण न झाल्याने मागणी व पुरवठा यांचा समतोल बिघडतो. वस्तूंच्या किमती वाढतात. त्याचबरोबर उत्पादक वस्तूंच्या निर्मितीसाठी परकीय यंत्रसामुग्रीची आयात करावी लागते. परकीय वस्तूंची आयात केली असता ती देण्याकरिता आयात घट व निर्यात वाढ करावी लागते. त्यामुळे किमती अफाट वाढतात. परंतु ही परिस्थिती विशिष्ट कालापुरतीच मर्यादित असते. हा काळ संपल्यानंतर उपभोग्य वस्तूंचा प्रचंड प्रमाणात पुरवठा होऊन वस्तूंच्या किमती किमान पातळीवर येऊ शकतात. अशावेळी लोकसंख्येची वाढ वेगाने होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक ठरते. कारण उपभोगाचे प्रमाण अमर्याद वाढते. त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण वाढविणे शक्य होत नाही.

२) नियोजन हे केवळ सरकारचे नसून ते जनतेचे असते त्याकरिता जनतेने संपूर्ण व सक्रीय सहकार्य देणे आवश्यक असते. भारताची दुसरी पंचवार्षिक योजना कोसळण्याच्या इतर कारणाबरोबरच महत्त्वाचे कारण म्हणून जनतेचा योग्य पाठिंबा मिळू शकला नाही हेच सांगता येईल

३) नियोजन हे राष्ट्रातील विशिष्ट प्रदेशापुरते, विशिष्ट जनतेपुरते असता नये. तसे झाल्यास सर्व जनतेला आवश्यक अशा उपभोग्य वस्तू न मिळता विशिष्ट प्रदेशातील जनतेला व विशिष्ट विभागालाच नियोजनाचा फायदा मिळेल. याचे पर्यवसान श्रीमंत अधिक श्रीमंत व गरीब अधिक गरीब होण्यात होईल. १९५० पूर्वीच्या भारतातील आर्थिक विषमतेपेक्षा नियोजन काळातील आर्थिक विषमता 'भीषण' आहे ही गोष्ट बऱ्याच अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केली आहे ' नियोजनाची दुःस्थिती ' या लेखात प्रा. भणगे लिहितात – ' नियोजणासाठी अनुकूल अशी हवा आज भारतात दिसत नाही ' ही चिंतनीय गोष्ट होय.

४) नियोजन हे सर्वगामी असावे. शेती, उद्योगधंदे, वहातूक, खाणकाम, परराष्ट्रीय व्यापार या सर्वांचा विकास समतोलतेने ज्या नियोजनाद्वारे घडविला जातो तेच नियोजन यशस्वी होते.

५) अप्रगत राष्ट्रात शिक्षणाजी आभा असते त्यामुळे नियोजनाची संपूर्ण माहिती जनतेला देवून संपूर्ण जनतेचा पाठिंबा मिळविणे असंभवनीयच ! तसेच अप्रगत राष्ट्रातील नियोजने बऱ्याच अंशी परदेशी मदतीवर अवलंबून असतात. त्यामुळे ती लुळी व पांगळी असतात.

६) नियोजनपूर्व काळात अप्रगत राष्ट्रात कच्च्या मालाची निर्यात व पक्क्या मालाची आयात अशी स्थिती असते. हे बदलून कच्च्या मालाची निर्यात होणार नाही याकडे लक्ष देवून त्याचा वापर देशी कारखान्याकरिता करुन पक्क्या मालाचीच निर्यात करावी.

७) देशाचे क्षेत्र व्यापक असेल तर हजारो अधिकारी व लाखो सेवक यांवर सर्वस्वी नियोजन अवलंबून असते. त्यांना जबाबदारीची जाणीव नसेल तर नियोजन यशस्वी होणे अशक्य !

८) आर्थिक नियोजनाला भांडवलदारवर्ग, व्यापारीवर्ग, सावकार असा विशिष्ट गट विरोध करीत असतो. सामाजिक, राजकीय व आर्थिक सत्ता कोणत्या ना कोणत्या स्वरुपात त्यांच्याच हाती असते. त्यामुळे नियोजनात अडथळे निर्माण होऊन ते अयशस्वी होण्याची लक्षणे दिसू लागतात.

एकंदर अप्रगत राष्ट्रांना आपली प्रगती घडवून आणावयाची असेल, इतर राष्ट्रांच्या खांद्याला खांदा लावून सुखाने जगावयाचे असेल तर सर्वव्यापी-सर्वस्पर्शी अशा विशाल आर्थिक नियोजनाशिवाय गत्यंतर नाही. ज्यावेळी प्रत्येक राष्ट्रातील आर्थिक नियोजने खऱ्या अर्थाने यशस्वी होतील तेव्हाच रविंद्रनाथांचे ते गीत खऱ्या अर्थाने निनादेल–

"सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम्
सस्य शामलाम् मातरम् वन्दे मातरम् !!"

"अस्पृश्यता निवारण करणे हे सवर्ण हिंदूंच्या दृष्टीने प्रायश्चित घेणेच होय. हिंदू धर्माच्या दृष्टीनेही ते त्यांचे कर्तव्यच ठरते. त्यायोगे शुद्धी व्हावयाची ती 'अस्पृश्यां'ची नव्हे, तर तथाकथित उच्चवर्णियांची. खास 'अस्पृश्यां' चा असा कोणता दुर्गुण नाही–घाणेरडपणा, आरोग्यहीनता हेही नाहीत."

– म. गांधी

## वार्षिक स्नेहसम्मेलन....



'महाविद्यालयाचे शिक्षण हे पुस्तकी असता कामा नये...!'

प्रमुख पाहुणे : प्राचार्य भा. श. भणगे

□

उपस्थित प्रतिष्ठित जनसमुदाय



## महाराष्ट्र वीरांगना :

# महाराणी ताराबाई

कु. मीना रामचंद्र कुलकर्णी
पदवीपूर्व, सर्वहित

महाराष्ट्रियांच्या स्वाभिमानाचे व पराक्रमाचे प्रेरणास्थान असलेल्या छत्रपती शिवरायांची महाराणी ताराबाई ही स्नुषा होय. सतत वृद्धिंगत जाणारे असे तिचे स्मारक निश्चयाने [illegible] ताराराणी विद्यापीठाच्या रूपाने माननीय डॉ. व्ही. टी. पाटील साहेब यांनी निर्माण केले. आमचे हे महाविद्यालय हे ताराराणी विद्यापीठाचे अविभाज्य असे अंग आहे. तेव्हा माझ्या महाविद्यालयीन बंधु भगिनींना महाराणी ताराबाईचे अष्टपैलू व्यक्तिदर्शन घडविण्याचा मी येथे प्रयत्न करते आहे.



" मोगलानो, तुमच्या विनाशाची आता वेळ आली आहे, सांभाळून रहा. ही भद्रकाली ताराराणी अत्यंत त्वेषाने लढत आहे. तुमची सर्व सेना तिने यमसदनाला पाठवीन आहे. दिल्लीच्या सम्राटाचे तेज नाहिसे झाल्याने दिल्ली दीनवाणी झाली आहे.

वरील कवनात मोगलांना आपल्या ओजस्वी काव्य वाणीने कवी गोविंद परमानंदांनी इशारा दिला आहे.

मोगलांचा काळ असणारी ही भद्रकाली ताराराणी महाराष्ट्राची निर्मिती करणाऱ्या श्री छत्रपती शिवरायांची स्नुषा होय. छत्रपती शिवरायांच्या महाराणी ताराबाई व येसूबाई या दोन्ही स्नुषा त्यांना साजेशाच कर्तृत्ववान निघाल्या. मराठ्यांचा इतिहास ज्या स्त्रीरत्नांनी उजळून निघाला आहे अशा त्या स्त्रीरत्नांपैकीच एक रत्न म्हणजेच महाराणी ताराबाई !

शिवरायांच्या अष्टप्रधान मंडळातील एक वीररत्नच ! अशा हंबीरराव मोहित्यांची महाराणी ताराबाई अत्यंत लाडकी लेक होती ! हिचा जन्म इ. स. १६७५ च्या सुमाराला झाला. जात्याच तिला लहानपणापासून युद्धकलेची, घोड्यावर स्वार होण्याची प्रबळ इच्छा होती. ही तिची अनिवार ओढ पाहून पित्याने तिला स्वतः बरोबर युद्धकलेचे शिक्षण दिले. ही पराक्रमाचे पाणी लाभलेली वीरांगना, छत्रपतींच्या उज्ज्वल व्यक्तिमत्त्वाचे संस्कार झालेल्या राजपुत्र राजारामाची १६८५ च्या सुमाराला अर्धांगी झाली.

इ. स. १६९० मध्ये येसुबाईला औरंगजेबाने शाहूसह कैद केल्यावर मराठी राज्याची सूत्रे राजारामांच्या हाती गेली. हा प्रसंग अत्यंत आणिबाणीचा होता. औरंगजेब मराठी राज्य गिळण्याला टपून बसला होता. पण राजारामाने अत्यंत चातुर्याने मराठी राज्याचे

रक्षण केले. परंतु ही दगदग आधीच नाजुक प्रकृती असलेल्या राजारामाला सहन न होऊन इ. स. १७०० मध्ये सात दिवसाच्या तापाने सिंहगडावर तो मृत्यू पावला. मराठी राज्य अनाथ झाले ! त्यामुळे औरंगजेबाला वाटले की हे आता आपल्या घशात सहज पडेल. पण त्याचा तो भ्रमच ठरला कारण राजारामाची पत्नी ताराबाई, हिच्या रूपात वसत असलेली स्वातंत्र्य देवता खडबडून जागी झाली. आणि याच सुप्त शक्तीने मराठ्यांच्या सळसळत्या तरुण रक्ताला आवाहन व आव्हान केले.

इ. स १७०० ते १७०७ या सात वर्षाच्या कारकिर्दीत मराठी राज्याचा धनीपणा ताराबाईनेच स्वीकारला होता. तिच्याच नेतृत्वाखाली मराठ्यांच्या हालचाली चालल्या होत्या. ह्याच काळात औरंगजेबासारखा बलशाली सम्राट राज्याला वेढा घालून बसलेला ! मराठी सरदारातील आपापसातील फुटीर वृत्ती ! मराठ्यांचा राजा तुरुंगात पडलेला ! अशा आणिबाणीच्या प्रसंगी ताराराणीने स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीने निर्णय घेऊन आपल्या ४ वर्षे वयाच्या मुलाची मुंज करून त्याला लगेच सिंहासनारूढ केले. अन् आपण स्वतः राज्यकारभार पाहू लागली तिचे शौर्य, तिची कार्यक्षमता, तिची धडाडी यांना इतिहासात तोड नाही. एका विधवा राणीने असामान्य कर्तृत्व दाखविले आणि निरनिराळ्या सरदारात विखुरलेली शक्ती संघटित करून ती स्वराज्याच्या कामी राबविली मराठी राज्यात निर्माण झालेली धनीपणाची उणीव या पराक्रमी ताराराणीने भरून काढली. म्हणूनच मराठे मोंगलांना जातीने तोंड देऊ शकले

ताराराणीची ७ वर्षे कारकीर्द झाली. यात सात वर्षांपैकी १७०८ व १७०५ या कालात मोंगलांनी गिळकृत केलेले किल्ले प्रतापशाली वीरांच्या व प्रमुख सरदारांच्या सहकार्याने तिने परत घेतले. ताराराणी कोणत्याही एका किल्ल्यावर स्थिर न राहता निरनिराळ्या किल्ल्यावर वसतीस राहून किल्ल्याचा बंदोबस्त जातीने पाही. या सर्वातून तिची सर्वच गोष्टींमध्ये जातीने लक्ष पुरविण्याची वृत्ती तसेच सैन्यात जबरदस्त शिस्त व सुव्यवस्था राखण्याची मनोवृत्ती दिसून येते. एवढेच काय पण प्रत्यक्ष युद्धाची धुमश्चक्री चालू असताना स्वतः उपस्थित राहून सेनापतीला वीरश्रीने युद्ध करण्याची प्रबलतम प्रेरणा ताराबाई देत असे. तर कित्येक वेळा रणचंडिकेच्या वीरश्रीने हातात दोन तलवारी घेऊन ती समरांगणात उडी घेई. भद्रकाली ताराराणीच्या ह्या पराक्रमाची रसभरीत वर्णने बखरकार आणि शाहीर ह्यांनी केली आहेत

मराठ्यांची दृष्टी दिल्लीपर्यंत पोहोचविण्याचे पहिले श्रेय महाराणी ताराबाईलाच आहे. तिच्याच कारकिर्दीत मराठ्यांचे घोडे नर्मदापार झाले. तिचा हा गौरव केवळ स्वकीयांनीच केला नसून तिचे कट्टर शत्रू मोंगल, पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे परकीयांनीही केला आहे. असा शत्रूंकडून गौरव करून घेण्याचे भाग्य इतिहासातील कोणत्याही वीरांगनेला लाभलेले नाही.

औरंगजेब आजारी पडून त्याचा १७०७ मध्ये शोचनीय अंत झाला आणि शाहूराजे कैदेतून बंधनमुक्त झाले. शाहू स्वराज्यात परत येताच मराठी राजकारणाचा रंग बदलला. त्याने गादी परत मागितली असता ताराबाईने त्याला जो तीव्र विरोध केला त्यातून तिच्या राजकरणकौशल्याचा सुंदर आविष्कार दिसून येतो. तिच्या या विरोधातूनच मराठ्यांची दुसरी गादी निर्माण

---

" मी स्त्रीच्या जन्माला आलो असतो, तर " स्त्री ही आमच्या हातचे खेळणे बनण्याकरिता जन्माला आली आहे " या पुरुषी आढ्यतेविरूद्ध बंड पुकारले असते. स्त्रीच्या हृदयात सहज प्रवेश मिळावा म्हणून मी मनाने स्त्रीच बनलो आहे "

— महात्मा गांधी

---

झाली. सरदारांना स्वपक्षाकडे वळवून घेण्याकरिता शाहूला वतने व जहागिऱ्यांचे आमिष दाखवावे लागले. अन् ताराबाईला शह देण्याकरिता फौज उभारावी लागली. राज्य मिळविण्याकरिता शाहूला सात वर्षे ताराबाईबरोबर सामना करावा लागला. इ. स. १७०७ पर्यंत ताराराणीने स्वपराक्रमाने मराठी राज्याचे रक्षण करून त्यांचे सामर्थ्य वाढविले. मराठी वीरांच्या अंतरंगात स्वराज्यनिष्ठेची ज्योत कायम राखली. शाहू महाराज परत आल्यानंतरही तिच्या आज्ञेत असणारे सरदार शेवटपर्यंत तिच्याच हातात राहिले.

औरंगजेबासारख्या भयंकर आसुरापासून प्राणांचे पाणी घालून राज्याचे रक्षण करणाऱ्या व अभिष्ट चिंतणाऱ्या भद्रकाली वीरमणी ताराबाईची आत्मज्योत १० डिसेंबर १७६१ साली आपल्या महत्त्वाकांक्षेसहित त्या परमतेजाशी एकरूप झाली. शिवकालानंतर महाराष्ट्राच्या पराक्रमी मराठी मातीतून शिवतेज घेऊन यावनी शक्तीला मूठमाती देणारी महाराणी ताराबाईच्या रूपाने जी भगवती स्वातंत्र्यदेवी अवतीर्ण झाली तिला माझ्या अल्पमतीने

"इतिहासविण कुणी करावा यांचा सन्मान !"

एवढीच भावांजली वाहाते.

(प्रा. सौ. माया सरदेसाई यांच्या 'महाराष्ट्र सौदामिनी' या ग्रंथाधारे)

" अर्थशास्त्राच्या नियमांवरील कैक आधुनिक पाठ्य पुस्तकांपेक्षा जगातील धर्म-ग्रंथ हेच अर्थशास्त्राचे अधिक विश्वासार्ह व भरीव ग्रंथ आहेत असेही माझ्या मनात येते."

— म. गांधी

## जरा जपून तू वाग

नको लाडके ग घालू
डोळे भरून काजळ
जात हरिणीची तुझी
त्यात यौवनाचे जळ

तुझ्या डाळिंबी ओठांना
नको चंदनाची लाली
तुझ्या केशरी नखांना
नको मेंदी रंगलेली

सुरेखशा मुखावरी
नको चढवू मुलामा
तुझ्या आकारी केसांना
नको नवीन वळणा

मस्त माळूनी गजरे
फिरू नको सांज वेळा
कुणी रोखिती नजरा
कुणी वाजविती शिळा

असे काही करू नको
जरा जपून तू वाग
सांगणाऱ्या या दीनाचा
तुला येतो का ग राग

राग आला तुला जरी
खंत नाही त्याची मला
माझ्या आईने असाच
दिला होता पाठ मला

**काटे बच्चनजी**
द्वितीय वर्ष साहित्य

# गांधीजींचे गांधी तुकोबा

तुकाराम सावंत
तृतीय वर्ष साहित्य

ज्ञानराज माउलीनंतर भागवत धर्माची पताका फडकत ठेवणारी संत मांदियाळी निर्माण झाली त्यांत तुकोबांचे स्थान उच्च आहे किंबहुना वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्र संप्रदाय पंचकापैकी एक वैभवी अलंकार होय ज्ञानराज माउलीनंतर नामदेव, एकनाथ इ नी भागवत धर्मीय तत्त्वप्रणालीला आपल्या कर्तृत्वाने व जीवन कर्माने खरा उजाळा दिला. किंबहुना जसा 'ज्ञानाचा एका' तसा 'नामाचा तुका' भागवत संप्रदायांत शोभून दिसतो. अठरापगड ज्ञातीतून घर्मनेते निर्माण करण्याच्या ज्ञानेशीय कर्तृत्वाच्या पार्श्वभूमीकडे पाहता क्षूद्र जातीत जन्म घेऊन भागवत संप्रदायाच्या इमारतीचा कळस होण्याचे 'मानाचे पान' संत तुकारामाना लाभले. हे पाहून त्या क्षुद्र धर्मियांच्या माना किती उंचावल्या असतील हे शब्दानी सांगता येणेच कठीण.

जीवनात 'दु:ख पाहता पर्वताएवढे' चा अनुभव आल्यानंतर या उद्वेगातून श्रद्धेचं पाथेय पाठीशी घेऊन पंढरीच्या विठाईकडे भक्तीचे आदान–प्रादानत्व करण्यासाठी तुकाराम निघाले. भक्तीच्या पायघड्यावरून वाटचाल करता करता तुकोबांच्या जीवनातील अविद्येची रात्र सरून ज्ञान भास्कराचा उदय झाला. ज्ञानप्राप्तीनंतरही हरी भक्तीचीच भूक तुकोबांना लागून राहिली. त्या भूकेच्या तृप्तीसाठी तुकोबा नाम संकीर्तनात रंगून जात. भक्तीचा संसार थाटण्याने ऐहिक संसाराचे पाश तोडून टाकले. सांसारिक अभिलाषेला तिलांजली दिली आणि 'आशाते समूळ खणून काढल्या' चा आनंद लुटला.

तुकोबांच्या–

'नामदेवे केले स्वप्नामाजी जागे ।
स्वये पांडुरंगे येवोनिया'

या चरणोल्लेखातून त्याना नामदेवापासूनच कवित्वाची स्फूर्ती मिळाल्याचे दिसते. किंबहुना नामदेवानी आपली अपुरी राहिलेली 'शतकोटि अभंगांची' प्रतिज्ञा पुरी करण्यासच तुकोबांना सिद्ध केले. त्यांनी आपल्या अभंगांतून गरीब–अमीर किंवा ज्ञातीय भेदभाव न ठेवता सर्वांना मेघवृष्टीने उपदेश केला. नामसंकीर्तनाची महती सांगताना ते मोठ्या भक्ती भावाने सांगतात–

'नामसंकीर्तन साधन पै सोपे ।
जळतील पापे जन्मांतरीची'

खरोखरच नामसंकीर्तनात ते सामर्थ्य होते. तुकोबा जेव्हा विठ्ठल भक्तीत दंग होत असत तेव्हा त्याना टाळ चिपळ्यांची साथ मिळे, मृदंगाच्या ध्वनीची जोड लाभे; तेव्हा ते 'देह दुकुलाचे भान विसरून' जात. अंतरी भक्तीचा मळा फुललेला असे आणि आनंदाचा मोगरा बहरास आलेला असे. त्यांचे सारेच जीवन त्यांच्या अभंगात प्रतिबिंबित झालेले दिसते. तुकोबांचे अभंग हे एक जीवन भाष्य होते. त्यांचे अभंग केवळ कानाला गोड लागणारे नव्हते, वा केवळ देवादिकांचे गुणगाण गाणारे नव्हते. . तर जीवनाचे मूर्तिमंत चित्र डोळ्यापुढे उभे करणारे होते ! तसे पाहता तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे हलाहल पचवून त्यानी अभंग लेखनाचा, कीर्तनाचा जो मार्ग स्वीकारला ते एक दिव्यच म्हणावे लागेल. किंबहुना तुकोबा मारख्या हीन यातीच्या संताने समाजात नव

चैतन्य निर्माण करण्याचा संकल्प केला आणि तो बराचसा सिद्धीलाही गेला.

'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' असे म्हणून तुकोबांनी पढिक पंडितांना– 'ग्रंथभार वाहणाऱ्या प्राण्यात' जमा केले. तुकोबा केवळ वरकरणी संत नव्हते. त्यानी पंढरीच्या विठ्ठलाला 'मनांत सांठविले, बुद्धीत गाईले आणि चित्तात ध्याईले' होते. भक्तीचा गदारोळ उसळताना त्यांचे शब्द रत्न होउन बाहेर पडत तर अन्यायाचा प्रतिकार करताना तेच शब्द शस्त्राचे रूप घेत! तुकोबा कांही पढिक विद्वान नव्हते हे खरे असले तरी त्यांची बुद्धिमता दांडगी होती. एखाद्या बुद्धिवंतालाही लाजविणारी त्यांची प्रतिभा होती त्यांचे अभंग हे सहजस्फूर्त आहेत. त्यांत जुळवा जुळव मुळीच नाही. म्हणूनच तर त्यांचे अभंग ही रचना न ठरता निर्मिती ठरली. 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी। धरिता ही परि आवरेना' या मानसिक अवस्थेतून त्यांचे भाव शब्दरूपास आले. त्यांचे शब्द हृदयाच्या उर्मी उर्मीतून बाहेर पडतात. 'तुका म्हणे झरा। आहे मुळीचाच खरा' – – – या मुळेच तर त्यांची अक्षरे अभंग ठरली त्यांचे अभंग 'अक्षर' ठरले.

तुकोबांनी आपल्या अभंगातून केवळ उपदेशच केला नाही अथवा परमेश्वराचे गुणगाणच गाईले नाही तर ज्या ज्या ठिकाणी समाजात त्याना दोषास्पद भाग दिसला त्यावर त्यांनी 'शब्दाच्या दगड धोंड्यांनी' प्रहार केले. समाजातील बुवाबाजी बद्दल ते म्हणतात. —

'डोई वाढवून केस। भूतें आणिती अंगास
तरि ते नव्हती संत। तेथें नाही आत्मखूण'

भक्तीचा पोकळ डोल मिरवणाऱ्याना 'पैजारांची भाषा' वापरताना ते अगदीच कठोर होतात. अशा धटींगणांचा समाचार घेण्यासाठी 'हाती हरिनामाचे तीक्ष्ण बाण' घेऊन फिरतांना आढळतात त्यांच्या वाणीत गडेतोडपणा व रोखठोकपणा जागोजागी दिसतो. अशा समाजांत आपले कार्य 'करणे पाखांड खंडण' असे ते सांगून जातात. परंतु तुकोबांचे हे कठोर उद्गार भावनेच्या आवेगातील आहेत. त्या पाठीमागे विघातक प्रवृत्ती मुळीच नाही कारण– 'बुडता हे जन न देखवे डोळा' या साठीच त्याना कठोर व्हावे लागले. पण या कर्तव्य-कठोरते मागील भूमिका त्यांच्याच शब्दात अशी होती: 'बोलिलो जे कांही तुमचिया हिता। वचन नेणता क्षमा किजे - -' या त्यांच्या उद्गारांतून ज्ञानेशीय वृत्तीच दिसते. इतकेच नाहीतर याही पुढे जाऊन तुकोबा म्हणतात– 'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास। कठीण वज्रासही भेदू ऐसे - -' या त्यांच्या वाणीतून नम्रता आणि कठोरता असलेले दुधारी व्यक्तित्व प्रत्ययास येते. मात्र काही काही ठिकाणी ते 'प्रारब्धवादी' बनून जातात. 'आले देवाजींच्या मना। तेथे कोणाचे बा चालेना - -'

एकंदरीत सामाजिक क्षेत्रातील सत्य असत्याचे दर्शन घडविताना त्यानी कोणाचीही कदर बाळगली नाही. कशाचीही खंत बाळगली नाही- 'सत्य असत्यासी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता' - - अशी त्यांची जीवन रीती होती. 'कुणि निंदा कुणि वंदा। आम्हा स्वहिताचा धंदा' असे सांगण्यांत त्यांच्या बाणेदार स्वभावाची साक्ष पटते तुकोबांनी आपल्या उपदेशातून 'मना करारे प्रसन्न' असा बहुमोल उपदेश केला. 'मना सारखे दैवत' नाही ह्या त्यांच्या वचनात प्रवृत्ति-वाद दिसतो तुकोबा काही ठिकाणी प्रारब्धवादी दिसले तरी हे 'प्रयत्नवादी तुकोबा' डोळ्यासमोरून हालत नाहीत पहा–

'असाध्य ते साध्य करिता सायास।
कारण अभ्यास तुका म्हणे - -'

त्यानी संसार सोडून परमार्थ साधण्यास कोठेच सांगितलेले नाही. उलट मनुष्याने प्रापंचिक अभिलाषा बाळगून परमार्थाकडे न वळता–

'आशा ते समूळ खणोणी काढावी।
तेव्हांची गोसावी व्हावे तेणे'

असाच उपदेश केला. त्यांच्या वागण्यात – वृत्तीत 'वसुधैव कुटुंबकम्' हा ज्ञानेशीय छाप दिसते. संसार

हा दुःखपंच आहे. तेथेच 'मोठी माझी आणि जातीचे खोटे' या पासून परावृत्त होण्यास सांगितले. कारण मारे सुखाचे स्वार्थी पण संकटकाळचे कोणी नाही हे पटवून दिले. 'आलेल्या भोगास' सामोरे जाण्यास ते सांगतात. शरीर संदर्भात तुकोबा बरे आणि वाईट विचारही प्रकट करून जातात. शरीर दुःख, रोग यांचे भांडार म्हणतात तर तेच तुकोबा 'शरीर सुखाचे घोसले' असेही सांगतात. परमार्थ मार्गातील दगडधोंडे दूर करण्यासाठीच ते आपला जन्म आहे असे मानत. त्यांचे जीवनच असे दुहेरी स्वरूपाचे. ते जितके कठोर तितकेच मृदु, जितके पारमार्थिक तितकेच लौकिक विचार व्यक्तविणारे होते.

अंतःकरणात कामप्रवृत्तीचा मळ साचवून केवळ तुळशीमाळ घालणाऱ्या ढोंगी लोकांवर ते कडाडून हल्ला चढवितात. पण उलट ते म्हणतात– "अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ। त्याचे गळा माळ असो नसो" यातच खरे साधुत्व आहे हरिभक्तीची ज्याला अंतःकरणापासून आवड नाही त्याने हा ध्यास घेण्याची नसती उठाठेव का करावी ? असा प्रश्न विचारून जातात. तुकोबांचे जीवन आणि अभंग हे साकार आणि गोडी इतके एकरूप आहेत. तुकोबा म्हणताच त्यांचे अभंग नजरे समोर यावेत इतके हे समीकरण आहे. नीयतीच्या वरवंट्याखाली संपूर्ण जीवन भंगून जावे आणि त्याच भग्न जीवनातून अभंग जन्माला यावेत हे वेगळेपण सर्व संतांमध्ये तुकारामांच्या ठायी होते.

**

"मी एक साधा माणूस आहे. साधे जीवन जगण्यातच मला आनंद आहे."

– म. गांधी

## अशाच वेळी—

अशाच एका चांद-निळ्या रात्री
बसलो होतो आपण दोघे
गहन–निळा एकांत प्रांत.
त्यावेळी तू दिलीस
लक्ष लक्ष फुल–माधुरी वचने
पुन्हा इथेच भेटायची
बसले आहे तशाच वेळी
आठवांत तुझी
दंवात चांदणं शिंपणारी
हसरी मूर्ती
वेडातच त्या डुबले आहे
हृदयात जपून लक्ष लक्ष दुःखे
- - - तरीही पुढे बसेन
अशाच वेळी - - -
अश्रु–भिजले डोळे लावून
तुझ्या मार्गावर !

कु. अरुणा वि. पेडणेकर
तृतीय वर्ष साहित्य

# गांधी तत्त्वज्ञान व सद्यःपरिस्थिती (एक विरोधाभास)

म. गांधी कोण होते ? त्यांच्या तत्त्वज्ञानाचे स्वरूप कसे आहे ? त्यांच्या जीवनाची मूलभूत तत्त्वे कोणती होती ? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आजच्या पिढीला केवळ पुस्तकरूपानेच मिळू शकतील. कारण ही पिढी अशा वेळची आहे की काहींचा जन्म गांधीवधानंतर झाला आहे तर काहीजण गांधी हत्येच्या वेळी अत्यंत बाल्यावस्थेत होते. अशा या अभागी पिढीला गांधी तत्त्वज्ञान म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर केवळ पुस्तकांद्वारेच मिळणार हे निर्विवादच आहे.

आमच्या या पिढीसमोर एक महान समस्या आहे, ती ही की आम्हाला पुस्तकारूपाने का असेना गांधी धोरणाची जी पुसटशी कल्पना मिळते आहे तिचा व सद्यःस्थितीचा काडीमात्रही संबंध नाही. गांधीतत्त्वज्ञानाचा चालू परिस्थितीशी पडताळाच घालून पहावयचा झाल्यास आजच्या परिस्थितीत असंख्य गोष्टी चुकीच्या आढळतील.

गांधीजींनी हरीजन व इतर मागासलेल्या जमातीसाठी पुढाकार घेऊन त्यांच्याशी बंधुभावाने वागण्याचा आदेश सर्वांना दिला. पण आज प्रत्यक्षात समाजामध्ये डोकावले तर वेगळेच दृश्य पहावयास मिळते. त्या समाजावर होत असलेला अन्याय व त्याना इतरत्र मिळत असलेली वागणूक पाहिली की आज आपण गांधींच्या या मूलभूत धोरणाला कोठल्या कोठे नेत आहोत हेच उमजत नाही.

गांधीजींनी 'सत्यमेव जयते' या उक्तीला आपल्या जीवनात अग्रस्थान दिले व त्या उक्ती-प्रमाणेच स्वतःचे वर्तन ठेवले परंतु आजच्या कारकिर्दीमध्ये सत्य बोलणाऱ्याची धडगतच नाही. याउलट 'असत्यं सर्वत्र पूज्यते' असे म्हणण्याची पाळी येते.

गांधीजींच्या जीवनामधील आणखी एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे अहिंसा. या तत्त्वाचीदेखील आज कुठेच कृती दिसत नाही.

यावरुन सहज स्पष्ट होते की आज गांधीजींच्या मनामधील कोणतेच धोरण कृतीने साकार झालेले नाही. उलटपक्षी त्यांच्या या धोरणाच्या अगदी उलट सर्व गोष्टी घडल्या आहेत घडत आहेत. आणि घडत – – –

३००वर्षांपूर्वी छत्रपती शिवराय होऊन गेले, त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी अविरत श्रम घेतले. या इतिहासावरून आपल्या मनामध्ये ज्याप्रमाणे त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला आहे अशाच प्रकारचा आदर म. गांधीजींच्या विषयी भावी पिढीत निर्माण होईल पण फक्त आदरच. त्यांच्या धोरणांचे कृतीमध्ये रूपांतर संध्या तरी होणार नाही. कारण–

कारण आज आमच्यापुढे गांधीतत्त्वज्ञानावर बोलणारे खूप आहेत पण आचरणामध्ये आणणारा आदर्श एकही नाही. आहे तो सगळा भोंदूपणा.

आज गांधी जन्म शताब्दीच्या वेळी खंत वाटते, ती आमच्यात असलेल्या (?) जिद्दीची. लाज वाटते ती घडत असलेल्या गोष्टींची व चीड येते ती आमच्यासमोर असलेल्या पुढाऱ्यांची.

शरद दंडगे
द्वितीय वर्ष वाणिज्य

# आमच्या महाविद्यालयाचे शिल्पकार

शिवराज महाविद्यालयाचे संस्थापक श्री. व्ही. टी. पाटील यांचा साधा पेहराव, नेहरू शर्ट, धोतर, खादीचे जाकीट आणि डोक्यावर खादी टोपी; प्रसन्न वदन, ओठावर विलसणारे स्मित हास्य, तेजस्वी मुखाकृती यातून प्रकट होणारे आल्हाददायक व्यक्तिमत्त्व डोळ्यात सहज भरते.

कोल्हापूर कलापूर आहे. त्याच प्रमाणे बहुजन समाजाच्या उत्कर्षाकरिता लोक शिक्षणाचे संस्कार केंद्र पण आहे. बहुजन समाजाच्या उद्धाराची चळवळ येथेच नावारूपास आली. समाज सुधारणेच्या दृष्टीने काळाची मागणी ओळखून राजर्षी शाहू महाराज यांच्या पुरोगामी प्रेरणेने आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या शुभ आशिर्वादाने ज्यांनी कोल्हापुरात शैक्षणिक संस्था उभारून अविस्मरणीय विधायक कार्य केले, अशा नररत्नात श्री. व्ही. टी. पाटील यांचा समावेश मोठ्या गौरवाने केला जातो. प्रारंभिक जीवनात विद्या संपादन करताना कल्पनातीत हाल अपेष्टा सहन कराव्या लागल्यामुळे समाजाच्या खाल स्तरापर्यंत शिक्षण सहज साध्य झाले पाहिजे या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी शैक्षणिक विस्ताराकडे मोठ्या उमेदीने आपले लक्ष केंद्रित केले.

इ. स. १९[illegible] ते १९[illegible] पर्यंत ते कोल्हापूर जिल्हा स्कूल बोर्डाचे चेअरमन होते. या कालावधीत त्यांनी खेडोपाड्यात प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा काढून शिक्षणाचे लोण सामान्य जनांपर्यंत पोहोचविले. इ. स. १९४३ साली त्यांनी प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून तिच्या तत्त्वावधानाखाली नागोजीराव पाटणकर हायस्कूलची कोल्हापूर येथे स्थापना केली.

शिवरायाची सून, सेनापती हंबीरराव यांची कन्या, शिवरायांचे द्वितीय सुपुत्र राजाराम महाराज यांची पत्नी, स्वातंत्र्य सौदामिनी ताराराणी हिचे कर्तृत्व, शौर्य, धैर्य, मुत्सद्दीगिरी, ज्वलंत देशभक्ती व उत्कट स्वातंत्र्य प्रेम, लोक विलक्षण, असामान्य व अतिमानवी आहे. ताराराणी अखिल स्त्री जातीला ललामभूत झाली आहे. ताराराणीचे विधायक स्मारक शैक्षणिक संस्थेच्या रूपाने इ. स. १९४५ मध्ये त्यांनी कोल्हापूर येथे उभारले. आज 'ताराराणी विद्यापीठ' या नावाने ही स्त्री-शिक्षण संस्था नावारूपास आली आहे.

पाटील साहेबांची धारणा आहे की एका मुलीला सुशिक्षित करणे म्हणजे एका कुटुंबातील कित्येक भावी पिढ्यांना सुशिक्षित करण्यासारखे पवित्र कार्य आहे. म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे.

श्री. मौनी महाराजांचा आशीर्वाद घेऊन स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजयाला निघाले. त्यांच्या पुण्यशील स्मृतीचे स्मारक श्री. व्ही. टी. पाटील यांनी 'मौनी विद्यापीठ' या शैक्षणिक

संस्थेच्या रूपाने उभारले. इ. स. १९५२ मध्ये स्थापन झालेली ही संस्था ग्रामीण शिक्षण व पुनर्वसनाची एक अभिनव संस्था म्हणून सध्या नावारूपास आली आहे.

श्री व्ही. टी पाटील १९५२ मध्ये विधिमंडळाचे सदस्य व त्यानंतर १९६२ साली लोकसभेचे सदस्य म्हणून बहुमताने निवडून आले. त्यांनी आमदार व खासदार या पदांच्या उच्च आसनावर विभूषित होऊन मोठा लौकिक संपादन केला. तरी पण उच्च पदाचा मोह न बाळगता त्यांनी समाज सेवेस व शैक्षणिक कार्यास स्वतःस वाहून घेतले. राजकारण साधन मानून त्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थांची प्रगती साधण्याकरिता अविश्रांत परिश्रम घेतले.

ग्रामीण विभागातील शिक्षणाची आबाळ त्यांनी स्वतः अनुभवली असल्यामुळे, ग्रामीण विभागातच उच्च शैक्षणिक संस्था उभारल्या पाहिजेत अशी जिद्द त्यांनी मनाशी बाळगली होती. ग्रामीण विभागातील उच्च शैक्षणिक संस्थेच्या संस्थापनेची त्यांनी केवळ स्वप्ने रंगवली होती असे नव्हे तर ती स्वप्ने साकार करण्याची तळमळही त्यांनी बाळगली होती. असा मणि-कांचन संयोग त्यांच्या जीवनात सुदैवाने लौकरच झाला. गडहिंग्लजच्या पुण्यगंधा मातीत ज्यांच्या व्यक्तित्वाने आकार घेऊन आपल्या सुगंधाने सर्व परिसर दरवळून सोडला, ज्या नर-रत्नाने या परिसरातील समाजाचा अज्ञान अंधःकार आपल्या अनुभव संपन्न व्यक्तित्वाने दूर करण्याचा प्रयत्न केला असा मित्र-श्रेष्ठ डॉ. एस. एस. घाळींच्या रूपाने श्री. पाटील साहेब यांना लाभला. डॉ. घाळी यांच्या सद्भावनेने व सहकार्याने त्यांनी २५ जून १९६४ रोजी शिवराज महाविद्यालयाची गडहिंग्लज येथे स्थापना करण्यात यश मिळविले. डॉ. एस. एस. घाळी यांच्या सारख्या निःस्वार्थी आणि निरपेक्ष बुद्धीने व तळमळीने समाज सेवेस स्वतःस वाहून घेतलेल्या या भागातील अज्ञात शत्रू पुढाऱ्याचे महत्कार्य संपादन करण्यात त्यांनी जे अनुपम यश संपादन केले त्यांतून त्यांच्या लोक संग्राहक वृत्तीची प्रकर्षाने अभिव्यक्ती होते.

तारांगणी आणि मौनी विद्यापीठाच्या भव्य आणि रंगीतसुंदर वास्तूने ज्या वेळेस चित्त वेधले जाते त्यावेळेस श्री. व्ही. टी. पाटील यांच्या वास्तुकलेतील सौंदर्यवादी कल्पनारम्य आविष्काराचे, विस्मय-विमुग्ध होऊन, कौतुक करावेसे वाटते.

या संस्थांच्या उत्तरोत्तर उत्कर्ष आणि लौकिकात भर पडण्यासाठी परमेश्वर त्यांना दीर्घ आयुरारोग्य देवो हीच प्रार्थना.

## का ?

आज तुझ्या मनाने का
मौन सुगंधी पाळिले ?
आज तुझे शब्द का
ओठातच रेंगाळले ?

आज तुझे नयन का
आसवांनी ओलावले ?
आणि तेच नेत्र का
भूमिवर स्थिरावले ?

आज तुझी धुंद चाल
उगाच का मंदावली ?
कुण्या दुष्टाची तुला
आज नजर लागली ?

**बी. आर. कुलकर्णी**
प्रथम वर्ष साहित्य

# मी अनाघ्रात उरल्ये : जिप्सी

कु. कुंदा पेडणेकर
द्वितीय वर्ष साहित्य

सौंदर्य उकलून दाखवयाचे असते का? नाही. तर ते भावसघन डोळयांनी प्यावयाचे असते, संवेदनशील मनाने आस्वादायचे असते. ते सौंदर्य डोळ्यांनी पिता आले नाही, मनाने आस्वादता आले नाही तर त्याचे बुद्धीच्या बळावर विश्लेषन-विच्छेदन करू नये. किंबहुना तसे करताच येत नाही. नेमकी अशीच स्थिती ' जिप्सी ' तील काव्यसौंदर्याबाबत होते.

' जिप्सी ' तील भावकविता थरथरत्या (thrilling) सौंदर्य संवेदनेचे लेणे लेऊन, आकाशाची प्रिया होऊन, नटत लाजत सहृदय रसिकांच्या अंतःकरणाचा ताबा घेते आणि त्यांना आपलेसे करुन टाकते.

' जिप्सी ' मध्ये पाडगांवकरांची निसर्गकविता भावरूप होऊन येते तर प्रेमकविता निसर्गमय होऊन येते. ' जिप्सी ' तील कवितेचे हवाबंद कप्पे पाडणे हे अरसिकत्वाचे लक्षण ठरेल. पाडगावकर ' जिप्सी ' त स्वतः निसर्गमय होऊन जातात. निसर्गातील सर्व भाव–संवेदनांशी त्यांच्या हृदयसंवेदनांचे आत्मिक नाते आहे. हा संवादी स्वर पुढील चरणांतून दिसेल.

थेंब स्पर्शता पानाच्या हिरव्या टोकाला
उठू लागल्या होत्या माझ्या नसानसातून
तुरट - - गोड – – पोपटी झिणझिण्या

पाडगावकर स्वतः ती निसर्गातील थरथर अनुभवतात. श्रावणाच्या अधरांचे कंपन, दंवबिंदूतील हळवी स्पंदने जाणिवेत टिपून घेतात. निसर्गातील श्वास त्यांना गूढ निरोप देतात. ' मी तू व्हावे अन् तू मी व्हावे ' अशी त्यांची अवस्था झाली आहे. म्हणूनच हे तरल निसर्ग सौंदर्य निसर्गाने लपविले तरीही कवी म्हणतो 'मज नकळत कळत कळते निसर्गविश्वातील'गूढ-अंधुक-पुसट' असे काहीसे त्यांच्या अतीव संवेदनशील मनाला भावले ते तितक्याच तरल भावसुक्तात लीलया गुंफण्यात ते यशस्वी झाले आहेत.

कलाकृतीपासून मिळणारा आनंद हा ब्रह्मास्वादसहोदर असतो असे संस्कृत साहित्यमीमांसक विश्वनाथाने म्हटले आहे. ब्रह्मानंद जसा स्वसंवेद्य तसाच पाडगांवकरांच्या या विशुद्ध कवितेतील तरल अनुभवही स्वसंवेद्यच आहे. निसर्गातील तरल सौंदर्य–संवेदना व प्रीतीभावनेतील तरल छटा यांच्या 'धारानृत्यात' त्यांच्या कविता चिंब भिजून गेल्या आहेत. त्यांच्या अधिकांश कविता सूक्ष्म भाववृत्ती mood निर्माण करणाऱ्या आहेत. आणि या भाववृत्तीची वलये रसिक मनात निर्माण होण्यातच त्या कवितांचे साफल्य आहे. त्याकरिता वाचक कवितेशी एकरूप झाला पाहिजे. ती कविता एकटयाने वाचावयास हवी. चारचौघात वाचून तिच्यातील अनुभूतीला – सौंदर्याला स्थूलीकरणाचा– नीरसपणाचा कलंक लावणे इष्ट ठरणार नाही. येथे स्पष्टीकरणाची भाषा फोल ठरुन जाते; कारण पाडगांवकरांची कविता ही अल्पाक्षरी पण भावसघनरूप आहे.

पाडगावकरांची कविता ही भावकविता आहे, भावगीत नव्हे. भावकवितेतील भाववृत्ती ही एक मानसिक स्पंदन या स्वरूपात रसिकास जाणवत असते. म्हणूनच एखाद्या विशिष्ट भाववृत्तीने भारलेल्या

क्षणाच्या स्पंदनाचा आभास निर्माण करणे हे भावकवितेचे खरे कार्य असते. हे कार्य ती जितक्या चांगल्या प्रमाणात करील तितकी तिची गुणवत्ता अधिक असते. पाडगावकरांच्या कवितेला ही उंची लाभली आहे. परंतु पाडगावकरांच्या कवितेतील निसर्गसौंदर्य व भावसौंदर्य यांच्या संमिश्र संवेदना, 'ज्यांची हृदये झाडांची ' आहेत त्यांनाच फक्त अनुभवता येतील.

पाडगावकरांनी आत्मनिष्ठा कलावंती भान ठेऊन पूर्णतया जपली आहे पण याचा प्रत्यय थोडयाच प्रमाणात 'धारानृत्या'त दिसून येतो त्यांनी त्याची कबुलीही दिली आहे ती अशी : "निसर्गकविता लिहिणे म्हणजे निसर्गाचे हुबेहूब वर्णन करणे अशीच माझी कल्पना होती अशा तऱ्हेच्या 'वर्णनात' उपमाउत्प्रेक्षांची कसरत असे; पण त्यात अर्थात अनुभूतीचा जिवंतपणा नव्हता !"

धारानृत्या' नंतर मात्र निसर्गाच्या दर्शनाने त्यांच्या मनात विविध भाववृत्ती जागृत होऊ लागल्या. निसर्गाच्या दर्शनाने मनात तरळणाऱ्या रंगगंधाच्या तरल संवेदनातून त्यांचे काव्य जन्मास आले. या संवेदना हाच एक अत्यंत सखोल असा अनुभूतीचा क्षण असू शकतो. अशावेळी 'थेंबाचे ओले पाऊल वाजलेल्या'ची प्रतीती आणून देण्याचे कार्य अधिक कठीण असते. तरीही ते कार्य पाडगावकरांनी सहजपणाने 'जिप्सी' त केले आहे हेच 'जिप्सी' तील खरे सौंदर्य आहे

पु. शि. रेगे 'छांदसी' तील Pure Poetry या लेखात म्हणतात, "खऱ्या काव्याच्या बाबतीत अर्थ किंवा त्यातील मध्यवर्ती कल्पना यांचा शोध, त्याचा अनुवाद ( Paraphrase ) इत्यादी शालेय प्रयोग होऊच शकत नाहीत. केवल काव्यातील शब्दांना अर्थ असतो पण तो सूचक, अस्पष्ट त्याचे आवाहन गूढ व अगोचर अशा भावांना असते. काहीतरी सापडले आहे, हरवले आहे असा एकाचवेळी प्रत्यय देणारी एक अवस्था ते मनाला प्राप्त करून देतात. 'केवल काव्या'त शब्दाच्या घाटणीची परिसीमा झालेली असते." हे सर्व विवेचन पाडगावकरांच्या कवितेला अगदी यथार्थपणे लागू पडते. ती 'केवल कविता' म्हणायला हरकत नाही.

पाडगावकरांच्या कवितेतील अर्थ समजण्यात आनंद नाही तर त्या कवितेतून प्रसवणारी जी भावस्पंदने–भावकंपने आहेत ती कंपने अनुभवण्यातला आनंद लुटणे म्हणजेच खरा काव्यास्वाद होय. असा वाचकच खरा रसज्ञ असतो.

> कधी कधी पहाटते उरी आगळी प्रतीती
> जाळीमधून धुक्याच्या तेज झिरपते चित्ती

या शब्दातून पाडगावकरांचा जो अनुभव झिरपत आहे तो अनुभवता आला पाहिजे. किंवा पाडगावकर जेव्हा

> गहिवरल्या प्रकाशी दहिवर मिसळेल

असे पहाटेचे वर्णन करून जातात तेव्हा ते शब्दचित्र नसते तर तो अंत:करणाचा विषय होऊन जातो. ते शब्दांच्या चिमटीत न सापडणारे निसर्गसौंदर्य आहे; परंतु वा. ल. कुलकर्णी ही शब्दचित्रे आहेत असे म्हणून जातात त्यावेळी असे नाइलाजास्तव म्हणावे लागते की, 'जिप्सी' तील तरल भावकंपन–सौंदर्य वा. लं. च्या सौंदर्यसमीक्षक दृष्टीला भुलऊन फसवून तर पळाले नाही ना ! अिथे वा. लं. चा शब्दचित्र हा शब्द अत्यंत थिटा, स्थूल वाटतो.

पहाटेच्या वेळी 'गोड कोवळा गारवा सुगंधात थरारेल' हा पाडगावकरांनी शब्दबद्ध केलेला अनुभव हृदयीच्या मौनात पहाट होऊन यायला हवा येथे 'अरूपासी रूप दावीन' ही पैज उणावते या संदर्भात पुढील काव्यचरणही ध्यानी घ्यावेत :

> 'रात्र भिजली
> कांपऱ्या तंद्रीत
> पाने निजली'

'शिशिरामधल्या उत्तररात्री
आकाश मनात झुरे'

'तंद्रीत कापऱ्या हळव्या
अन् होते वाहत वारे'

किंवा 'छोरी'तील "जळात हिरवे फिक्कट वर्तुळ झरणारा कापरा गारवा" हा अनुभव. ही वा. ल. कुलकर्णी यांच्या भाषेतील शब्दचित्रे नव्हेत.

पाडगावकरांच्या प्रतिभेची आगळी विकासक्षमता प्रकर्षाने जाणवते ती मानवी भावनांच्या संदर्भात निसर्गाला सामावून घेण्यात. कवीचे प्रेमभावच निसर्गप्रतिमांचे कवचकुंडल घेऊन येतात. निसर्ग आणि प्रेमभाव भिन्नभिन्न काढताच येत नाही. येथे 'अखंड अद्वैत विराजलेले' आहे. निसर्गप्रतिमा इथे अलंकरण-मूल्य म्हणून येत नाहीत तर भावाभिव्यक्तीचा एक अपरिहार्य भाग म्हणून येतात पहा—

जर येणारच रात्री तर ये
तू होऊन थरथर पर्णांची
जी शब्दांच्या पुढची - - - पुढची
जणु ओढ अनिर्वच प्राणांची

जर येणारच तर उमलून ये
मजभंवतीच्या सृष्टीतून ये
सृजनांचे स्पंदन होऊनि ये
रस-रंग-नाद गंधातुन तू

मंगेश पाडगावकर बालकवींच्या निसर्ग सौंदर्यधारा चातक चोचीने प्राशन करून व बोरकरांचे संस्कार संवेदनशील मनाने टिपून १९५० मध्ये 'धारानृत्यां'चे दर्शन घडविण्यासाठी रसिकांसमोर आले; परंतु बाल-कवींची निसर्गकविता पुढे नेणारे मंगेश पाडगावकर देखण्या दिठीतून प्रवेश करून मनात उभे राहतात ते 'जिप्सी' मध्येच. कारण 'जिप्सी' मधील अनुभवविश्व शद्बचित्र स्वरुपाचे नसून एक प्रकारची भाववृत्ती ( mood ) निर्माण करुन जाणारे आहे. आणि तीच पाडगावकरांच्या कवितेचा उद्देश आहे. असे ते स्वतःही म्हणतात. त्यांची 'थेंब' ही प्रतिमा असली तरी तो एक सूक्ष्म असा अनुभव आहे. हा थेंब रसिकांच्या मनात उतरला की या कवितेचे कार्य संपले.

एकंदरीत पाडगावकरांच्या निसर्ग कवितांचे स्वरूप त्यांच्या शब्दात असे सांगता येईल, "माझ्या बऱ्याचशा निसर्ग कविता डोळ्यांसमोर 'चित्र' उभे करीत नाहीत. कवितेच्या निसर्गप्रतिमांचा परिणाम 'मूड' निर्माण करण्यात व्हावा, चित्र निव्हे. अशीच माझी इच्छा असते."

**सौंदर्य ही आंतरिक वस्तू अस-ल्याने त्याचे दर्शन होणे शक्य नाही.**

— म. गांधी

पाडगावकरांची कविता क्षणाक्षणाला 'नव सुंदरता मी ल्याले रे' असेच सांगत असते या कविता सुंदरीचा आस्वाद रसिकांनी घेऊनही ती अनाघ्रात रहाते. कुमुदिनी घारपुरे यांनी 'जिप्सीच्या दोन भाववृत्ती' शोधताना पाडगावकरांच्या कवितेला आपण अनाघ्रात राहिल्याचा खंत वाटते. असे जे म्हटले त्यातून जो अर्थ ध्वनित होतो, तसा अर्थ घेतल्यास त्यातले सौंदर्य उणा-वेल. तेव्हा वेगळ्या रीतीने अर्थ लावल्यास हे सौंदर्य दुणावेल पाडगावकरांची कविता रसिकांसाठी सतत भावगंध उधळीत जाऊनही तिचा सुगंध मात्र क्षर पावला नाही आणि म्हणूनच ती खऱ्या अर्थाने अनाघ्रात राहिली त्यामुळेच तर निसर्गसौंदर्याने नटलेल्या चैतन्यमया अशा पाडगावकरांच्या कवितेबाबत एवढेच म्हणावेसे वाटते की,

जीव भरून पहावे तुला एकदा
कळ्यांच्या पहाटे, फुलांच्या सकाळी;
आणि 'जीव भरून तुझे व्हावे एकदा'

**

# मराठीचा मानकरीः राम गणेश गडकरी यांच्या पन्नासाव्या स्मृति-वर्ष प्रसंगी

# तेथे कर माझे जुळती !

नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी
नाचत डोलत करि शिणलेली मने पुन्हा ताजी

–गोविंदाग्रज

---

**राम जोशी**
द्वितीय वर्ष साहित्य

राम गणेश गडकरी यांना जाऊन पन्नास वर्षांचा काळ लोटला नटराजाच्या रंगमंदिरात, शारदेच्या दरबारात, साहित्य संस्थांच्या सभागारांत आणि मराठी माणसांच्या घरा–घरांत 'राम गणेश गडकरी' हे नाव गेली पन्नास वर्षे अहर्निश गाजते आहे.

राम गणेश गडकरी यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व नाटके, विनोदी लेखन व काव्य या त्रिदळातून प्रकटले आहे. नाटककार म्हणून राम गणेश गडकरी, विनोदी लेखक म्हणून 'बाळकराम', आणि कवी म्हणून 'गोविंदाग्रज' या नावाने ते रसिकांसमोर येतात. प्रेमसंन्यास, पुण्यप्रभाव, एकच प्याला, भावबंधन व राजसंन्यास हा त्यांचा नाटयसंसार होय.

त्यांच्या नाटकांत आत्यंतिक कारुण्य, आत्यंतिक दुष्टपणा, आत्यंतिक असंबद्धता, आत्यंतिक हळुवारपणा, आत्यंतिक कोटिबाजपणा अशा आत्यंतिक वृत्तीचाच आविष्कार झालेला आहे. म्हणून नाटयतंत्रदृष्टया सदोष असलेल्या गडकऱ्यांच्या नाटकाची आकर्षकता, त्यांतील भावनोत्कटता, कल्पनाशालित्व आणि भाषेतील आलंकारिकता व उन्मादकता या गुणत्रयांमुळे आजही अबाधित राहिलेली दिसून येते.

गडकऱ्यांनी सामाजिक नाटके लोकप्रिय केली. विनोद शुद्ध व सात्विक बनविला; रसांचा उत्कर्ष आणि परिणामकारक प्रसंग कसे साधावेत हे दाखविले. सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, "गडकऱ्यांनी आपल्या जीवाचे फूल पिळून जे अत्तर महाराष्ट्राला अर्पण केले आहे त्याचा सुगंध सदैव दरवळत राहील."

विनोदात्मक लेख लिहिण्याची पद्धत कोल्हटकरांनी मराठीत प्रथम सुरू केली. नाटयाप्रमाणे या क्षेत्रातही गडकऱ्यांनी गुरूंच्या पावलांवर पाऊल ठेवूनच प्रवेश केला. विनोदी लेखनासाठी त्यांनी 'बाळकराम' हे टोपण नाव धारण केले 'संपूर्ण बाळकराम' या पुस्तकात त्यांचे समग्र विनोदी लेख एकत्रित केलेले दिसून येतात.

शब्दनिष्ठ व अर्थनिष्ठ कोट्या, चुरचुरीत कल्पना, वक्रोक्ती आणि व्याजोक्ती वगैरे विनोदाचे घटक गडकऱ्यांच्या 'संपूर्ण बाळकराम' या पुस्तकात आढळून येत असले तरी त्यांचा सर्वात जास्त ओढा अतिशयोक्ती-कडे आहे. ही अतिशयोक्ती अनेक स्थळी रसापकर्षक तर होतेच; पण टीकेचे वर्णन करतानासुद्धा गडकऱ्यांनी तिचा लगाम खेचून न धरल्यामुळे त्यांच्या टीकेची धारही बोथट झाली.

आता कवी 'गोविंदाग्रज' म्हणून त्यांचा थोडासा विस्तारपूर्वक विचार करू. 'वाग्वैजयंती' हा त्यांचा संपूर्ण कविता संग्रह "केशवपुत्राचा महशूर। गोविंदा-ग्रज चेला सच्चा।" ही ओळ लिहून आपले काव्यगुरू केशवसुत असल्याचे त्यांना जाहीर केले. तरीपण 'तुतारी'तील तडफड व धडपड, तळमळ आणि खळबळ, दुर्बलतेचा धिःकार व वीरवृत्तीचा पुरस्कार ही 'दसऱ्यां'त फार कमी प्रमाणात आढळतात.

गडकऱ्यांच्या सामाजिक कवितांप्रमाणे राष्ट्रीय कवितांची संख्याही तुटपुंजी आहे. सामाजिक, राष्ट्रीय, विनोदी, कल्पना प्रचुर व तात्त्विक या सर्व प्रकारच्या कवितांतून गडकऱ्यांच्या कल्पनेचा विलास व भाषेचा शृंगार आढळत असला तरी भावनेचा जिव्हाळा फारसा त्यात नाहीच. नुसत्या संख्येच्या दृष्टीने पाहिले तर गडकऱ्यांच्या निम्म्या अधिक कविता प्रेमविषयक अथवा प्रेमाशी कसले तरी नाते असलेल्या आहेत असे आढळून येईल त्यांची प्रेमगीते निराशेत काळवंडलेली दिसून येतात. यास अपवाद अशी 'गुलाबी कोडे', 'गोड निराशा', 'प्रेमगाळ', 'पहिले चुंबन' यांसारखी आशा-दायक प्रेमगीते त्यांच्या संग्रहात हाताच्या बोटांवर मोजण्याइतपत देखील सापडत नाहीत.

"गडकऱ्यांची प्रेमगीते म्हणजे त्यांच्या वैयक्तिक भावजीवनाची अगदी प्रामाणिकपणे सांगितलेली कहाणी होय! प्रणयाच्या क्षेत्रात निरनिराळ्या काळी गडक-ऱ्यांना जे अनुभव आले, अथवा ज्या भावना त्यांच्या ठायी प्रबळ झाल्या त्या अनुभवांचा व त्या भावनांचा इतिहास त्यांच्या प्रेमगीतांत आढळेल." (डॉ. रा. शं. वाळिंबे-प्रस्तावना: 'वाग्वैजयंती').

'निर्दय बालेस' या कवितेत, जिच्यामुळे नैराश्य निर्माण झाले, तिला दूषणे देण्याऐवजी आपल्या दुर्दैवाचा व वेड्या प्रेमाचाच धिक्कार प्रियकर करीत आहे जिच्या चरणी सर्वस्व अर्पण केले तिने वंचना केल्यामुळे व्यथित झालेल्या जीवाचे हे आर्त आक्रंदन पाहा –

" दिला तिलांजलि अश्रूंची ही त्या प्रेमाच्या नावा
परतायाचे नाही आता त्या प्रेमाच्या गावा। "

भावनांची आत्यंतिक उत्कटता हा गडकऱ्यांचा असाधारण विशेष होय. भावनांचे अत्यंत आर्त व रसरसलेले आविष्करण करणे हेच त्यांच्या कवितेचे सर्वात महत्तम कार्य होय काव्यसृष्टी निर्माण करण्याला लागणारी कल्पकता त्यांच्या अंगी किती विपुल प्रमाणात होती याची कल्पना 'प्रेम व मरण' 'ओसाड आडातील एकच फूल' 'गुलाबी कोडे' 'गोफ' 'मुरली' व 'घुबड' या कवितांवरून सहज येते भक्ती व वात्सल्य ही प्रेमाचीच निरनिराळी रूपे असल्यामुळे ' अनामिकेचे अभंग ' 'घान' 'घुंगुरवाळा' 'बागेत बागडणाऱ्या लहानाग्या लाडक्यास' इत्यादी त्यांच्या कविता सरस झाल्या आहेत. त्यांच्या प्रेमभंगातील कारुण्याचा वात्सल्याशी संयोग होऊन 'राजहंस माझा निजला' 'निद्रागीत' 'निरोप द्यावा आता' 'वीर मरणाला शोभण्याजोगे गाणे' इत्यादी रसोत्कट करुण कविता निर्माण झाल्या.

डॉ. रा. शं. वाळिंबे 'वाग्वैजयंती' च्या प्रस्तावनेचा शेवट करताना लिहितात : " जित्या जिवाचे जातिवंत करणे' म्हणजेच रसरसलेली उत्कट अनुभूती, आणि उत्कट अनुभूतीचा तितकाच उत्कट अविष्कार करणे हे त्यांच्या मते सर्वात स्पृहणीय असे काव्याचे कार्य होय. आणि गडकऱ्यांच्या काव्याचे खरे यश यांतच सामावले आहे. अतृप्त आकांक्षा, वेड्या आशा, इच्छाचित्रे केवळ स्वप्नसृष्टीतच सफल होऊ शकतील असे ध्यास, निष्काम व उदात्त प्रेमातील पावित्र्य, प्रेमभावनेचा

पहिला तरळता साक्षात्कार, आशा-निराशांच्या संदेहातील गूढरम्य हुरहूर, प्रेमसाफल्याची सोनेरी स्वप्ने, प्रेमपूर्तीच्या परमोच्च क्षणांत साठविलेली उत्कट व अलौकिक सुखाची परिसीमा आणि त्या क्षणांतच सुप्त असलेली नैराश्याची तीव्र दाहकता, प्रणयाची दारुण वंचना झाल्यामुळे होणाऱ्या तीव्र वेदना आणि या वेदना सहनशक्तीच्या पलिकडे गेल्यामुळे लागलेला मृत्यूचा ध्यास-या साऱ्या विविध सूक्ष्म भावनांचा गडकऱ्यांच्या कवनांतून जसा सरस व उत्कट आविष्कार झालेला दृष्टीस पडतो तसा ता अन्य कोणाही मराठी कवीच्या कवनांत दिसत नाही, असे म्हटल्यास त्यात अतिशयोक्ती होण्याचे भय नाही. ”

नाट्य, विनोद व कला या साहित्यांतल्या तीनही क्षेत्रांत एकाच वेळी असामान्य प्रभुत्व व अलौकिक यश संपादन केले. म्हणूनच त्यांच्या वाङमयाभोवती व व्यक्तित्वाभोवती अद्‌भुततेचे रोमहर्षक वलय निर्माण झाले.आणि त्यांच्या ओठांतून व बोटांतून बाहेर पडलेल्या प्रत्येक अक्षरा–अक्षराने महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावले. अन् सारा दिग्विजय अवघ्या चौतीस वर्षाच्या काळात मिळवून राम गणेश गडकरी निघून गेले. पु ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे “ आमच्यासारख्या लहानग्या जिवांना अभिमान इकताच की, हा माणूस मऱ्हाटी होता. ही असली जाणीव जरा अधिक जवळीक घेऊन येते. आणि म्हणूनच केशवसुतांप्रमाणे गोविंदाग्रजही मरणानंतर गातची बसले. हे ठाऊक असूनही या अशा पन्नासाव्या स्मृतिदिनाच्या प्रसंगी पुनः एकदा मन भरून येते; अभिमानाने मान उंचावतेही आणि आदराने लवतेही “ दिव्यत्वाची जेथ प्रचीति । तेथे कर माझे जुळती ! ”

## जपत आहे........

माझ्या संवेदनशील मनाला
राहून राहून जाणवते
तो दिवस उजाडणार आहे
पापणीच्या स्पर्श–चाहुलीनेही शहारणाऱ्या
अंत:करणाचा थरकाप उडाला आहे
पाणावलेल्या लोचनांतून
नील अश्रू ओघळत आहेत
अनामिक भावगंध घेऊन.
उचंबळल्या भावनांच्या शब्दाकारास
दोन ओठांची बंदीशी घालावी लागते
माझ्याच समोरील माझ्याच सजीव प्रतिमेला
हे सारं कळू नये म्हणून
जपत आहे
मुखावर फुलल्या चांदण्याचा आव आणून !

**मधू पाटील**
प्रथम वर्ष साहित्य

## रातकिड्यांच्या संगतीत....

माझ्या निळ्या–सावळ्या दुःखाचे प्रतिबिंब
मिळते माझ्याच अश्रूत
मध्यरात्रीच्या सांद्र काळोखात
ते प्रतिबिंब पाहून
मंत्रमुग्धा मध्यरात्र थरारली . . . शहारली . . .
नक्षत्रांची प्रभा क्षीण झाली
वायुलहरींची चाल मंदावली
अर्ध-जागल्या कळ्यांनी तर श्वासच कोंडला आहे
अशा वेळी
दंव दुःखाने गंधीत झालेले माझे रूप
हसत हसत मीं जपत आहे
एकांतात रामनाम गाणाऱ्या
रातकिड्यांच्या संगतीत

**—कु. कुंदा पेडणेकर**
द्वितीय वर्ष साहित्य

## विसरायचे तर विसरून जा

विसरायचे तर विसरून जा
पण गंध मनातील ठेऊन जा
प्रीति-पताका घेऊन जा
पण पुनीत तेज ते ठेवून जा
तुझ्या लाघवी स्मीताची
अन् लकब तेवढी ठेवून जा
तू जा - - - जा. पण - - -
स्मृतिचिन्हे ठेवून जा
अन् माझ्या जीवनाचे
जीवन तू बनून जा !

— कु. सुलोचना मडलगी
तृतीय वर्ष साहित्य

## कळी होउनी खुलते आहे

कळी होउनी खुलते आहे
वेलीवर मी जाईच्या
गंध घेउनी डुलते आहे
कुशीत आज या पहाटेच्या

केव्हापासून वाट पहाते
पायघडी मी होण्यासाठी
जेव्हा जाशील संथपणाने
पश्चिम क्षितिजी भेटीसाठी

निळया पथावर संथ चालता
पश्चिम क्षितिजी रंग उधळता
ठेव आठवण या गंधाची
पायघडीच्या मृदु स्पर्शाची

— मा. भा. भोसले
प्रथम वर्ष साहित्य

## मला आवडते प्रिया अशी

मला आवडते प्रिया अशी
नाजुक सुंदर सरळ मनाची
भोळी-भाबडी दुनियेची

मला आवडते प्रिया अशी
अवखळ गोंडस मुग्ध हासरी
मन्मन रंजन करणारी

मला आवडे प्रिया अशी
नीट-नेटकी मनहारी
फुलासारखी दिसणारी

मला आवडे प्रिया अशी
सुगरण सुंदर अति उत्साही
जीवन माझे जाई-जुई

— रमाकांत शहा
प्रथम वर्ष साहित्य

जीवन हेच खरोखर वाचण्यालायक पुस्तक होय.

— म. गांधी



अध्यक्ष मा. व्ही. टी. पाटील
वार्षिक स्नेहसम्मेलन
१९६६–६७
प्रसंगी प्रमुख पाहुणे शिवाजी
विद्यापीठाचे कुलगुरु
डॉ. आप्पासाहेब पवार यांचे
स्वागतपर भाषण करीत असतांना

☆



प्रभारी प्राचार्य
१९६८–६९
महाविद्यालयाच्या
विकासाची वाटचाल
निवेदन करीत
असताना

## अभिरूप लोकसभा



"पक्षातर विरोधी अधिनियमाने" ग जली

**स्ने ह स म्मे ल न**

प्रदर्शन

विभाग

श्रीमान शशिकांत शहा

यांचे हस्ते उद्‌घाटन





"खुनाला वा

फुटली"

रहस्यमय तीन

नाटकाच्या यश

मानकरी

# गांधीजी...

## एक महान मानवतावादी संत, कवि आणि शास्त्रज्ञ !

गांधीजी प्रथमत : संत व मागाहून सर्व कांही होते. संत, वीर, कवि व शास्त्रज्ञ हे महापुरुषाचे मुख्य चार वर्ग होत. गांधीची गणना या चारी वर्गांत होऊ शकत असली तरी त्यांचा आत्मा मूलतः संताचाच आहे. प्राचीन काळीं ते जन्माला आले असते तर त्यांचा चरित्रकार बुद्धासारखा झाला असता. राजकारणातल्या अनेक मोठ्या लढायांत मुख्य सेनापति म्हणून त्यांनी भाग घेतला. त्यांचे वीरत्व त्या संग्रामांत प्रगट झालें. पण त्या वीरत्वाचा उगम आपल्या देशबांधवावर होणारे अन्याय नाहीसे व्हावेत, त्यांचे शोषण थांबावे, त्यांचा कुंठित झालेला विकास पुन्हा सुरू व्हावा, दीनदलितांचे काळोखानें भरलेलें जीवन थोडेतरी उजळावें, या भावनेंतच आहे. त्या वीरत्वांत पराक्रमाची दृष्टि नाहीं, विजिगीषेची ईर्ष्या नाहीं, उपभोगाची लालसा नाहीं, नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा नाहीं. इतिहास ज्यांना वीरपुरुष मानतो त्यांच्यात या प्रेरणांपैकी एखादी ना एखादी असतेच असते.



गांधी एक थोर कवि होते हे वाचून अनेक लोक गालातल्या गालांत का होईना हसतील. त्यांच्या मतें कवि हा सौंदर्यपूजक असावा लागतो. आणि गांधीजी तर बारा महिने चोवीस तास एक खादीचा पंचा वापरणारे, भिक्षुक-सारखे किंवा भिकाऱ्यासारखे दिसणारे ! उन्हाचा फार त्रास होतो असें वाटले तर त्या पंचाचे साहेबी टोपीशीं लग्न लावायला माघार न घेणारे. सौंदर्याशी असा छत्तिसाचा आंकडा असलेला मनुष्य महाकवि होता याच्यावर कुणाचा विश्वास तरी बसेल का ?

या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट आहे. बाह्यसौंदर्याची अंध पूजा मनुष्याला बहिर्मुख करते, त्याला भुलवून आत्म्यापासून दूर दूर नेते, ती त्याला भोगप्रवण बनविते, असें गांधीजींचे ठाम मत होतें. त्यामुळे वेषापासून लेखनापर्यंत कुठेंही बहिरंगाच्या निर्जीवसौंदर्याचें त्यांनीं कधीं कौतुक केलें नाही, स्तोम माजविले नाहीं. कलेनें जीवनावर कुठेंहि कुरघोडी करतां कामा नये हा त्यांचा मुख्य दंडक होता. शिवाय कवि बाह्य सौंदर्यापेक्षां अंतःसौंदर्याचा पूजक असावा लागतो हें काय सिद्ध करीत बसायला हवें ? गांधीजी इतका हृदयसौंदर्याचा निःसीम

पूजक जगांत शतकांतून एकादाच निर्माण होत असेल. त्यांनी आयुष्यांत एकहि कथा किंवा कविता लिहिली नसेल. पण त्यांच्या भाष्या उच्चारांतून आणि आचारांतून ज्यांच्यावर सरस कथाकाव्यें लिहितां येतील असे उत्कट, उदात्त, भावनाशील व्यक्तित्व प्रगट होत असे १९३६ सालीं अमदाबादेंत साहित्यपरिषदेबरोबर गुजराथ कलाप्रदर्शन भरलें. तें पाहून आल्यावर आपल्या भाषणांत गांधीजी म्हणाले, 'आज रविशंकर भाईंनी मला प्रदर्शन दाखविलं तें पाहून माझं हृदय भरून आलं दहा वर्षांपूर्वी असं काहीं नव्हतं. पण हीं चित्रं घेऊन मी खेड्यापाड्यांत काय करूं ? कलाकार आणि साहित्य-कार शहराकडे दृष्टी ठेवनच कलाकृति निर्माण करीत असतात. आणि बिचारे खेड्यापाड्यांतील लोक अगदी निरक्षर आणि असंस्कृत जिणें कंठतात. तुम्हांला खेड्या-पाड्यांची दशा माहीत असती तर— ' एवढें बोलतां बोलतां त्यांचा गळा भरून आला

इतर कवि विविध वृत्तांत काव्यें रचतात. गांधीजी काव्य जगले. या काव्याला सुवृत्तांखेरीज दुसरी चाल ठाऊक नव्हती- इतर काव्यें गोड शब्दांनी नटलेली असतात. गांधीजींच्या जीवनकाव्यांत पोकळ शब्दांना जागा नव्हती. प्रेमानें भरलेली कृति हाच त्यांचा शब्द होता. महापुरुषांपैकीं बुद्ध, खिस्त, किंवा तुकाराम यांच्याशीं त्यांच्या जीवनयात्रेचें साम्य वाटतें तें यामुळेंच !

त्यांचा आत्मा संताचा असला तरी ते वीर, कवि आणि शास्त्रज्ञ यांचेहि प्रतिनिधि होऊं शकतात. त्यांच्या वीरत्वाविषयीं त्यांचे विरोधक देखील शंका घेणार नाहींत. त्यांचे मन कवीचें होतें हेंहि अनेकांना अमान्य होणार नाहीं. पण मी त्यांना शास्त्रज्ञ म्हटलें तर तें मात्र पुष्कळांना-विशेषत: बुद्धिवाद हाच मानवी जीवनाचा खरा मार्गदर्शक आहे असें मानणा-रांना-पटणार नाहीं.

विविध शास्त्रांतल्या प्रगतीला, मोठमोठ्या शोधांना त्या शोधांमुळें मानवी जीवनांत निर्माण होणाऱ्या नव्या नव्या सुखसोयींना आपण संस्कृति मानतो. गांधींना ही विचारसरणी मान्य नव्हती. भोगाच्या इच्छेला जितकें अधिक खाद्य पुरवावें तितकी तिची राक्षसी भूक वाढतच राहते; व्यक्तीव्यक्तींच्या, कुटुंबाकुटुंबा-च्या, जमात-जमातींच्या आणि राष्ट्राराष्ट्रांच्या अशा अमर्याद झालेल्या उपभोगांच्या इच्छांतूनच स्पर्धा, संघर्ष आणि संग्राम निर्माण होतात असें त्यांना वाटे. त्यामुळें संयम हें त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें मुख्य सूत्र बनलें. ब्रम्हचर्य, अपरिग्रह, इत्यादि गांधीजींच्या शिकवणुकीचे विशेष त्यांच्या या पराकोटीला गेलेल्या संयमाच्या तत्त्वज्ञानांतूनच स्फुरलेले आहेत.

जीवन म्हणजे जास्तीत जास्ती उपभोग घेण्याची संधि असें मानणारांना हें तत्त्वज्ञान पटू नये हें स्वाभाविकच आहे क्रांति, सुधारणा, परिवर्तन इत्यादि जें काहीं आम्हांला हवें असतें तें शक्य तितक्या लवकर व्यवहारांत उतरलें पाहिजे तरच त्याचें महत्व आम्हांला आकळतां येतें. पण गांधीजी म्हणत, 'अमुक अमुक गोष्ट तत्त्वदृष्ट्या चांगली आहे ना ? मग आपण तिचाच पुरस्कार केला पाहिजे. जीवन म्हणजे भविष्यकाळ-अविरत मानवतेचा भविष्यकाळ-ही महात्माजींची दृष्टि होती.

एकीकडे माणसाचे हात आकाशाला पोंचले आहेत. पण दुसरीकडे त्याचा आत्मा त्याच्याच पायाखालीं तुडविला जात आहे. मानवजातीच्या कल्याणाच्या दृष्टीनें मनुष्यानें आपलें जीवन घडविण्याची, मनाला नवा आकार देण्याची वेळ आली आहे ! अलेक्सिस करेल किंवा सी. इ. एम्. जोड सारखे शास्त्रज्ञ आणि विचारवंत आधुनिक जीवनांतून उद्भवणाऱ्या मनुष्याच्या अवनतीची मीमांसा गांधींच्याच पद्धतीनें करीत आहेत. गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्या-करितां ज्या राष्ट्राला कोट्यावधि रुपये दरवर्षी खर्च करावे लागतात तें सुधारलें आहे. असें प्रामाणिकपणें म्हणतां येईल काय ? बुद्धि, भावना आणि नीति यांचे अंकुर जिथें पदोपदीं करपून जातात, तिथे मनुष्याची

प्रगति होत आहे असे कोणत्या तोंडाने म्हणायचें ? 'Man the unknown' या पुस्तकांत कॅरेल म्हणतो–

'मनुष्याची अवनति थांबविण्याचा उपाय एकच आहे. त्याच्या संस्कृतीत सुखासीनतेला स्थान असतां कामा नये आपल्या कर्तव्यतत्परतेला त्यानें नैतिकतेला कलंक लागू देतां कामा नये. त्यानें यंत्राचा अवश्य उपयोग करावा पण तो माणसाला गुलाम बनविणारे कारखाने न वाढवितां. शास्त्र भक्ति-म्हणजे जडवादाची पूजा नव्हे हें त्यानें ध्यानांत ठेवावे. असें झाले तरच माणसाची बुद्धि, नीति आणि शक्ति योग्य रीतीनें संमीलित होऊन त्याला आपल्या विकासाचा मार्ग सापडेल.'

गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशीं हे उद्गार किती मिळते जुळते आहेत हें त्यांच्या विरोधकांनी विचार करून पहायला कांहीं हरकत नाहीं.

त्यांचे हें तत्त्वज्ञान मुख्यत: नीतीचे आहे. पण जगाचे व्यवहार आतांपर्यंत भीतीवर आणि शक्तीवर चालत आलेले आहेत.

बुद्ध आणि खिरस्त यांच्याप्रमाणें भावी पिढयांतला सत्प्रवृत्त व्यक्तींना गांधी चिरकाल पूज्य वाटत राहतील. पण व्यवहाराकडून पदोपदीं पराभूत होणारी धर्मबुद्धि, शरीराकडून रात्रंदिवस उपहासिला जाणारा आत्मा आणि क्षणिक मूल्यांकडून पावलोपावलीं तुडविली जाणारी चिरंतन मूल्यें ही सर्व त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या आधारानें अधिक सामर्थ्यशाली होऊन जीवनाला नवें रूप देऊं शकतील की काय हा वादग्रस्त प्रश्न आहे, त्यांचे उत्तर भविष्यकाळच देऊं शकेल.

ते उत्तर अनुकूल असो वा प्रतिकूल असो, गांधीजींचें मोहक प्रेरक आणि संजीवक व्यक्तित्व हा सदैव मानवतेच्या कौतुकाचा, आदराचा आणि भक्तीचा विषय राहील यांत शंका नाहीं. लोलकांतून सूर्याकडे पाहिलें की डोळ्यापुढे विविध रंगाचे नर्तन सुरू होतें ना ? कुठल्याही साध्या प्रसंगांतून गांधीजींच्या व्यक्तित्वाचें विश्लेषण करूं लागलें की तोंच अनुभव येतो. त्यांत वज्राच्या कठोरतेबरोबर फुलांचा कोमलपणा आहे; आकाशाच्या अनंतत्वाच्या सोबतीनें घरट्याचा मर्यादितपणा आहे; अश्रूंच्या तालावर हास्य नाचत आहे. ध्येयवाद च्या हातांत हात घालून व्यवहार पावलें टाकीत आहे.

त्यांची विनोदवृत्ति पाहिली की मन असें प्रसन्न होतें घनघोर वादळांत, उत्तुंग लाटांच्या तांडवांत, सार्‍या सृष्टीच्या अंगाला काजळ फासणार्‍या काळोखांत एखाद्या गलबताला दीपस्तंभावरली ज्योति दिसत रहावी तशी त्यांची विनोदबुद्धि वाटते.

विनोदबुद्धि आणि सहृदयता या सख्या बहिणी असतातच असें नाहीं. अनेक मोठ्या व्यक्तींच्या चरित्रांत या दोघींचे कांहीं जवळचें नातें असेल असा भास देखील होत नाहीं. गांधींच्या व्यक्तित्वाचें वैशिष्ठ इथेंच आहे त्यांत दोन ध्रुव सहजासहज संमीलित होत असत. 'मनुष्यावर केवळ मनुष्य म्हणून प्रेम करण्याची त्यांची शक्ति असीम होती तो चांगला असला तर सज्जन म्हणून ते त्याला आपला मानीत त्यांच्यात कांही वैगुण्ये असली तर तीं नाहींशी झाली पाहिजेत म्हणून ते त्याला जवळ करीत. त्यांच्या हृदयाचीं सारीं द्वारें दीनदलितांना सदैव उघडीं असत. तिथें जातपात, धर्म, वर्ण कशाचीही पर्वा नसे. अशी सर्वस्पर्शी उत्कट, उदात्त सहृदयता ज्याच्या रक्तातला बिंदु नि बिंदु व्यापून राहिली आहे असा आत्मा शतकानुशतकांनी एखादाच निर्माण व्हायचा!

गांधीजींचा मृण्मय देह आपल्यातून नाहींसा झाला आहे. पण त्यांचे जीवनसंगीत अमर आहे!

---

"आम्ही पाहिलेले गांधीजी" ह्या पुस्तकाच्या श्री. वि. स. खांडेकर यांच्या प्रस्तावनेतून उद्धृत

❊❊

# बापूजींना भावपुष्पांजली—

भारत होता पोळत भाजत
नव्हती त्याची कुणाही खंत

विचार धूम पेटला . . पेटला . . .
त्या ज्वाळेतून मंगल दिन उजाडला

सूत्रधार हा गांधी त्याचा
सुपूत्र गमला भारत भू चा

तोडून शृंखला केला भारत मुक्त
हातीच अरुणोदय, त्याचाच व्हावा अस्त!

परि हाय ! गेला-गेला सोडुनी लोका
अन् भारत झाला अभागी पोरका

आज जन्मशताब्दीचा हा दिन
मंगल अन् दुःख मिश्रित क्षण

भाव-भक्तीचे प्रेमळ सुमन
माळ तयाची करितो अर्पण.

मोहन कुलकर्णी
द्वितीय वर्ष साहित्य

# आम्हाला गांधीवादाबद्दल काय वाटते ?

## नवयुवकांचे विचार

-बी. जी. कुंभार

म. गांधी जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'गांधीजी व त्यांचे तत्वज्ञान' या विषयावरील विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक विचार व जिज्ञासा जाणून घेण्याच्या उद्देशाने काही विद्यार्थ्यांच्या मुलाखाती घेण्याचा उपक्रम आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. भैरव कुंभार (तृ. व. साहित्य) यांनी केला आहे. नवीन पिढीला गांधीवादा-बद्दल काय वाटते, या दृष्टीने या मुलाखाती उपयुक्त ठरतील.

विद्यार्थ्यांना प्रामुख्याने खालील प्रश्न विचारण्यात आले.

१) म. गांधी आणि त्यांचे तत्वज्ञान या विषयीचा काही अभ्यास आपण केला आहे का?

२) गांधीजींच्या जीवनापासून कोणत्या गोष्टी स्फूर्तिदायी वाटतात?

३) गांधीजींच्या तत्वज्ञानाविषयी तुमचे मत-

४) देशाच्या सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्यास गांधीवाद उपयुक्त ठरेल काय?

५) आजचा प्रचलित गांधीवाद —तुमचे टीकात्मक परिक्षण आणि निरीक्षण.

विभिन्न विद्यार्थ्यांच्या घेण्यात आलेल्या मुलाखती ह्या वर्तमान युवकांच्या प्राति-निधीक ठरतील अशी अपेक्षा आहे !

- किसन रोकडे
प. पू. साहित्य

प्रश्न : एक जागृत विद्यार्थी म्हणून 'गांधीजींच्या' विषयी तुम्ही कांही विचार मांडू शकाल का ?

❋हो मांडू शकेन ! लहानपणापासूनच मोठ्या लोकांचा आणि राष्ट्रीय पुढाऱ्यांचा सहवास लाभल्यानें गांधीजींच्याविषयी मला बरेच कांही वाचायला आणि ऐकायलाही मिळाले, पण हेही खरे की ही सर्व माहिती पूर्ण आणि पुरेशी आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे गांधीजींच्यावर बोलण्याच्या माझ्या पात्रतेबद्दल मी स्वतःच साशंक असल्याने माझे विचार कदचित एकांगी असतील.

प्रत्येक राष्ट्रपुरुषाचे जीवन हे स्फूर्तीदायी असतेच ! असा पुरुष हा तनमनधनाने राष्ट्र-पुरुष असतो. गांधीजी हे त्यातले एक आहेत हे कुणालाही नाकारता येणार नाही.

ऐकण्यातले गांधीजी, वाचनातले गांधीजी आणि आचरणातले गांधीजी यात बरीच तफावत आढळते. मी गांधीजींना ओळखतो ते एक राष्ट्रसंत म्हणून ! "सत्य, अहिंसा, परमोधर्म" हे त्यांचे विचार आजच्या गांधीवाद्याच्यामध्ये अभावानेच पहायला मिळतात, हे माझे मत जरी सर्वार्थी खरे नसले तरी यातली सत्यता नाकारता येणार नाही.

प्रश्न : श्री. रोकडे, लहानपणापासूनच पुढाऱ्यांचा (!) सहवास लाभल्याने तुम्ही आपली मते परखडपणें मांडलीत. यावरून तुम्हाला असच म्हणायचं का की, गांधीजी अनुयायी तयार करू शकले नाहीत ?

❋ हो ! पण तयार केले नाहीत म्हणण्याऐवजी तयार झाले नाहीत असे म्हणणेच मी संयुक्तिक मानेन.

प्रश्न : या गांधीवादातून आजचे प्रश्न सुटतील का ?

❋गांधीवादामुळे आजचे प्रश्न सुटतील असे निदान मला तरी वाटत नाही. स्थल, काल परिस्थितीनुसार जीवन हे बदलत असते हे मान्य केले तर आजच्या अस्थीर अवस्थेत, विज्ञान युगात आणि स्पर्धात्मक संघर्षमय जीवनात गांधीवादाने आजचे प्रश्न मुळीच सुटणार नाहीत. आजच्या समस्या या आम्हालाच सोडवाव्या लागणार आहेत.

रोकडे, आपण आपली मते स्पष्टपणें मांडलीत. धन्यवाद !

० ० ०

कलगोंडा पाटील
तृ. व. साहित्य

प्रश्न : पाटील महाविद्यालयातील एक अभ्यासू विद्यार्थी म्हणून गांधीवादाचा तुम्ही कांही अभ्यास केला आहे का ?

❋ हो! गांधीजींच्यावर माझे थोडे वाचन झाले आहे. आणि मीं ते आवडीने केले आहे. आम्ही नवयुवकांनी गांधीजींचा अभ्यास करायचा नाही तर आणखी कुणाचा करायचा ? एक राष्ट्रपिता म्हणून, एक राष्ट्रपुरुष म्हणून प्रत्येकाने गांधीजींचा, त्यांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करायला हवा. गांधीजींना समजावून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.

प्रश्न : कायहो पाटील, गांधीजींच्या विषयीचे तुमचे आकर्षण कशामुळे वाढले ?

❋ माध्यमिक शाळेमध्ये शिकत असताना त्यावेळचे आमचे मुख्याध्यापक हे गांधीवादाचे पुरस्कर्ते असल्याने त्यांच्या जवळीकतेमुळे त्यांनी सुचविलेल्या आणि पुरविलेल्या ग्रंथांच्या वाचनामळे नकळत माझ्यावर गांधीजींच्या जीवनाचा योग्य परिणाम झाला. प्रयत्न आणि चिकाटी;

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या गोष्टी मला स्फूर्तीदायी वाटल्या. त्या आचरणात उतरविण्याचा मी प्रयत्न केला. ते कितीसे जमले हे मला सांगता येणार नाही. पण या प्रेरणेतून मी इथपर्यंत आलो, हेही मला नाकारता येणार नाही.

प्रश्न : बरं, पाटील; गांधीजींच्या जीवनावरील वाचनाने आणि त्यातून मिळालेल्या स्फूर्तीने प्रेरीत झालेला एक जागृत नवयुवक विद्यार्थी म्हणून तुम्ही जी मते मांडलीत ती मान्य करून मी तुम्हाला विचारतो की, या गांधीवादामुळे देशाच्या सामाजिक व आर्थिक समस्या सोडविता येतील काय?

❊हो! का नाही येणार? गांधीवादामुळे देशाचे प्रश्न जरूर सोडविता येतील. मात्र प्रश्न आहे तो आचरणाचा! प्रत्येकाने जर खऱ्या अर्थाने गांधीवाद आचरणात आणला, विचाराला आचारांची जोड दिली तर आपल्या देशाचेच काय पण साऱ्या जगाचेच प्रश्न सुलभतेने सुट– तील. मात्र हेही खरे की, आज खरा गांधीवाद बाजूलाच राहिला आहे. उलट खादीच्या डगल्या- खाली त्याला लपवून खा-आदी ही प्रवृती वाढते आहे. त्यामुळे मी थोडा निराश आहे.

पाटील, आपण आपली प्रामाणिक मते मांडलीत मी आपला आभारी आहे.

० ० ०

सुरेश श्रेष्ठी
द्वितीय वर्ष साहित्य

प्रश्न : हे गांधी जन्म शताब्दीचे वर्ष असल्याने सर्वत्र गांधीजींची जन्मशताब्दि उत्साहाने आणि आत्मि- यतेने साजरी केली जात आहे अशा या थोर विभूतीविषयी तुम्ही काही खास वाचन, अभ्यास केला आहे का?

❊ गांधीवादाचा अभ्यास मी केला आहे आत्मचरित्र व इतिहासातून पूज्य गांधीजींच्या विचारांची छाप मजवर पडली आहे. शाळेतून मात्र या महान व्यक्तीबद्दल विशेषशी ओढ निर्माण करणारे शिक्षक मला भेटले नाहीत. महाविद्याल- यातही असे चांगले वळण लावले जात नाही.

गांधीजींच्या विचारांचे मनन करण्यात एक प्रकारचा आनंद प्राप्त होतो. आज पैशाने विकत न घेता येणाऱ्यापैकी ही विचाररत्ने आहेत. म्हणून या विषयाचा अभ्यास मलाच काय सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल गांधीवादाचा अभ्यास काय आहे, हे थोडक्यात व्यक्त करणें अशक्य असले तरी जुनी माणसे जशी वागली व वागावयास सांगतात त्यात गांधीवाद आहे. रंग बदलणाऱ्या हल्लीच्या माणसापेक्षा जुनी म्हातारी माणसें गांधीवादाच्या 'बँका' वाटतात. सत्य–अहिंसा-सत्याग्रह हे दिपस्तंभ होते,आहेत व चिरंतन राहतील. एवढे सांगितल्यावर गांधी– वादाचे महत्व सहज पटते. 'सगळीच माणसे वाईट नसतात', हा आधार गांधीवाद टिकण्यास पुरेसा आहे.

प्रश्न : श्री. श्रेष्ठी गांधीजींच्या आणि त्यांच्या तत्व- ज्ञानाच्या अभ्यासावरून त्यांच्या जीवनापासून आणि तत्वज्ञानापासून तुम्हाला कोणत्या गोष्टी स्फूर्तीदायी वाटतात? त्यापासून कांही शिकण्यासारखे आहे का?

❊ गांधीजींच्यापासून घेण्यासारखे खूप आहे. पण समाज घेतही नाही आणि घेणाऱ्यांची कुचेष्टा मात्र करतो. स्वावलंबन, सत्याग्रह, साधी राहणी इत्यादी गोष्टी स्वीकार्ह आहेत. अहिंसा हे मवाळांचे तत्व नाही तर झुजार जीवनाचा कल्याण मार्ग आहे. 'सत्य' हा गांधी– वादाचा गाभा आहे. गांधीवाद व त्यांचे तत्वज्ञान

आज जरी तरुणाना पटत नसले तरी या गोष्टीना डावलून चालणार नाही. म. गांधी आणि त्यांचे विचार एक प्रकारची डोकेदुखी आहे असा विचार प्रवाह काही सुबुद्ध माणसे वाहत ठेवतात. पण कोंबडे झाकल्याने सूर्योदय टळत नाही. जगाला या तत्त्वज्ञानाने वेड लावले आहे. याला भगवद्गीतेचा आधार व आशीर्वाद आहे. म्हणून हे तत्वज्ञान मला नेहमीच स्फर्ती देते. दरिद्रयांना हा एक दिलासा आहे. असा दिलासा इतरत्र कुठेहि नाही.

प्रश्न : श्री. श्रेष्ठी, गांधीवादाच्या केलेल्या तुमच्या शिफारशीवरून तुमचा अभ्यास बराच असल्याचे आढळले. गांधीवादाने प्रेरीत झालेला एक तरुण म्हणून मी तुमच्या मताशी सहमत आहे. पण या गांधीवादाचा उपयोग आर्थिक व सामाजिक समस्या सोडविण्यासाठी होईल काय ?

❋ प्रश्न गहन आहे. आजची जीवनमूल्ये व नेतृत्व पाहता या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी देण्याचा मोह आवरत नाही. आम्हा तरुणापुढे तशी आशा ठवण्याचा प्रयत्न आमच्या नेत्यात नाही, ही खेदाची गोष्ट होय! लांचलुचपत, वशिलेबाजी, अधिकार मोह, दूराग्रह या वावटळीत गांधीवाद निरुपयोगी ठरणार अशी साधार भीती वाटते. गांधी राजकारणी नव्हते, ही गोष्ट आमच्या नेत्याना कळणे शक्य नाही. तेव्हां गांधीवादाचा भविष्यकाळ चांगला आहे, हे मी कसे सांगू ?

प्रश्न : 'एकंदर आजचा प्रचलित गांधीवाद' या विषयीचे आपले टीकात्मक विचार ऐकायला मिळतील का ?

❋ हे पहा; 'आजचा प्रचलित गांधीवाद' हा शब्द प्रयोगच त्या महान नेत्याला कलंक लावणारा आहे. त्यांचे विचार आज अडगळीत पडले आहेत. नाही म्हणायला एक विनोबाजींची मिणमिणती ज्योत आहे. पण ही ज्योत आजच्या विध्वंसक मशालीपुढे फिकीच आहे. आज गांधीवादाची थट्टा चालली आहे. आजचा गांधीवाद निव्वळ ढोंग आहे. त्यामुळे मूळ विचार प्रवाहात एक खंड पडत आहे. तो मार्ग असाच बुजत गेला तर आध्यात्मिक लोकशाहीच काय साधी लोकशाही टिकणार नाही. पुन: महायुद्ध अटळ आहे. माझ्या देशापुरताच जरी विचार केला, तरी आम्ही स्वातंत्र्य टिकविण्यासही असमर्थ आहोत, असे वाटते.

प्रश्न : अच्छा, श्रेष्ठी यावर कांही उपाय सुचवू शकाल?

❋ त्यासाठी आजचे मार्गच बदलले पाहिजेत. आजचा प्रचलित प्रचारात्मक गांधीवाद धुळीस मिळाला पाहिजे. आमच्या नालायक ढोंगी नेत्याना सत्तेवरून खेचले पाहिजे. पण भविष्य हाती घेणारे तरुण पुढे आल्याशिवाय हे शक्य नाही. नेते तसे हालत नसतील तर त्यांचे बळीं घेतले पाहिजेत. यातच मला अहिंसा वाटते.

श्री. श्रेष्ठी आपण अत्यंत प्रामाणिकपणे तसेच निर्भिडपणें आपली मते मांडलीत, समाधान वाटले. धन्यवाद !

० ०

वासंती कुलकर्णी

तृ. व. साहित्य

प्रश्न : म. गांधी जन्मशताब्दीं वर्षानिमित्त आम्ही आपल्या महाविद्यालयाच्या 'शिवराज' या वार्षिक अंकासाठी गांधीजीविषयी कांही मुलाखती घेणेंचे ठरविले आहे. विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून गांधीजींच्या विषयीचे आपले विचार मांडू शकाल का ?

❋ हो ! मी माझे कांही विचार मांडू शकेन. मात्र गांधीजींच्या विषयी माझे तितकेसे वाचन वा चिंतन झालेले नाही. गांधीजींचे 'माझे सत्याचे

प्रयोग' या पुस्तकावर आधारित श्री पु ल. देशपांडे यांनी रेडिओवर निवेदित केलेली भाषणे मी नेहमी ऐकत असे. माझ्या अल्पमतीप्रमाणे मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करते.

प्रश्न : केवळ रेडिओवरील गांधीजींच्या विषयी भाषणें ऐकून आपल्यावर गांधी विचारांचा प्रभाव पडला, असाच याचा अर्थ घ्यायचा का?

Indeed, books are the ever–lasting wealth of this world. According to Robert Southey, books are the never–failing friends of mankind. We can have knowledge of the ideals of our ancestors only with the help of books. We can understand the ancient world by reading books. We can borrow the ideas of the people who live at the other end of the world. We can understand the views of the persons that is the writers. Books can affect the daily–life of the reader. Books create a sense of pity and sympathy in the mind of the reader. Books awaken the concience of the reader and they teach–in the words of Mr. swayn–

> "To up-lift our fellow being
> And, like man, to feel for man !"

Reading of books makes the reader a full–man. Books are the carriers of knowledge and civilisation. They are shriness and stores–house of knowledge and wisdom. That is why Ruskin called books "King's Treasure." To turn a page of a book is like opening a treasure–house of wisdom. The knowledge imparted by books cannot be measured Books give us entertainment alohg with knowledge. Books have played a predo-

minant part in the development of man's mental powers. They are universal guinding principles Books are tndicators of psychology of the public and representatives of progressive society. Ruskin says, "Riches of a man depends upon the number of the books that he has read."

Books not only impart knowledge but also creat eharacters. Influence of books is very important and from this point of view books are invaluable. Often the reading of a single book has affected a man's life wholly. There are many more examples of the influence of books. During a jonrney, M. Gandhi took with him Ruskins "Unto This Last." He was was fascinated by the first page and so he went through it. He himself says, "There and then I decided to change my whole plan of life." It is Ruskin's "Unto This Last" that made a Mahntma Mr Gandhi whose centenary is being celebrated thorough-out the world. In the same way. John Wesley read William Law's "Seripus Call" and became a great Evangelist by its influence Adam clark declares that he has learnt more of his duty to God, his neighbours and himself from "Robinson crusoe"

Books are the friends of the friendless, Books lift the poor out of poverty, they lift the wretched out of their misery, they make the burden bearers forget the burden, the sick their sufferings and pains, the sad their grievances, the oppressed their degradation and insult. Books are the companions to the deserted men, and they are joy to the joyless, cheer to the disappointed Books are the helpers of the helpless, people. They bring light into darkness Books replace the shadow by sunshine. They turn a pessimist into an optimist. In the words of Mr. Milton, "A Book is the precious life-blood of a master-spirit, embalmed anc treasured upon life, beyond life !"

*– Shankar B. Jadhav*
F. Y. B Com

C. I. D. Inspector : How come our suspect managed to get out of the building ?
Did you guard all the exits like I said ?

Green Sargent : Yeah, but he must have slipped out of one of the entrances.

"Truth resides in every human heart and one has to search for it there, and to be guide by truth as one sees it. But no one has a right to coerce others to act according to his own view of truth."

—Mahatma Gandhi

# Wonders of the World ! !!

## Seven Wonders of the Ancient World

1) Pyramids of Egypt.
2) Hanging Gardens of Babylon
3) Colossus of Rhodes
4) Pharos or Light-house of Alexandria
5) Tomb of Mausoleus in Asia Minor
6) Temple of Diana in Greece
7) Statue of Jupiter at Olympus

## Seven Wonders of the Middle Ages

1) Great Wall of China
2) Leaning Tower of Pisa
3) Stonehenge in England
4) Porcelain Tower at Nanking, China
5) Mosque of St. Sophia constantinople
6) Coliseum at Rome
7) Catacombas of Alexandria

## Twenty Wonders of To-Day

1) Niagara Falls
2) Great Canyon of Colorado
3) Taj Mahal, India
4) Great Divide Rocky Mts.
5) Sydney Harbour, Australia
6) Hot Springs, Iceland
7) Pink Terraces, New Zealand
8) Skyscrapers of New York
9) Temples of the Lhamas, Tibet
10) Tchand, the moving lake in the Sahara Desert
11) Eiffel Tower
12) London's Subways
13) Victoria Falls, Rhodesia
14) Ice-Palaces, Montreal
15) Sydney Bridge
16) Mersey Tunnel
17) Panama Canal
18) Suez Canal
19) Glaciers of Greenland
20) Cunard Liner, Queen Mary

Collected by—

*Shri S.B. Jadhav*

F.Y.B. Com.

## *Peace*

Don't mrder thy humanity,
It is thy vanity.
Oh ! man of science
Though thou art in defence.

Not great as thou suppose today
Though thou art in rocket day,
Accomplished nothing going on the moon,
Thou will come to know soon.

Oh ! flyingman foget me not now
Oh ! rocketman king of thou,

Lived a happy life,worshipped peace
Live in peace.
And let live others in peace.

*P. Vasant,*
S. Y. B. A.

**Gandhiji on truth**

" True Beauty after all consists in purity of heart. Art to be are must soothe I want at and literature that ean speak to the milliohs. "

★

## *Bird*

O ! dear and neat bird
Go high in the sky

My dear soul you have
The world enough to fly ॥

O ! my sweet heart go freely
There is much to enjoy

Dear bird go safe and sound
But don't forget this poor boy ॥

*Kate B. G.*
S. Y. B. A.

**and beauty**

" People generally fail to see Beauty in Truth, the ordinary man runs away from and becomes blind to the beauty in it. When-ever man begins to see Beauty in Truth, then Art will arise, "

# NapoleoN and the Fruit Seller

Once there lived a lady who had two children. She had a fruit-shop when Napoleon was a small boy he was very fond of fruits. When he went to school he used to buy fruits from her. He was her daily Customer. When his pocket money was exhausted he used to buy the fruits on credit and promised her to pay the amount later.

The fruit seller trusted him because he was a very honest boy. Many years passed since he left the school and went in to the world out side. After some years he became an Emperor and one day he went to his town specially to pay the money which he owed to the fruit seller. The fruit seller was amazed and asked him who he was. He then remainded her of the boy who always came to take fruits from her shop.

Oh ! is that boy you ? Yes ! Napoleon replied and paid the money. He then sent her children to school at his own expense.

MORAL :

Honesty pays in the long run.

*V K Kothiwale*
P. D. Arts

Only key to the solution of India's problems lies in Socialism, and when I use this word I do so not in a vague humanitarian way but in the scientific economic sense. Socialism is, however, something even more than an economic doctrine; it is a philosophy of life. I see no way of ending the poverty, the vast unemployment, the degradation and the subjection of the Indian people except through Socialism.

– Jawaharlal Nehru
The heir of Bupaji

*O God*

Lord of humanity, dwelling in the
little pariah hut,

Help up to search for the through-
out that fair land

Give us thy humility, Give us the
ability and willingness,

To identify ourselves with the
masses of India.

–mahatma gandhi

# Science In Everyday Life

## Industry :-

The Process of industrial development has also helped to bring science to the door of the farmer in rural (area) India. Many a giant project is located in villages which were unheard of twenty years ago. Sindri, Durgapur, Bhilai, Rourkela, Neyveli, Ramachandrapuram and a host of other small olaces, have spread technology and modern know-how in the contryside The sons and daughters of the farmers are today working on these plants; they carry home, day a after day, an increasing measure of scientific awareness industrialisation has also given rise to a number of ancilliary industries and young india has rapidly taken to smallscale industry, including the making of some of the most Sophisticated parts which go to serve electrical or the automobile industrry.

The skill which the Indian technicians have is the skill of the traditional craftsmen. Indeed the rapid economic development has in recect years, made great demand on technical skill. There are, therefore, polytechnics and engineering colleges all over the country: practically each district can boast of one or two. Today there are 380 institutions which train 530 boys and girls in technical fields In addition to polytechnies and industrial workshop, there are collages and institutions of higher studies where science, pure and applied, is leamtg taught to men and women of India. Among them are the children of farmers, traders and people in humble walks of life, who were not themselves recipients of much formal education.

## Education :

Facilities for the study of engineering in different branches, and medicine have grown steadity, consitent with the policy of spreading students who are taking to the study of pure science' has risen phenomenally; today there are 33,000 who are taking to the Study of pure science has risen phenomenally: today there are35,000 who are studying physics. chemistry, biology etc. at the graduate level and above. to facilitate the study of the pure science there are now more opportunities and financial aids- The science talent search scheme run by the

National Council of Educational Research And Training, for instance, enables the student to study science above the high school level right up to the doctorate level. The scholarship, which ranges from Rs. 100/- at the B. Sc level to Rs. 350 - at the ph. D. level, makes it possible for the hunblest to pursue the study of science Private financial resources being no longer relevant. There are other schemes to aid young men and women to take to scientific education, in the field of agriculture and veterinary science for instance there is a high proportion of students who get scholarship.

## Women :

A significant phenomenon of modern India is the increasing participation of women in the fields of science and technology. As education spreads, more and more women are taking to the study of science in schools and colleges,- something that augurs well for the next generation. There are 97, 250 women ( 18% ) doing degree course in science at the various colleges and universities. Women have specialised even in the fields of engineering and technology, including electronics and aeronatics which were considered the exclusive areas of men. In the field of higher research and medicine, women are today working side by side with men in laboratories and research institutions. In industries, suchas, radio, electronics, pharmaceuticals etc. the skill that women show has made them particularly suitable for employment. The Bharat Electronics for instance, has a high proportion of women employees. The H. M. T. Watch factory, is another instance.

These men and women who represent new India came from ordinary homes. There are no previleged children of well-to-do families who could afford education abroad. The climate in which talent in the field of science finds adequate encouragement enables any bright student of science to go up a high position of responsibility in whibh he or she can make original contribution to science and scientific advancement.

But popularisation of setence is more important than isolated efforts in research laboratories. In agricultural societies, in India where literacy is not high, it is indeed more difficult; but irorically, it is just these rural areas which are in the greatest need for the application of science if development has to have meaning. Even a simple thing like the recognition of the need for balanced diet can have for reaching effects; lack of understanding of this is what stands in the way of changing people's food habits.

Side by side with the impact which technology and industrial development are haviug in the country-side, there is need to improve science education in schools and colleges. In order to fulfil this, there are measures such as, the imporovement in the status and salary of teachers and the involvement of scientists and technologists in the country's plan for development. An important step towards popularisation of science literature is the international award known as the Kalinga Prize Instituted in 1962.

*Patel B. H.* B. Com. Part I

# Little Man With Great Soul



MAHATMA GANDHIJI; the little man with great soul, had a colourful, many splendoured personality, sometimes gay, many a time serious. He could act like a child and at the same time he could be a hard task master. He was a strict accountant and an auditor and would insist that every pie spent by him should be accounted for. Even in jail he tried to learn various languages. He was a good cook and baker.

Gandhiji was not in the habit of dreaming dreams; but that does not mean, he never tried to keep something in his mind. Gandhiji was very particular about two things, namely message to the people at the meetings, and the discipline of volunteers. It was the practice to render by every one on account of work done, spinning, diary writing at the prayer meeting. If there was any breach, one was supposed to admit it frankly. When he was a high-school boy he unleashed his first mighty non-co-operation movement. One cannot see nothing in common between the life of Mahatma lived and the people in the country are following today.

The thought of Gandhiji has considerable effect of dominating the revolutionery concept. It does not mean the addiction to non violence, Satyagraha important weapn. For most of the people Gandhiji is not more a saint for them he is revolutionary. The fact that Gandhiji was at height of his power in 19[illegible]2 but after coming out of the jail he was unable to judge the correct political situation.

Gandhiji the littleman with great soul the like of whom India and world will never see for a longtime to come.

*Ku Kala Torgilli*
F. Y. B. A.

O O

# श्रमदान !

## डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन



कुलगुरु व कुलसचिव यांच्या सोबत महाविद्यालयाचे श्रमदान करणारे विद्यार्थी

□

## समाजसेवा असो अमुचे ब्रीद !

डॉ. गुणे यांच्या "मोफत शल्य शिबिरात" महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा उत्साहाने भाग घेतला.



## यशाकडे वाटचाल....



शंकर जाधव
पदवीपूर्व वाणिज्य प्रथम क्रमांक



राम देसाई
उत्कृष्ठ खेळाडू



देवरकर
वा. स्नेहसम्मेलन वैयक्तिक प्राविण्य



निगापा पाटील
क्रिकेट



सुभाष देशपांडे
सर्वोत्कृष्ट एन. सी. सी. कॅडेट

# शिवराज महाविद्यालय वार्षिक अहवाल १९६८-६९

## जिमखाना कमिटी अहवाल १९६८-६९

विद्यार्थ्यांच्या अधिक उत्साहामुळे कॉलेजमधील जिमखाना कार्यक्रमाला सुरवात थोडीशी लवकरच झाली. जिमखाना कमिटी सभासदांची निवडणूक दिनांक ११ जुलई ६८ रोजी घेण्यात आलीं कमिटीचे काम सुव्यवस्थितरीत्या चालावे या दृष्टीने जिमखाना कमिटीचे चार विभाग पाडण्यात आले.

१) क्रीडा विभाग
२) सांस्कृतिक कार्यक्रम व भित्तीपत्रक विभाग
३) वर्ग प्रतिनिधी मंडळ
४) साहित्य व साहित्येतर अभ्यास मंडळ

प्रत्येक विभागाची जबाबदारी प्राध्यापक प्रतिनिधी व विद्यार्थी प्रतिनिधी यानी संयुक्तपणे उचलली. प्राध्यापक प्रमुखांची नियुक्ती प्राचार्यांच्या कडून करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधींची निवड निवडणूक पद्धतीने विद्यार्थी मतदारांनी केली साहित्य व साहित्येतर मंडळावरील विद्यार्थी प्रतिनिधींची नियुक्ती त्या मंडळाच्या प्राध्यापक प्रमुखानी केली. या आधारे :

जिमखाना कमिटी ६८-६९ एका दृष्टीक्षेपात

अध्यक्ष- प्राचार्य डी. जी. कुलकर्णी (२४सप्टें. ६८पर्यंत
अध्यक्ष- प्र. प्रा. एन. के. कुकडे (२५सप्टें. ६८ पासून
चेअरमन- प्रा व्हीं एम. पाटील
ज. सेक्रेटरी-श्री. व्ही. बी फडणीस
विद्यार्थिनी प्रतिनिधी- कु. तोरगल्ली के व्ही

## क्रिडा विभाग :

प्राध्यापक प्रमुख प्रा. व्ही. एम. पाटील

विद्यार्थी प्रतिनिधी -

क्रिकेट ए. बी. पाटील, S.Y.B.Com
फुटबॉल एस. एम मगदूम, F.Y.B Com,
मायनरगेम्स-एस. व्ही. तोरगल्ली,S.Y.B Com
भारतीय खेळ-डी. एल. नाईक, F.Y.B A.
अँथलेटिक्स व्ही. व्ही. फडणीस, S.Y.B.A.

## सांस्कृतिक कार्यक्रम विभाग :

सांस्कृतिक कार्यक्रम मंडळ
प्राध्यापक प्रमुख - प्रा. सौ. नीला पांढरे
विद्यार्थी प्रतिनिधी-दंडगे एस. व्ही S.Y B. Com
विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. कुलकर्णी एस डी. F.Y B.A.

## भित्तीपत्रक विभाग :

प्राध्यापक प्रमुख-प्रा. के. एस. गुरव
विद्यार्थी प्रतिनिधी- राम जोशी

### वर्ग प्रतिनिधी मंडळ

| | | |
|---|---|---|
| पदवीपूर्व साहित्य | - | रोकडे के. आय. |
| पदवीपूर्व वाणिज्य | - | कळेकर एम. एस. |
| प्रथमवर्ष साहित्य | - | घुमे एस. जी. |
| प्रथमवर्ष वाणिज्य | - | मोहिते बी. एस. |
| द्वितीयवर्ष साहित्य | - | काटे बी. जी. |
| द्वितीयवर्ष वाणिज्य | - | जोशी ए व्हा. |
| तृतीयवर्ष साहित्य | - | हिडदुगी बी. एम. |
| तृतीयवर्ष वाणिज्य | - | इंगवले एस. जी. |

## साहित्य व साहितेतर अभ्यास मंडळे :

### मराठी वाङमय मंडळ

प्राध्यापक प्रमुख प्रा. सौ. नीला पांढरे
विद्यार्थी प्रतिनिधी -राम जोशी, S.Y.B.A.

## हिंदी साहित्य सभा

प्राध्यापक प्रमुख-प्रा. के. एच. मणियार
विद्यार्थी प्रतिनिधी-कुंभार बी. जी. T.Y.B.A.

## इंग्रजी वाङ्मय मंडळ

प्राध्यापक प्रमुख-प्रा. ठाणे जी. आर.
विद्यार्थी प्रतिनिधी- जाधव एस. बी. F.Y.B.Com

## नियोजन मंडळ

प्राध्यापक प्रमुख- प्रा. एन. एम. कुलकर्णी
विद्यार्थी प्रतिनिधी-इंगवले एस. जी. T.Y B.Com

## वाणिज्य मंडळ

प्राध्यापक प्रमुख-प्र. प्रा. एन. के. कुकडे
अध्यक्ष-बी. एस. देसाई, S.Y.B.Com
चिटणीस-आर. एस. पाटील, S.Y B.Com

## क्रीडा विभाग अहवाल

शिवराज महाविद्यालयाच्या आजी आणि माजी विद्यार्थ्यांना अभिमान वाटावा इतके सुयश चालूवर्षी कोल्हापूर झोनल स्पोर्टस्‌मध्ये विद्यार्थ्यांनी संपादन केले. या वर्षाचे प्रमुख मानकरी आहेत अँथलेटिक्स गटाचे खेळाडू. या गटामध्ये एकूण ९ खेळाडूंनी भाग घेतला पैकी चार खेळाडूंनी आपली चमक दाखवून आंतर विभागीय स्पर्धेमध्ये प्रवेश मिळवीला. निकाल खालीलप्रमाणे.

पाटील एन. बी. S.Y.B.Com

१) उंचउडी- प्रथम क्रमांक
२) लांबउडी दुसरा क्रमांक
४) पोलव्हॉल्ट-द्वितीय क्रमांक
४) अडथळा शर्यत (११० मि.) तृतीय क्रमांक

देसाई आर. एम. F.Y.B.A

१) अडथळा शर्यत-(४००) प्रथम क्रमांक
२) ,, ,, ११०मि.) द्वितीय क्रमांक

पाटील आर. बी. F Y.B Com

१) १०,००० मि. धावणे - द्वितीय क्रमांक

भंगी आर. आर.F. Y.B.A.

१) थाळीफेक तृतीय क्रमांक रिले ४x१०० व ४x४०० मध्ये तर राजाराम कॉलेज सारख्या बलाढ्य संघाशी चुरसी करून दुसरा क्रमांक खेचून आणला.

अँथलेटिक्स शिवाय कब्बडी, क्रिकेट, फुटबॉल या सांघीक क्रिडास्पर्धेमध्ये देखील महाविद्यालयाच्या संघाने भाग घेतला. कब्बडीमध्ये पी. आर. जाधव (F.Y.B Com) व दावणे ए. एस. (S.Y.B.A.) फुटबॉलमध्ये मगदूम एस एम. (F.Y.B.Com) व मोहिते बी. एस (F.Y.B.Com) व क्रिकेटमध्ये पाटील एन. बी. (S.Y.B.Com) व आजरी एस.सी. (P.D.Arts) यानी आपली विशेष चमक दाखविली.

इतर मंडळाचा अहवाल स्वतंत्रपणे देणेत आला आहे.

## १९६८-६९ स्कॉलरशिप व फ्रीशिपस

या वर्षी आमच्या कर्तव्यदक्ष ऑफीस स्टाफने सर्व अर्ज व माहिती वेळेवर पाठविल्याने अधिकाधिक विद्यार्थ्यांना सरकारी व निम सरकारी मदतीचा फायदा मिळाला.

### नॅशनल लोन स्कॉलरशीप

| | | वार्षिक |
|---|---|---|
| कुंभार बी जी | तृतीयवर्ष साहित्य | ७२०-०० |
| दोशी के एम | द्वितीयवर्ष वाणिज्य | ७२०-०० |
| बारदेसकर जे जे | पदवीपूर्व वाणिज्य | ७२०-०० |
| कु. पतकी ए एम | पदवीपूर्व साहित्य | ७२०-०० |

## नॅशनल स्कॉलरशीप

| | | |
|---|---|---|
| जाधव एस बी | प्रथमवर्ष वाणिज्य | ६००-०० |

## हिंदी नॅशनल स्कॉलरशिप

| | | |
|---|---|---|
| कु. कोरगांवकर पी एस | द्वितीयवर्ष साहित्य | ९००-०० |
| कु. करंदीकर के आर | ,, | ९००-०० |
| पाटील जी डी | प्रथमवर्ष साहित्य | ६००-०० |

## अपंग स्कॉलरशिप

| | | |
|---|---|---|
| कु. चोथे पी जी | पदवीपूर्व साहित्य | ७२०-०० |

## राजकीय पीडित स्कालरशीप

| | | |
|---|---|---|
| यादव एस वाय | तृतीयवर्ष साहित्य | ७००-०० |
| कोरी व्ही के | प्रथमवर्ष वाणिज्य | ७००-०० |
| घुगरी व्ही बी | पदवीपूर्व वाणिज्य | ७००-०० |
| पोवार एन बी | पदवीपूर्व साहित्य | ७००-०० |

## बॅकवर्ड क्लास स्कालरशिप

| | | दरमहा व परिक्षा फी |
|---|---|---|
| नाईक डी एल् | प्रथमवर्ष साहित्य | २७-०० |
| पाटील एम डी | पदवीपूर्व वाणिज्य | ,, ,, |
| माळी एम पी | प्रथमवर्ष साहित्य | ,, ,, |
| कांबळे बी एस | प्रथमवर्ष वाणिज्य | ,, ,, |
| मांग जी जी | द्वितियवर्ष साहित्य | ,, ,, |
| आळगुंडी एम एस | ,, ,, | ,, ,, |
| गुंठे टी एम | पी डीं आर्टस | ,, ,, |
| कांबळे एस के | पदवीपूर्व वाणिज्य | ,, ,, |
| नाईक एस ए | प्रथमवर्ष वाणिज्य | ४०-०० |

## ओपनमेरीट स्कॉलरशिप

| | | |
|---|---|---|
| कु एस डी कुलकर्णी | प्रथमवर्ष साहित्य | वार्षिक ३६०-०० |

## ओपनमेरीट फ्री-शिप

| | | |
|---|---|---|
| कु ए एस कुलकर्णी | पदवीपूर्व साहित्य | ½ फी माफ |
| कु एम एस कुलकर्णी | ,, ,, | ,, ,, |
| ,, एम एस कुलकर्णी | ,, ,, | ,, ,, |
| ,, व्ही व्ही कुलकर्णी | ,, ,, | ,, ,, |
| श्री बी एन सर्वे | ,, ,, | ,, ,, |

| | | |
|---|---|---|
| | | ½ फी माफ |
| श्री एस आय चोथे | प्रथमवर्ष साहित्य | ,, ,, |
| कु. यू एस कुलकर्णी | ,, ,, | ,, ,, |
| श्री ए पी यमाटे | प्रथमवर्ष वाणिज्य | ,, ,, |
| कु. टी आर कोले | द्वितियवर्ष साहित्य | ,, ,, |
| श्री एस व्ही देशपांडे | पदवीपूर्व वाणिज्य | ,, ,, |
| ,, आर के जोशी | ,, ,, | ,, ,, |
| ,, एस ए रिंगणे | ,, ,, | ,, ,, |
| ,, एस व्ही हत्ती | प्रथमवर्ष वाणिज्य | ,, ,, |
| ,, पी बी लाटकर | द्वितियवर्ष वाणिज्य | ,, ,, |
| ,, एस डी परमणे | द्वितियवर्ष साहित्य | ,, ,, |

## देवस्थान मंडळ स्कॉलरशिप

| | | |
|---|---|---|
| श्री एस एन देवार्डे | पदवीपूर्व वाणिज्य | ½ फी माफ |
| ,, एस डी जाधव | ,, ,, | ,, ,, |

या व्यतिरिक्त कॉलेज तर्फे ३० विद्यार्थ्यांना फी-शिप देण्यांत आल्या.

## ग्रंथालय विभाग

शिवराज महाविद्यालयाप्रमाणेच त्याचे ग्रंथालयही प्रगतीपथावरील यशस्वी वाटचाल मोठ्या जोमाने करीत आहे. यंदाचे वर्षी ग्रंथालयांत एकूण १००७ पुस्तकांची भर पडली आहे. व ग्रंथालयाचा एकूण ग्रंथसंग्रह ५३९० इतका झाला आहे यासाठी महाविद्यालयाने ८२,००० रु. खर्च केले आहेत

यावर्षी ग्रंथालय परिपूर्तीसाठी वाणिज्य विभागाकडे अधिक लक्ष पुरविण्यात आले. अर्थशास्त्र, बँकिंग इ. विषयाच्या सखोल अभ्यासास पूरक व उपयुक्त अशी पुस्तके ग्रंथालयात आणली गेली आहेत. त्याचप्रमाणे कला विभागासुद्धा जरूर पडेल त्याप्रमाणे त्यातील विषयांची पुस्तके घेतली आहेत.

'आशिया फाऊंडेशन' यांचे कडून ग्रंथालयास ५० पुस्तके भेट म्हणून आली आहेत. त्यातील अधिक पुस्तके ही इंग्रजी साहित्य, त्यावरील टीका व साहित्याचा इतिहास यावरील आहेत. या पुस्तकामुळे आमच्या ग्रंथालयात अमूल्य भर पडली आहे यात शंकाच नाही. याबद्दल आम्ही 'आशिया फाऊंडेशनचे' अतिशय ऋणी आहोत.

नियतकालिक विभागांत यावर्षी ४८ नियतकालिके मागविली गेली त्याचप्रमाणे १० दिवाळी अंकही अधिक घेण्यात आले.

नियमित कालिकांची वर्गवारी याप्रमाणे-

| | मासिक | साप्ताहिक | | एकूण |
|---|---|---|---|---|
| मराठी | १९ | ३ | द्विसा. १ | २४ |
| हिंदी | २ | २ | त्रैमा. १ | ५ |
| इंग्रजी | १५ | ४ | – | १९ |
| | | | | एकूण ४८ |

याशिवाय ५ मराठी व २ इंग्रजी दैनिके घेतली जातात.

दरवर्षीप्रमाणेच यंदाही परीक्षेच्या बऱ्याच आधी 'अभ्यासिका' सुरू करण्यात आली आहे. नवीन उपक्रम म्हणून अभ्यासिका विभाग स्वतंत्ररीत्या पाडला असून त्यात ४५० पुस्तके आहेत. ही पुस्तके विद्यार्थी फक्त अभ्यासिकेतच वापरू शकतात. अभ्यासिका रोज सकाळी ७-३० ते ११ व दुपारी ४ ते रात्री ११ पर्यंत उघडी ठेवण्यात येते. रविवारी तिची वेळ ११ ते दु ३ व सायं. ६ ते रात्री ११ अशी असते.

ग्रंथालयाचा मुख्य उपयोग ग्रंथाची देवाण-घेवाण याकरिता महाविद्यालयाच्या वर्षाच्या सुरवातीपासून अखेरपर्यंत देवाण घेवाण ठेवण्यात आली आहे. मासिक पहाणीवरून शे. ६५ विद्यार्थी ग्रंथालयाचा उपयोग करताना आढळले. यामध्ये अधिकाधिक प्रगती होईल अशी अपेक्षा करावयास काय हरकत आहे?

एस. एम. दड्डी
सहाय्यक ग्रंथपाल

सौ. स्मिता सबनीस
ग्रंथपालिका

## भित्तिपत्रक विभाग

आमच्या महाविद्यालयाचा भित्तिपत्रक विभाग प्रमुख प्रा. कृष्णा गुरव, विद्यार्थी संपादक श्री. राम जोशी आणि विद्यार्थी साहाय्यक श्री. मारुती भोसले यांनी चोखंदळ सौंदर्यदृष्टी बाळगून कौशल्याने हाताळला. 'अनामिका' या भित्तिपत्रकाच्या प्रथमांकाचे प्रकाशन कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयातील प्रा. पां. ना. कुलकर्णी यांच्या शुभहस्ते डॉ. अ. बा. शेणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ ऑगस्ट ६८ या स्वातंत्र्यदिनी झाले. या प्रसंगी प्रा. पां. ना. कुलकर्णी यांचे 'लेखनामागील प्रेरणा' या विषयावर सुबोध व रसाळ व्याख्यान झाले. यानंतर डिसेंबर अखेर दर महिन्यास 'अनामिके' चे अंक प्रसिद्ध होत गेले. त्यापैकी एक अंक 'गांधी शास्त्री' विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला. कथा, कविता, विनोदी तसेच वैचारिक लेख, रंगचित्रे आदी स्वरूपाचे वैविध्य हे या अंकाचे वैशिष्ट्य होय. या वर्षी या 'अनामिके'तून प्रसिद्ध झालेल्या कु. सुलोचना मडलगी, कु. कुंदा पेडणेकर व श्री. मारुती भोसले यांच्या कविता वाङ्मयीन दर्जा असलेल्या दिवाळी अंकातून प्रसिद्ध झाल्या हे उल्लेखनीय होय. या अंकातील कलाभिव्यक्तीचे स्वरूप पाहून प. महादेवशास्त्री यांनी गौरवोद्गार काढून धन्यवाद दिले.

विभाग चिटणीस
राम जोशी

विभाग प्रमुख
प्रा. कृष्णा गुरव

## मराठी वाङ्मय मंडळ

मराठी वाङ्मयमंडळाचे उद्घाटन कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. द. का. संत यांनी ४ ऑगस्ट ६८ रोजी केले. साहित्याची थोरवी हा व्याख्यानाचा विषय होता.

मराठीतील सुप्रसिद्ध श्रेष्ठ टीकाकार व लेखक आणि फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी मराठी विभाग प्रमुख प्रा. रा. श्री. जोग यांचे व्याख्यान २५ सप्टेंबर ६८ रोजी झाले. श्रेष्ठ साहित्यामध्ये कोणते गुण असणे आवश्यक आहे याबद्दलची त्यांची मार्गदर्शनपर मते त्यांनी मांडली. या श्रेष्ठ टीकाकाराने आमचे आमंत्रण स्वीकारले याबद्दल मंडळ कृतज्ञ आहे.

राम जोशी
सेक्रेटरी

सौ. नीला पांडरे
विभाग प्रमुख

## विद्यार्थी कल्याण मंडळ

गेल्या तीन वर्षांपासून आमच्या महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळ कार्यान्वित झाले आहे. याची सुरवात शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे २७ व २८ नोव्हेंबर ६७ या दोन दिवसाच्या शिबिराने झाली.

डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन या नावाने विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी बांधल्या जाणाऱ्या विद्यार्थी भवनाच्या श्रमदानाची सुरवातही आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्याच श्रमदानाने झाली ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. मे व जून या दोन महिन्यांच्या दरम्यान येथील दहा विद्यार्थ्यांनी प्रत्येकी आठ दिवसाचे श्रमदान केले.

गडहिंग्लजपासून २॥ मैल अंतरावर असलेल्या दुडगे दत्तक खेडेगावी या मंडळाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यामध्ये 'बिन माणसाचा हात' ही एकांकिका व इतर विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर केले गेले.

२५ आक्टोबर ६८ रोजी १२ विद्यार्थ्यांचे एक श्रमदान पथक स्वखर्चाने विद्यार्थी भवनाच्या श्रमदानासाठी गेले. या पथकाने उल्लेखनीय कार्य करून ८ विद्यार्थ्यांनी २॥ तासात ९०० कच्च्या विटा घालून विशेष विक्रम केला. तसेच याचवेळी विद्यापीठामध्ये झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेऊन एक पोवाडा व महाराष्ट्र गीत सादर केले. विद्यापीठामध्ये भरविल्या गेलेल्या प्रदर्शनासाठी श्री. एम. बी. भोसले यांची चित्रेही पाठविण्यात आली होती. तसेच 'शिवसंदेश' या मासिकासाठी श्री. जी. एस. हिरेमठ याची कथा व पी. आर. देशपांडे यांची मुलाखतही घेण्यात आली आहे.

नियोजन मंडळाच्यावतीने दुडगे या दत्तक खेड्याच्या घेण्यात आलेल्या आर्थिक सर्व्हेमध्येही या मंडळाने सक्रीय भाग घेतला

| | |
|---|---|
| प्राध्यापक प्रमुख | विद्यार्थि प्रतिनिधी |
| प्रा. एन. एस. कुलकर्णी | देशपांडे पी आर. |
| | कुंभार बी जी |
| | कु. कोरगांवकर पी. एस. |

## साहित्य संस्कृति मंडळ

१९६८-६९ या वर्षातील कॉलेजमधील अभ्यासोत्तर उपक्रमांना सुरवात सदर मंडळाच्या उद्घाटनानें झाली. सांगलीच्या बी.एड्. कॉलेजचे माजी प्राचार्य, प्रा. जी. एस. देशपांडे यांनी टिळक पुण्यतीथीच्या दिवशी १ ऑगस्ट ६८ रोजी 'लोकमान्य टिळक' या विषयावर व्याख्यान देऊन मंडळाचे उद्घाटन केले.

१५ ऑगस्ट ६८ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त वसंत सबनीस कृत 'बिन माणसाचा हात' ही विनोदी एकांकिका व विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर करण्यात आले या एकांकिकेत प्रा. सी. बी. पांढरे व सौ. नीला पांढरे यांनी त्याचप्रमाणें हरिभाऊ चव्हाण एम. टी. देशपांडे, मारुती भोसले रविंद्र जोशी, घुमे धरणगुत्ती व राम पाटील या कलावंतांनी भाग घेतला होता.

१ सप्टेंबर ६८ रोजी महाराष्ट्रातील सिद्धहस्थ कथाकार पं. महादेवशास्त्री जोशी यांचे 'राष्ट्रधारणा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्रारंभापासून आतापर्यंत इतका श्रेष्ठ लेखक पाहुणा म्हणून या महाविद्यालयाला प्रथमच लाभला अशा लेखकाला आणण्याचा बहुमान या मंडळाला मिळावा हे भूषणावह आहे.

या मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या मराठी वक्तृत्व विभागातर्फे कु. एस. डी. कुलकर्णी व कुंभार हे विद्यार्थी पहिल्या सहामाहीत पगु वक्तृत्व स्पर्धेकरिता कोल्हापूरला पाठविले होते या स्पर्धेत कु. कुलकर्णी यांना पारितोषिक मिळाले हेच दोन विद्यार्थी शि म. परांजपे वक्तृत्व स्पर्धेकरिता बेळगांव येथेहि पाठविण्यात आले होते विद्यार्थ्यांची निवड प्रा. मणियार व प्रा. एन. एम. कुलकर्णी यांनी महाविद्यालयात घेतलेल्या चाचणीतील क्रमांकानुसार केली परीक्षकांचे मडळ ऋणी आहे.

| | |
|---|---|
| विभाग प्रमुख | चिटणीस |
| प्रा. सौ. नीला पांढरे | शरद दंडगे |
| | कु. शैलजा कुलकर्णी |

## कॉमर्स असोसिएशन

१) दि. २१ जुलई ६८ रोजी कॉमर्स कार्यकारिणींची ६८ ६९ या शैक्षणिक वर्षाकरिता निवड करणेत आली.

२) दि. ११ ऑगस्ट ६८ ला प्रा. भानुशाली, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर यांचे शुभहस्ते कॉमर्स असोसिएशनचे उद्घाटन व 'ग्रामीण नेतृत्व' या विषयावर भाषण आयोजित करण्यात आले.

३) सामाजिक कार्याचा एक भाग म्हणून दि. २७ डिसेंबर ६८ या दिवशी दुण्डगे गांवची आर्थिक पाहाणी केली. या सर्वेक्षणात तीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. योजनेच्या काळांत शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारले आहे काय? ह्या उद्देशाने सदरचे सर्वेक्षण करण्यात आले सर्व्हेसाठी प्र. प्राचार्य कुकडे यांनी

प्रेरणा दिली व प्रा. एम. एल. पाटील यांनी मार्गदर्शन करून सर्वांची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.

डॉ. डी. बी. मगदूम, स्टुटगार्ट विद्यापीठ, जर्मनी यांचे 'जर्मनीतील आर्थिक व सामाजिक जीवन' या विषयावर दि. ८ जानेवारी ६९ रोजी बोधप्रद व्याख्यान झाले. त्यांनी जर्मनीच्या जीवनावर आधारित फिल्मस पण दाखविल्या.

५) महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसम्मेलनानिमित्त कॉमर्स असोसिएशनतर्फे 'अभिरूप लोकसभा' (Mock Parliament) हा मनोरंजक कार्यक्रम सादर करण्यांत आला. दि. १६ जाने. ६९

एम. एल. पाटील
संबंधित प्राध्यापक, कॉमर्स विभाग

## नियोजन मंडळ

अहवालसाली नियोजन मंडळाचे उद्‌घाटन ८ सप्टें. ६८ रोजी देवचंद महाविद्यालय अर्जुनगर यथील अर्थशास्त्राचे नामवंत प्राध्यापक श्री. एस आर. नाडकर्णी यांच्या शुभहस्ते झाले'भारतातील सर्वसामान्य नागरिक' या विषयावर त्यांनी आपले मनोज्ञ विचार मांडले.

या मंडळाच्या वतीने 'अप्रगत राष्ट्र व आर्थिक नियोजन' आणि 'भारतीय शेती' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये सर्वश्री बी. जी. कुंभार (टी. वाय बी.ए.) व पी. आर. जाधव (एफ. वाय बी कॉम) हे स्पर्धक यशाचे मानकरी ठरले यशस्वी स्पर्धकांना रोख पारितोषिके देण्यात आली

वाणिज्य मंडळातर्फे घेण्यात आलेल्या 'दत्तकदुण्डगे गावच्या आर्थिक व सामाजिक सर्वेक्षणात या मंडळाने सक्रीय भाग घेतला तसेच स्नेहसम्मेलन प्रसंगी या मंडळाच्या वतीने 'अभिरूप लोकसभा' हा अभिनव कार्यक्रम प्रथमच महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशनच्या सहकार्याने सादर करण्यात आला.

विभाग प्रमुख
प्रा एन. एस कुलकर्णी

वि. प्रतिनिधी
संतराव इगवले

## सहल विभाग

सहल विभागातर्फे या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाची सहल आंबोली येथील प्रेक्षणीय स्थळाला गेली होती व त्यांत ८० विद्यार्थी व ४ प्राध्यापकांनी भाग घेतला होता. सहलीची व्यवस्था प्रा. पांढरे यांनी केली होती.

या वर्षी काश्मीर व मुंबई मार्शेरान येथे सहल आयोजित केली होती ती वेळे अभावी रद्द करावी लागली.

विभाग प्रमुख
जोशी एम. एस.

## N. C. C. Report of 1968-69

अेन्. सी. सी. मध्ये या वर्षी १३० कॅडेटस् असून त्यापैकी ४ सार्जंटस्; ६ कार्पोरलस्; १८ लान्स कार्पोरलस् आहेत. १९६७ ६८ या साली बी सर्टिफिकेट परिक्षेसाठी ३५ विद्यार्थी बसले व त्यापैकी २४ विद्यार्थी पास झाले.

यंदा कॉलेजमधील प्रा. आर. बी. आणेकर हे सेकंड लेफ्टनंट म्हणून आहेत. ते नागपूरला जाऊन सेकंड लेफ्टनंटची परीक्षा १ ऑगस्ट ६७ रोजी देऊन आले आहेत. तसेच हवालदार श्री. सिताराम घाग व हवालदार मेजर काशिनाथ पवार हे इन्स्ट्रक्टर म्हणून काम पहातात.

१५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोन दिवशी अेन्. सी. सी. च्या कॅडेटसच्या मोठ्या शिस्तबद्धतेने परेडस् झाल्या.

## मोफत शस्त्रक्रिया शिबिर

डॉ. गणे यांना गडहिंग्लज येथे २५-१२-६८ ते ३१-१२-६८ या मुदतीत मोफत शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करून आमच्या कॉलेजला मदतीची हाक दिली."समाजसेवा हे सर्वात मोठे पवित्र कर्तव्य आहे"

याची जाणीव ठेवून प्र. प्राचार्य नरेंद्रकुमार कुकडे यांच्या प्रोत्साहनाने खालील विद्यार्थी–विद्यार्थीनींनी सदर शिबीरामध्ये स्वयंसेवकाचे काम स्वयंस्फूर्तीने केले रूग्णांच्या सेवेमध्ये किती सात्वीक आनंद असतो याची या विद्यार्थ्यांना पूर्ण कल्पना आली. समाज सेवा करून विद्यार्थ्यांनी आपले कर्तव्य तर पार पाडलेच परंतु त्याहूनही अधिक त्यांना आपण ज्या संस्थेचे विद्यार्थी आहोत त्या संस्थेला अभिमानास्पद वाटण्याजोगे व त्या संस्थेबद्दल लोकांत भलाई वाटण्याजोगे निःसंशय कार्य केले आहे.

खालील विद्यार्थी–विद्यार्थीनींनी शिबिरात भाग घेतला.

| विद्यार्थी | विद्यार्थीनी |
|---|---|
| १) देशपांडे जी. वाय्. | १) कु करंदीकर पी. आर. |
| २) इंगवले एस्. जी. | २) ,, करंदीकर के. आर. |
| ३) ऐनापुरे आर. आर. | ३) ,, कुलकर्णी एम्. एच्. |
| ४) देशपांडे एम्. टी. | ४) ,, कुलकर्णी एम्. एस. |
| ५) देशपांडे पी. आर. | ५) ,, देशपांडे एम. के. |
| ६) दंडगे एस. व्ही. | ६) ,, वडेर सी. एन. |
| ७) जोशी आर. बी | ७) ,, घुगरे एस एन. |
| ८) सासणे डी आर. | ८) ,, तोरगल्ली के. व्ही. |
| | ९) ,, कुलकर्णी एस. डी |

## स्नेह संमेलन क्रीडा विभाग

वार्षिक स्नेहसंमेलनाप्रित्यर्थ वैयक्तिक व सांधिक क्रीडा स्पर्धा अयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतील वैयक्तिक गटामध्ये एकूण ३३ विद्यार्थ्यांनी व १० विद्यार्थिनींनी भाग घेतला तर सांधिक स्पर्धेमध्ये सर्व वर्गानी भाग घेतला. वैयक्तिक क्रीडास्पर्धेतील पुरुष विभागाची वैयक्तिक चंपीयनशीप समानगुणामुळे विभागण्यात येऊन त्याचे मानकरी फडणीस व्ही. व्ही. (द्वितीयवर्ष साहित्य) व देवरकर जी. आर. (तृतीयवर्ष साहित्य) हे ठरले. मुली विभागातील वैयक्तिक चंपीयनशिप कु. बारदेसकर अेस. अेम. (पदविपूर्व साहित्य) हिने पटकाविली महाविद्यालयाची जनरल चंपियनशिप द्वितीयवर्ष वाणिज्य या वर्गाने मिळविली

क्रीडा स्पर्धा समितीकडेच पारितोषिक वितरणाचे कामही होते. पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १८ जाने. ६९ रोजी प्रा. भा. शं. भणगे कॉमर्स कॉलेज कोल्हापूर यांचे शुभहस्ते करण्यात आला.

विभाग प्रमुख
प्रा. व्ही. अेम. पाटील

## नाटक विभाग

या वर्षी शिवराज महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख आकर्षण म्हणून श्री राम शिंदे लिखित 'मुनाला वाचा फुटली' हे रहस्यप्रधान, तीन अंकी संगीत नाटक बसविण्यात आले. या विभागाची संपूर्ण धूरा शरद दंडगे, मधुकर देशपांडे व राम जोशी या विद्यार्थ्यांनी उचलली आणि नाटक यशस्वी करण्यास हातभार लावला. या नाटकात खालील कलावंतानीं भाग घेतला व नाटकाच्या धवल यशाचे मानकरी झाले.

| | |
|---|---|
| सौ. स्मिता सबनीस | ग्रंथपालिका |
| जयन्त सबनीस | द्वितीयवर्ष साहित्य<br>प्रमुख लेखापाल |
| राम जोशी | द्वितीयवर्ष साहित्य |
| कुमार काले | ,, ,, |
| राम पाटील | ,, वाणिज्य |
| मधुकर देशपांडे | प्रथमवर्ष ,, |
| किरण खेबुडकर | ,, ,, |
| विजय बांदेकर | पदवीपूर्व साहित्य |
| वीरकुमार कोठीवाले | ,, ,, |
| रविकांत जोशी | ,, वाणिज्य |

दुसरी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते ती ही की नाटकात भूमिका करण्यासाठी म्हणून महाविद्यालयातील एकाही विद्यार्थिनीने तयारी दर्शविली नाही. तथापि आमच्या ग्रथालयाच्या कार्यतत्पर ग्रंथपालिका सौ. स्मिता सबनीस यांनी पुढाकार घेतला व उत्कृष्ट भूमिका वठवून ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या पुढे एक आदर्श ठेवला याबद्दल आम्ही त्यांचे हार्दिक ऋणि आहोत.

तद्वतच येथील एक कुशल नट आणि दिग्दर्शक हणमंतराव जोशी यानी सतत तीन आठवडे परिश्रम घेऊन अभिनयाच्या प्रांतात सर्वस्वी अनभिज्ञ असलेल्या विद्यार्थ्यांकडून उत्तम भूमिका करवून घेतल्या आणि म्हणूनच या नाटकाच्या यशस्वीतेतील सिहाचा वाटा त्यांच्याकडे जातो. तेव्हा त्यांच्या कृतज्ञतापूर्वक ऋणनिर्देश करणे आमचे कर्तव्य आहे

गडहिंग्लजसारख्या ग्रामीण भागातसुद्धा मिश्रनाटक बसविले जाते. आणि तेही खुल्या नाट्यगृहांत केवळ विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने उत्तमरित्या सादर केले जाते याबद्दल येथील नागरिक रसिकांनी धन्योद्गार काढले.

नाटकासाठी अनेक जणांचे सहाय्य झाले.कोल्हापूरचे मेकअप आर्टिस्ट श्री. दिनकरराव जाधव, फिडलमन पांडुरंग जाधव, बेळगांवचे श्रीं. शिंडे रेडिओ, गडहिंग्लजचे श्री. गुंड.पंत कुलकर्णी व व्यंकटराव कुलकर्णी यांचे पण सहाय्य झाले. नाटकविभागाला सर्वस्वी प्रेरणा लाभली ती प्रभारी प्राचार्य श्री. नरेंद्रकुमार कुकडे व सस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अेस. अेस. घाळी यांची होय.

चिटणीस
शरद दंडगे
मधुकर देशपांडे
राम जोशी

## अभिरूप लोकसभा

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त प्र. प्राचार्य नरेंद्रकुमार कुकडे यांच्या अचूक मार्गदर्शनाखाली दि. १६ जानेवारी ६९ या दिवशी 'अभिरूप लोकसभा' हा एक अभिनव व देखणा कार्यक्रम सादर करण्यात आला. महाविद्यालयच्या स्थापनेपासून असा कार्यक्रम कधीहीं न झाल्यानें सर्वांचीं मनें यानें आकर्षून घेतलीं.

या कार्यक्रमात स्पीकराची भूमिका प्रा. एन. एस. कुलकर्णी यांना उत्कृष्टपणें पार पाडली. प्रा. अेम. अेल. पाटील विरोधी पक्षनेते चांगलेच शोभले तर प्रा. जी. आर. ठाणे यानीं D M K चे नेतृत्व केले या कार्यक्रमांत उत्कृष्ठ भूमिका वठविल्या बद्दल सर्वश्री कोठीवाले, धुमे, व कुंभार यांना पारितोषके दिे देण्यात आली. खालील विद्यार्थी विद्यार्थिनींनी भाग घेऊन आपली कामे यथोचित पार पाडली

### अधिकाररुढ पक्ष

मुख्यमंत्री (राम जोशी) अ(न)र्थमंत्री (शरद दंडगे) संरक्षण व शिक्षण (एम. टी. देशपांडे) बेकारमंत्री (व्हीं. व्ही. फडणीस) अपघातमंत्री (जोशी ए व्हीं.) घातपातमंत्री (तोरगल्ली एस. व्ही.) उपमंत्री (देसाई पी. आर.) Minister without port-folio (देशपांडे पी आर.) आणि आरोग्यमंत्री (कु. एस. डी. कुलकर्णी)

### विरोधीपक्ष

विरोधीपक्ष नेता (प्रा. एम. एल. पाटील) D. M. K (प्रा. ठाणे) हिंदुमहासभा (जे के. कुलकर्णी) कम्युनिस्ट (खेबुडकर) प्रजासमाजवादी (बी जी. कुंभार) शेतकरी कामगार (कोठीवाले) अखिल भारतीय चापलूसमाज (सासणे) पक्षबदलू क्रांतीपक्ष (संपतराव इंगवले) स्वतंत्र (बेनके) अखिल भारतीय बेकार पार्टी (खीचडी एन. डी.) Woumen fadaration (कु. तोरगल्ली) अॅटर्नी जनरल (दोशी) मार्शल (धुमे व आर. के. जोशी)

प्रमुख
प्रा. एन. एस. कुलकर्णी

विद्यार्थी प्रतिनिधी
कुंभार बी. जी
कुलकर्णी जे. के.

## विविध करमणूक विभाग

दिनांक १९ जानेवारी १९६९ रोजी कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी रात्री ९ ३० ते २ पर्यंत विविध करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. शास्त्रोक्त संगीत, भावगीत, नाट्यगीत, हिंदी काव्य प्रकारांतील स्मरगीत तसेच उर्दु गजल, कव्वाली इत्यादि कार्यक्रम कॉलेजमधील विद्यार्थी–विद्यार्थिनींनी

गायक कलाकारानी सादर केला. कु. तोरगल्ली, कु. फडणीस व कु. कुलकर्णी आणि खलीफ, ठगरी व मुल्ला या विद्यार्थी गायकानी आपल्या सुरेल आवाजाने व संगीत कलेने प्रेक्षकाना विमुग्ध केले.

## एकांकी

'बड चहा पितो' मराठी एकांकिका प्रा सौ. नीला पांढरे आणि प्रा सी. ब. पांढरे यानी सादर केली दोन्ही कलावंताच्या अभिनय कौशल्याची दर्शकानी मुक्तकठाने प्रशंसा केली.

डॉ रामकुमार वर्मा लिखित 'पृथ्वीराज की आँखे' ही ऐतिहासिक हिन्दी एकांकी कुंभार बी. जी., बेनके पाटील व धुमे या विद्यार्थ्यांनी सादर केली. एकांकी मधील करुण प्रसंग व बी जी. कुंभार यांच्या अभिनयाच्या संयोगाने ही एकांकी प्रभावोत्पादक ठरली.

श्री शंकेश मटियानी कृत 'गांव का पोस्टमन' ही एकांकी हिन्दी भाषा अन्तर्गत ब्रजभाषेतील हास्यरस प्रधान होती. मोहिते, देवरकर, मुल्ला, भोसले आणि धरणगुत्ती या विद्यार्थी कलाकारानी ही एकांकी सादर केली. भोसले व धरणगुत्ती यांची कामे फार उठावदार होती. यांच्या अभिनय कौशल्यानें दर्शक तन्मय विमुग्ध झाले होते.

## लोकनृत्ये

भांगडा, धनगरी नृत्य आणि भारुड इत्यादि विविध लोकनृत्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. बहिरगण्णा पाटील आणि गवळी यानी आपल्या कलानैपुण्यानें दर्शकांना मुग्ध केले.

'गांवचा कुशल केशकर्तनकार' ही परिहासपूर्ण नाट्य छटा श्रेष्ठीनी सादर केला. किरण खेबुडकरनी 'स्नेहसंमेलनाकरिता आयत्या वेळचा पाहुणा' ही पंधरा मिनिटाची नक्कल सादर केली.

प्रा. के. अेच. मणियार
विभाग प्रमुख करमणूक विभाग

## वादविवाद मंडळ

महाविद्यालयाच्या सर्वंकष विविधतेत वक्तृत्वाच्या प्रभावी गुणवृद्धीसाठी स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे प्रथम पुष्प वक्तृत्वाच्या स्पर्धांनी गोवले गेले. प्रचलित विषयाच्या माध्यमाने विद्यार्थ्यांच्या विचार प्रणवतेला चालना देणारा 'विद्यार्थी व राजकरण' हा विषय ठेवला गेला अत्यंत उत्साहाने महाविद्यालयातील १२ स्पर्धकानी आपले धारदार विचार प्रकट केले. स्पर्धेसाठी प्राध्यापकांचेच परीक्षक मंडळ होते त्याचवेळी स्पर्धेचा निकाल जाहीर होऊन त्यात— १) कु. एस्. डी. कुलकर्णी २) बी. जी. कुंभार ३) एस्. एस्. श्रेष्ठी याना पारितोषिके देण्यात आली.

तसेच महात्मा-गांधी जन्मशताब्दी निमित्य २६ जानेवारीला महाविद्यालयात 'महात्मा गांधीजींच्या जीवनाचा परामर्ष घेऊन तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील कार्य' विरही १० स्पर्धकानी आपली वैचारिक मते मांडली त्याचदिवशी शासनातर्फे पुढील यशस्वी स्पर्धकाना रोख बक्षिसे देण्यात आली. १) कु एस्. डी. कुलकर्णी २) कुंभार बी. जी.

लोकशाहीतील वक्तृत्वाच्या आवश्यक गुणवत्तेचे संवर्धन महाविद्यालयात करण्याचा प्रयत्न यशस्वितेने होत आहे.

विद्यार्थी प्रतिनिधी
१) कुंभार बी. जी
२) रोकडे के. आय्.
विभाग प्रमुख
प्रा. आर. बी. आणेकर

## प्रदर्शन - विभाग

आपल्या महाविद्यालयातील यंदाचे आकर्षण प्रदर्शन विभाग ठरले. फक्त २/३ दिवसात विद्यार्थ्यांनी अविश्रांत श्रम करून तयारी केली प्रदर्शनाचे उद्घाटन १८-१-६९ ला सर्वश्री शशिकांत शहा यांनी केले. डॉ घाळी, डॉ गुणे, श्री. मणीयार व इतर व्यवस्थापकीय मंडळातील सदस्यांनी प्रदर्शनाला भेटी दिल्या.

समारंभाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य भणगे यांनी विभाग पाहून समाधान व्यक्त केले

विभागातर्फे इंग्रजी, मराठी हस्ताक्षर स्पर्धा व रांगोळी स्पर्धा आयोजित केली होती तसेच विभागाचे आकर्षण एस्. वाय्. कॉमर्सच्या विद्यार्थ्यांनी उभारलेला वैविद्धपूर्ण व्यापार विभागाचा स्टॉल होता. श्री चिंचणेकर, श्री. भोसले, प्रा. गुरव यांच्या रांगोळया विशेष उल्लेखनीय ठरल्या. डॉ. गुणे यांनी उत्तेजनार्थ बक्षिसें देऊन त्यांचा गौरव केला.

या प्रदर्शनाला मा बी. डी. ओ. साहेबांनी विशेष सहकार्य दिले.

विद्यार्थी प्रतिनिधी
श्री. जोशी ए. व्ही.
श्री. भोसले एम्. बी.
कु. कुलकर्णी एस एच.
विभाग उपप्रमुख
प्रा. आर. बी. आणेकर
विभाग प्रमुख
प्रा. सी. बी पांढरे

★

गडहिंग्लज येथील एक प्रतिष्ठित नागरिक व लोकप्रिय नगराध्यक्ष डॉ. एस. एस. घाळी यांचे चुलते श्रीशैलापा घाळी यांचे दिनांक १५ जानेवारी १९६९ रोजी आकस्मिक देहावसान झाले. त्याबद्दल शिवराज महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी गण त्यांच्या कुटुंबियावर आलेल्या या आपत्तीबद्दल दु:ख व्यक्त करीत असून मृतात्म्यास शांती लाभो ही परमेश्वरचरणी प्रार्थना !

# गांधीजी जगातले सर्वश्रेष्ठ महापुरुष

आपण आपल्या शिवराज महाविद्यालयाचे 'शिवराज' नावाचे वार्षिक काढण्याचे ठरविले असून त्या अंकात प्रामुख्याने म. गांधीजींच्या तत्वज्ञानावर चर्चा करणारे साहित्य प्रकाशित करण्याचे ठरविले आहे. हे वाचून अत्यानंद झाला. शिवरायाच्या निधर्मी राज्याच्या कल्पनेचे, त्यांच्या स्वराज्य स्थापनेचे व दीनजनांच्या उद्धाराचे जागतिक मंगल रूप म्हणजेच म. गांधीजी. आज सर्व जगात म. गांधी जन्मशताब्दि चलू आहे. याचे कारण गांधीजी आजच्या जगातले सर्वश्रेष्ठ महा-पुरुष आहेत हे होय. गांधीजींनी नुसत्या भारतालाच स्वातंत्र्य मिळवून दिले नाही. त्यानी जगातल्या सर्व पारतंत्र्यात खितपत पडलेल्या राष्ट्राना स्वातंत्र्याची प्रेरणा दिली. त्यानी दलिताना माणूसकीचे हक्क दिले स्त्रियाना समान संधी व समान हक्क दिले. त्यानी भारतात प्रौढ मतदानाचे हक्क देऊन, "या देशाच्या पंतप्रधानाच्या जागेवर व प्रेसिडेंट पदावर, शेतकऱ्यांची आणि कामकऱ्यांची मुले आली पाहिजेत" असे ठामपणे प्रतिपादन केले. ह्या उन्मत्त राक्षसी सत्तेबरोबर लढण्यासाठी त्यानी जगाला सत्याग्रहाचे प्रभावी अस्त्र दिले. सत्य, अहिंसा आणि समता या रत्नत्रयींचा त्यानी प्रभावी पुरस्कार करून जगाला शांतीचा संदेश दिला याच संदेशातून भारताचे शिल्पकार कै. प. जवाहर-लाल नेहरू यांनी 'पंचशीले' ला जन्म दिला. त्यानी देशाकरिता महान् त्याग केला आणि आत्यंतिक कष्ट सोसले. देशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर म. गांधीजीनी त्या सत्तेचा उपभोग न घेता ते गरिबांच्या सेवा करण्यासाठी दिल्लीच्या भंगी कॉलनीत जाऊन राहिले. आत्यंतिक त्यागाचे व सेवेचे जगाच्या इति-हासात असे उदाहरण नाही. 'शिवराज' वार्षिकाच्या विद्यार्थी वाचकांनी, गांधीजींचा हा आदर्श आपल्या जीवनात आणण्याचा मनोभावे प्रयत्न करावा, अशी त्याना आग्रहाची विनंती आहे.

पद्मश्री सत्यवादीकार .
**बाळासाहेब पाटील**

('शिवराज' करिता मोठ्या आत्मीयतेने लेख रूपाने पाठविलेला संदेश)



## कार्यकारी मंडळ



प्र. प्राचार्य कुरडे, श्री व्ही. एस. आलूरकर, श्री. शशिकांत शहा, श्री. एस. जी. हिडदुगी, श्री सी. एन. आजरी, डॉ. ए. बा. गुणे, अध्यक्ष व्ही. टी. पाटील, श्री बी. एन. नगूर्र, उपाध्यक्ष डॉ. एस. एस. घाळी, श्री एन. पी. कणिदार श्री. आर. बी. किनूरकर, श्री. जयंत मनवान.

□

## महाविद्यालयाचा प्राध्यापक व कर्मचारी वर्ग



उपाध्यक्ष, डॉ. एस. एस. घाळी यांच्या समवेत

ताराराणी विद्यापीठ
कोल्हापूर